म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र.



# हंगेरियन रोजनिशी

१८५८
REFBK-0009878

# हंगेरियन रोजनिशी

( एका हंगेरियन विद्यार्थ्याची रोजनिशी )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

लाझलो बेके

REFBK-0009878

किंमत दोन रुपये

कैलास प्रकाशन : १२

प्रथमावृत्ति
ऑक्टोबर १९५८

Copyright, The Viking Press, Inc., 1957.

मराठी अनुवाद :
**माधव मनोहर**

वेस्टन :
**गोपालकृष्ण भोबे**

मुद्रक :
**द. शं. पोतनीस**
गांवकरी मुद्रणालय
७९७, आग्रारोड,
नासिक

प्रकाशक :
**नारायण पुराणिक**
कैलास प्रकाशन
१२ त्रिभुवनरोड
मुंबई, ४

# लाझलो बेके

लाझलो बेके हें एका तरुण हंगेरिअन विद्यार्थ्याचें टोपण नांव आहे. बुडापेस्ट येथील आर्ट्स कॉलेजचा हा विद्यार्थी. हंगेरिअन राज्यक्रांतीच्या उठावांत अखेरीस ज्याची परिणति झाली, त्या विद्यार्थीनिदर्शनाच्या कल्पक संचालकांपैकीं बेके हा एक होता. हंगेरीच्या स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या सैनिकांचा हा एक शूर नेता. ह्याच शूर सैनिकांनीं रेडिओस्टेशनवर आणि गुप्त पोलिसांच्या मुख्य ठाण्यांवर हल्ले चढविले, आणि सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत सोव्हिएट फौजांविरुद्ध लढण्यासाठीं त्यांनीं धैर्यानें ठाण मांडलें. कार्डिनल मिडझेंटीच्या नाट्यात्म मुक्ततेचा बेके हा एक साक्षी होता. आणि जे विद्यार्थीप्रतिनिधि राज्यकर्त्यांशीं विफल वाटाघाटी करीत होते, त्यांच्यापैकी तो एक होता. अगदी अखेरीस जेव्हां स्वातंत्र्यसंगराचें अखेरशी भवितव्य अटळ झालें व बुडापेस्टमधील क्रांति कायमची चिरडून टाकण्यासाठीं सोव्हिएट फौजांनी व रणगाड्यांनी शहरास सर्व बाजूंनी चौफेर वेढा दिला तेव्हां लाझलो बेकेनें आपल्या गरोदर पत्नीसह संकटग्रस्त मार्गानें एकाकी प्रवास करून ऑस्ट्रियाची सरहद्द गांठली.

अखेरीस बेके कॅनडांत येऊन दाखल झाला. तेथें आल्यावर त्यानें बरोबर आणलेल्या टिपणांची व रेखाचित्रांची जुळवाजुळव केली. डायरींतील नोंदी व साक्षात् रणधुमाळींत रेखाटलेलीं चित्रें ह्यांच्या साहाय्यानें त्या भयभरल्या दिवसांचा वृत्तान्त त्यानें ह्या पुस्तकांत सादर केला आहे. अलीकडच्या काळांतील एका प्रक्षोभक घटनेचें प्रासंगिक निवेदन, एवढेंच केवळ ह्या वृत्तान्ताचें महत्त्व आहे, असें नाहीं; तर मानवी सामर्थ्य आणि त्या सामर्थ्याची प्रथम विजयांत व नंतर पराजयांत झालेली परिणति यांचें विदारक दर्शन त्यांत घडतें.

● ● ●

## *एका 'विद्यार्थ्याच्या डायरीं'तील उतारा :*

**दि.** २३ ऑक्टोबर १९५६ रोजीं रात्रीं ११ वाजतां रेडिओ बुडापेस्टच्या इमारतीसमोर दाटीवाटीनें गोळा झालेल्या हजारों लोकांच्या जमावावर हंगेरीच्या 'एव्हीएच्' गुप्त पोलिसदलाने बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला. त्या क्षणापासून बुडापेस्टमधील स्त्रीपुरुषांनीं व लहानलहान मुलांनीं आपल्या रक्तानें रोजनिशी लिहावयास सुरुवात केली. जणुं काय ती बंदुकीची फैर म्हणजे मनस्वी शौर्यशाली अशा निर्वाणीच्या स्वातंत्र्य-

युद्धाची घोषणाच ठरली. गेल्या एक हजार वर्षांत हंगेरी राष्ट्रानें स्वातंत्र्यासाठीं असा निकराचा लढा कधीच दिलेला नव्हता.

पण मी लिहिणार असलेल्या रोजनिशीस त्यापूर्वीच एक आठवडाभर आधीं सुरुवात झालेली होती. प्रत्यक्ष बंडाचा वणवा पेटला, त्यापूर्वी चार महिने, मला आठवतें, विद्यार्थीवर्ग अस्वस्थ होता. पण त्या अवस्थतेस निश्चित असा आकार आला, तो मात्र दि. १६ ऑक्टोबर रोजीं, मध्यरात्रीं.

आतां मी कॅनडामध्यें राहतों आहें. माझें नांव–म्हणजे माझें खरें नांव–कम्युनिस्टांच्या 'पाहिजे' असलेल्या बंडखोरांच्या काळ्या यादींत बरेंच वर आहे. ह्या यादीत एकूण ४३ विद्यार्थ्यांचीं नांवें सर्वात वर अग्रभागीं आहेत. ह्या ४३ विद्यार्थ्यांनीं 'फ्री स्टूडंट्स कौन्सिल'ची संघटना प्रथम स्थापन केली. कालांतरानें ह्याच विद्यार्थीसंघटनेचें नामांतर 'स्टूडंट्स रेव्होल्युशनरी कौन्सिल,' असें झालें.

मी कांही लेखक नव्हे. लेखक व्हावें, अशी इच्छा पण माझ्या मनांत कधीं नव्हती पण आतां येथें कॅनडामधील स्वतंत्र वातावरणांत मी लेखनाचा यत्न करीत आहें. युद्धापूर्वीच्या आणि नंतरच्या मिळून दोन आठवड्यांत जें काही घडलें त्या घटनांची संगति जुळविण्याचा यत्न मी करीत आहें.

हंगेरीतील त्या भव्य, दुःखान्त युद्धानें मला लिहिण्यास स्फूर्ति दिली, बळ दिलें. त्या बंडाविषयीं जें कांहीं मला आठवत होतें, तें सर्व कागदावर उतरून ठेवण्याची प्रेरणा दिली. मीं येथें आलों, तेव्हां बरोबर कांहीं टिपणें व रेखाचित्रें मीं आणलीं होतीं. त्यांच्या साह्मय्यानें मी वृत्तान्त लिहीत आहें.

● ● ●

दि. १९ ऑक्टोबर १९५८ रोजीं बुडापेस्टच्या सर्व विद्यापीठांचे एकूण ४३ विद्यार्थीप्रतिनिधि शहराबाहेरच्या एका माळरानावर गुप्तपणें एकत्र जमले आणि त्यांनीं एका 'स्वतत्र विद्यार्थीसंघटने'ची स्थापना केली. ह्या सभेनें जणुं दारूच्या कोठारालाच आग लावली. कारण तदनंतरच्या स्फोटांत कम्युनिस्टशासित हंगेरीच्या ठिकऱ्या उडाल्या आणि त्या स्फोटाच्या हादऱ्यानें सर्व जग उन्मळून निघालें.

ह्या विद्यार्थ्यांपैकींच एकानें लिहिलेली रोजनिशी येथें सादर केली आहे. ही रोजनिशी म्हणजे एका अपूर्व मानवसंघर्षाची मौल्यवान् कहाणी आहे. ज्यांचें शौर्यशाली जीवन ध्येयार्पित होतें अशा लोकांच्या भावनोत्कट आणि महान् त्यागाची ही कथा अशी आहे कीं, जी वाचून इतर मानवांना जगण्यासाठीं आणखी एक ध्येय मिळालें, असा विश्वास वाटेल.

अनुक्रमांक २५४६८ दि.
क्रमांक ... नों: दि: ... १२-२-५८
दा. क्र.

## पूर्व वृत्तान्त

दि. २३ ऑक्टोबर १९५६ रोजीं रात्रीं ११ वाजतां रेडिओ-बुडापेस्टच्या इमारतीसमोर दाटीवाटीनें गोळा झालेल्या हजारों लोकांच्या जमावावर हंगेरीच्या 'एव्हीएच' गुप्त पोलिसदलानें बंदुकीच्या गोळयांचा वर्षाव केला. त्या क्षणापासून बुडापेस्टमधील स्त्रीपुरुषांनीं व लहानलहान मुलांनीं आपल्या रक्तानें रोजनिशी लिहावयास सुरुवात केली. जणु काय ती बंदुकीची फैर म्हणजे मनस्वी शौर्यशाली अशा निर्वाणीच्या स्वातंत्र्ययुद्धाची घोषणाच ठरली. गेल्या एक हजार वर्षांत हंगेरी राष्ट्रानें स्वातंत्र्यासाठीं असा निकराचा लढा कधींच दिलेला नव्हता.

पण मी लिहिणार असलेल्या रोजनिशीस त्यापूर्वींच एक आठवडाभर आधीं सुरुवात झालेली होती. प्रत्यक्ष बंडाचा वणवा पेटला, त्यापूर्वीं चार महिने–मला आठवतें,– विद्यार्थीवर्ग अस्वस्थ होता. पण त्या अस्वस्थतेस निश्चित असा आकार आला, तो मात्र दि. १६ ऑक्टोबर रोजीं, मध्यरात्रीं.

आतां मी कॅनडामध्यें राहतों आहें. माझें नांव–म्हणजे माझें खरें नांव–कम्युनिस्टांना 'पाहिजे' असलेल्या बंडखोरांच्या काळ्या यादींत बरेंच वर आहे. ह्या यादींत एकूण ४३ विद्यार्थ्यांचीं नांवें सर्वांत वर अग्रभागीं आहेत. ह्या ४३ विद्यार्थ्यांनीं 'फ्री स्टूडंट्स कौन्सिल'ची संघटना प्रथम स्थापन केली. कालांतरानें ह्याच विद्यार्थीसंघटनेचें नामांतर 'स्टूडंट्स रेव्होल्युशनरी कौन्सिल' असें झालें.

मी कांहीं लेखक नव्हें. लेखक व्हावें, अशी इच्छा पण माझ्या मनांत कधीं नव्हती. पण आतां येथें कॅनडामधील स्वतंत्र वातावरणांत मी लेखनाचा यत्न करीत आहें. प्रत्यक्ष युद्धास तोंड लागण्यापूर्वीं विद्यार्थ्यांमध्यें जी जागृति

झाली आणि तदनंतर विद्यार्थी, कामगार आणि युवक योद्ध्यांनीं प्राणपणानें जी झुंज दिली, ती मीं माझ्या डोळ्यांनीं साक्षात् पाहिलेली आहे. युद्धापूर्वींच्या आणि नंतरच्या मिळून दोन आठवड्यांत जें कांहीं घडलें, त्या घटनांची संगति जुळविण्याचा यत्न मी करीत आहें. ह्या काळांत हंगेरीच्या स्वातंत्र्याची ज्योत क्षणभर मोठ्या दिमाखानें पेटली. नंतर लगेच ती ज्योत दडपून मालविण्यांत आली.

हंगेरींतील त्या भव्य, दु:खान्त युद्धानें मला लिहिण्यास स्फूर्ति दिली; बळ दिलें. त्या बंडाविषयीं जें कांहीं मला आठवत होतें, तें सर्व कागदावर उतरवून ठेवण्याची प्रेरणा दिली. मी येथें आलों, तेव्हां बरोबर कांहीं टिपणें व रेखाचित्रें मीं आणलीं होतीं. त्यांच्या साहाय्यानें मी हा वृत्तान्त लिहीत आहें.

बंडापूर्वींच्या दिवसांत हंगेरींतील विद्यार्थीवर्ग राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक काढण्यांनीं जखडलेला होता. पाश्चिमात्य धर्तीचे कपडे वापरणें, जाझ नृत्याविषयीं उत्सुकता दाखविणें, कलेच्या संबंधांत उदारमताची घोषणा करणें, इत्यादि वर्तन तेथें त्या काळांत 'कॉस्मापॉलिटन' समजलें जात असे. तेथील तथाकथित लोकशाहीच्या लेखीं हें असलें वर्तन गुन्हेगारीच्या स्वरूपाचें, भयंकर मानलें जात असे. एक लहानसें उदाहरण दिलें, तर मी काय म्हणतों त्याची सहज प्रचीति मिळेल. विद्यापीठांत जॉन नांवाचा माझा एक सहाध्यायी होता.– बंडाचा उठाव होण्यापूर्वीं कित्येक आठवडे ही घटना घडली.– एक दिवस जॉन जो वर्गांत आला तो नव्या सुटांत. रेघारेघांचा शर्ट घालून, वर नेकटाय लावून. अमेरिकेंत राहणाऱ्या त्याच्या एका चुलत्यानें त्याला नव्या सुटाची ही भेट पाठविली होती. त्याच्या पायांतील बूट नरम स्वीडचे होते. हंगेरींत असले बूट पैदा करण्यासाठीं एक महिन्याचा सर्व पगार खर्चीं टाकावा लागला असता. वर्ग सुटल्यावर जॉनला पार्टीऑफिसरनें बोलावून घेतलें. त्यानें जॉनची चांगली खरडपट्टी काढली; आणि नंतर लगेच त्याचें नांव विद्यापीठाच्या रजिस्टरमधून काढून टाकण्यांत आलें.

माझ्या पूर्वायुष्याविषयीं मला फारसें सांगतां येणार नाहीं. माझे आईबाप अजून हंगेरींत आहेत. १९३२ सालीं बुडापेस्टमध्यें माझा जन्म

झाला. बुडापेस्टच्या एका उपनगरांत माझें शालेय शिक्षण झालें. शाळेंतूनच सैन्यांत माझी भरती करण्यांत आली. त्या वेळीं माझ्या वयाचीं सतरा वर्षें पुरीं झालीं होतीं; आणि वर आणखी सहा महिने झाले होते. 'कम्युनिकेशन्स कोअर'मध्यें मला काम देण्यांत आलें होतें. रेडिओ, टेलिफोन आणि इलेक्ट्रॉनिक संदेश देण्याघेण्याच्या कामीं माझी योजना करण्यांत आली होती.

हंगेरिअन सैन्यांत कित्येक महिने मीं काम केलें. ह्याच काळांत मीं चित्रें काढावयास शिकलों. शाळेंत असतांना नकाशे काढण्याची मला आवड होती. आणि लष्करी शाळेंत ड्रॉइंगचें थोडेंबहुत शिक्षण आम्हांला सर्वांनाच मिळालें होतें. लष्करी शिक्षणाचा अभ्यासक्रम पुरा झाल्यावर कलेच्या प्रेमामुळें मी पुन्हा विद्यापीठाच्या परिसरांत आलों. कलाविभागांत मला प्रवेश मिळेल काय ? म्हणून मीं विचारणा केली. माझ्या उलटतपासणींत बराच वेळ गेला. माझें सारें पूर्वचरित्र काळजीपूर्वक तपासण्यांत आलें. कांहीं पूर्वपरीक्षा द्याव्या लागल्या. हे सर्व सोपस्कार यथासांग पार पडल्यावर कलाभ्यासाची परवानगी मला देण्यांत आली. त्याच वेळीं माझें वर्तन ठीक दिसलें, तर स्कॉलरशिपसाठीं मला अर्ज करतां येईल, असें सांगण्यांत आलें.

सैन्यांतील माझा पुष्कळसा वेळ कम्युनिझमच्या द्वेषाचे धडे गिरविण्यांत खर्चीं पडला. तोंपर्यंत कम्युनिस्ट सैन्याविषयीचा तिरस्कार माझ्या रोमरोमांत भिनला होता. कम्युनिझमपासून शक्य तों दूर राहण्याची संधि मिळावी, म्हणून मीं विद्यापीठाचा आश्रय केला. कलेच्या साधनेंत नको तें सारें विसरतां येईल, असा माझा कयास होता.

माझ्या वर्गांत गोड चेहेऱ्याची एक मुलगी होती. ईव्हा तिचें नांव. तिच्या मुद्रेवरील स्मित मोठें आकर्षक होतें. ज्या ज्या गोष्टींचा कम्युनिझमशीं संबंध होता, त्या त्या सर्व गोष्टींपासून तिनें मला दूर ओढून नेलें. एक वर्षापूर्वीं मीं तिच्याशीं लग्न केलें. जेथें म्हणून कम्युनिस्टांचें राज्य आहे, तेथें तरुणांच्या सर्व हालचालींवर असह्य दडपण असतें. तरुण मनें खर्ची कशीं करावींत, तें कम्युनिस्ट राज्यकर्ते चांगले जाणतात. अशा स्थितींत ईव्हानें माझ्या आयुष्याला चांगलें वळण लावण्यासाठीं पुष्कळ परिश्रम केले.

क्रांति अजून दृष्टिपथांत नव्हती. त्या वेळींच ईव्हाला अपत्यसंभवाची चाहूल लागली.

आमची उभयतांची 'उत्तम' प्रगति असल्यामुळें आम्हांला, दोघांना प्रत्येकीं दरमहा ४०० फ्लोरिन्सची शिष्यवृत्ति मिळाली. आमच्या शिक्षणाचा सर्व खर्च परस्पर सरकार करीत असल्यामुळें आमच्या उभयतांच्या जोड-प्राप्तींत संसाराचा खर्च कसाबसा निभत असे. एका थंडगार खोलीचें भाडें आणि गरिबीचें अन्नवस्त्र एवढा खर्च ८०० फ्लोरिन्समध्यें भागे. खोलीचें भाडें दरमहा ३५० फ्लोरिन्स होतें. विद्यापीठाच्या भोजनगृहांत जें जेवण मिळे, त्यासाठीं दररोज २० फ्लोरिन्स मोजावे लागत रविवारीं आम्ही दोघेंहि अन्नाविना उपाशी राहत असूं. कारण त्या दिवशीं विद्यापीठास सुटी असे. एखाद्या हॉटेलमध्यें जेवण्याचा खर्च आमच्या चिमुकल्या संसाराला परवडण्यासारखा नव्हता. तेव्हां त्या खर्चाची बचत करून संसारास अत्यावश्यक त्या वस्तु आम्ही घेत असूं. संसाराचा सर्व खर्च आमच्यापैकीं कोणीं एकानें अर्धवेळ कांहीं नोकरी केली असती, तर कदाचित भागला असता. पण पार्ट–टाइम जॉब मिळत नसे. एखाद्या प्रदर्शनाचें पोस्टर रंगविण्याचें काम क्वचित् कधीं मिळे; किंवा विद्यापीठांत असेंच कांहींबाही काम कधीं-मधीं मिळत असे. अशा कामापासून होणारी प्राप्ति अशी कितीशी असणार?

एका फ्लोरिनची काय किंमत होती? बाजारांतील वस्तु विकत घेण्याच्या दृष्टीनें केवळ अत्यल्प अशी होती. ३५० फ्लोरिन्स खर्च केले, तर एखादी ओबडधोबड बूटजोडी बाजारांत मिळे; किंवा त्याच किंमतींत एक शर्टजोडी मिळे. किंवा ४०–पर–सेंट रम्च्या तीन बाटल्या मिळूं शकत.

कित्येक महिने झाले आतां त्या गोष्टीला. 'कम्युनिस्ट यूथ' संस्थेच्या एका सभेला मी जाऊं शकलों नाहीं. कारण त्या दिवशीं माझी बायको आजारी होती. 'कम्युनिस्ट यूथ' संस्थेचा सभासद असणें केवळ आवश्यक होतें. आणि प्रत्येक सभेस हजर राहण्याची पण सक्ति होती. त्या दिवशीं मी सभेला जाऊं शकलों नाहीं. म्हणून पार्टीसेक्रेटरीनें मला ५० फ्लोरिन्स दंड भरण्याची शिक्षा फर्मावली.– ५० फ्लोरिन्स म्हणजे जवळपास एक आठवड्याचें जेवणच म्हणाना. आणि वर पुन्हा त्यानें मला तंबी दिली, ती वेगळीच.– 'याद राख. ह्या वेळीं नुसत्या दंडावरच तुला सोडून देतों आहें. पण फिरून कधीं अशी चूक केलीस, तर मात्र तुझी फाईल युनिव्हर्सिटी डायरेक्टरच्या हवालीं करावी लागेल.'

ह्याच वेळीं आमच्यापैकीं कांहीं जण गुप्तपणानें इंग्रजी भाषेचा अभ्यास करावयास लागले.

लिबर्टी स्क्वेअरमध्यें ब्रिटिश लीगेशनचें ऑफिस होतें. तेथें आम्ही कोणाला न कळत गुपचूप जावयास लागलों. तेथें आमचें स्वागत सदा मोकळेपणानें होत असे. ब्रिटिश लीगेशनमधील एका सांस्कृतिक अधिकाऱ्याशीं माझ्या एका विद्यार्थी–मित्राची ओळख होती. 'संधि मिळेल तेव्हां तुझ्या विश्वासू मित्रांना तूं येथें घेऊन येत जा.'–– असें त्याचें माझ्या मित्राला सांगणें होतें, म्हणून मी गेलों. तेव्हां तो उंच, काळसर वर्णाचा अधिकारी अगत्यपूर्वक मला म्हणाला, 'हें बघ मित्रा, जेव्हांकेव्हां तूं ह्या रस्त्यानें जाशील, तेव्हां तूं इथें अवश्य येत जा. आमच्या ह्या इमारतीचीं दारं सदा खुलीं असतात.'

१९५६ च्या पूर्वार्धांत ही घटना घडली.

त्यानंतर वारंवार आम्ही तेथें जात असूं. कधींकधीं तेथें आम्हांला फिल्मस् दाखवीत. डीना डर्बिन आणि रॉबर्ट टेलर ह्यांजसारख्या नटनटींचीं त्यांत कामें असत. असल्या फिल्मस् बघत असतांना आमच्या मनावर सर्वांत अधिक कशाचा परिणाम झाला असेल, तर तो त्या चित्रपटांतील अद्भुत वातावरणाचा. सर्व सुखसोयींनीं समृद्ध असलेल्या राजविलासी जीवनाचीं चित्रें आम्हांला केवळ असंभवनीय वाटत. एका फिल्ममध्यें ट्रक–ड्रायव्हरचें घर दाखविण्यांत आलें होतें. अमेरिकेंतील एका सामान्य गरीब माणसाचें तें घर आमच्या बुडापेस्टमधील एखाद्या बड्या सरकारी अधिकाऱ्याच्या अलीशान बंगल्यासारखें दिसत होतें. एखादा यःकश्चित ट्रक-ड्रायव्हर अशा ह्या घरांत कसा राहूं शकतो, त्याचेंच आम्हांला आश्चर्य वाटलें.

ब्रिटनमधील संस्कृतीचें व जीवनाचें दर्शन घडविणाऱ्या कांहीं डॉक्युमेंटरी फिलमस् आम्हीं पाहिल्या. त्याचप्रमाणें साध्यासाध्या गोष्टींच्या पण पाहिल्या. सप्टेंबर महिन्यांत पंधरा तारखेच्या सुमाराला केव्हां तरी आम्हीं लीगेशनला अखेरची भेट दिली. त्या वेळीं दुसऱ्या महायुद्धाची एक फिल्म आम्हीं पाहिली. एका पाणबुड्या बोटीच्या पाठलागाचीं दृश्यें त्या चित्रपटांत पाहिल्याचें आठवतें. प्रत्येक वेळीं आम्ही तेथें गेलों कीं 'इन्फर्मेशन बुलेटिन'चे एकदोन अंक आम्ही खिशांत घालून नेत असूं. ह्या वेळींसुद्धां

मीं दोन अंक खिशांत कोंवले. माझ्याबरोबर आणखी दोन मित्र होते. त्यांनीं कांहीं पँफ्लेट्स बरोबर घेतलीं.

लीगेशनमधून बाहेर पडल्यावर थोडेसें अंतर आम्हीं चालून गेलों नाहीं, तोंच 'एव्हीएच' गुप्त पोलिसांनीं आम्हांला हटकलें. त्याच वेळीं आमच्या लक्षांत येऊन चुकलें कीं आमच्या हालचाली त्यांच्या नजरेंतून सुटल्या नव्हत्या. त्यांनीं आमचीं आयडेंटिफिकेशन कार्डस मागितलीं. त्यानंतर ते आम्हांला डिस्ट्रिक्ट पोलिस ऑफिसमध्यें घेऊन गेले. तेथें दुसऱ्या एका अधिकाऱ्यानें आमची झडती घेतली. आमच्या खिशांतील बुलेटिन्स बघून त्यांनीं आम्हांला अनेक आडवेतिडवे प्रश्न विचारले. आणि आम्ही जणुं त्या गांवचेच नाहीं, असा कांगावा केला.

'आतां तुम्ही घरी जाऊं शकतां.' शेवटीं ते म्हणाले, 'पण तुमचीं ही आयडेंटिफिकेशन कार्डस मात्र इथेंच ठेवून जा.'

तुरुंगवासाच्या शिक्षेसारखीच ही शिक्षा भयंकर होती. आयडेंटिफिकेशन कार्ड ज्याच्याजवळ नाहीं, तो मनुष्य समाजांत असून नसल्यासारखाच होता. कारण मग त्याला कसली म्हणून नोकरी मिळण्याची शक्यताच नव्हती. त्याच्यावर कोणीं विश्वास ठेवला नसता. फारफार तर एखाद्या खाणीत नाहीं तर कारखान्यांत मजुरी करण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हतें.

दोन दिवसांनंतर विद्यापीठाच्या प्रमुख अधिकाऱ्यानें आम्हांला आपल्या ऑफिसमध्यें बोलावून घेतलें. त्याच्या पुढ्यांत एक फाइल होती. फिकट गुलाबी रंगाच्या कागदावर व्यवस्थित टाइप केलेला आमच्या हालचालींचा संपूर्ण लेखी वृत्तान्त त्याच्या हातांत होता. 'तूर्त तात्पुरती शिक्षा म्हणून तुमच्या स्कॉलरशिप्स रद्द केल्या आहेत,' असें त्यानें आम्हांस सांगितलें. पुन्हा कधीं आम्हीं लीगेशनमध्यें पाऊल टाकलें किंवा इंग्रजी भाषा शिकण्याचा यत्न केला, तर त्या गुन्ह्याचे परिणाम फार गंभीर होतील, असें त्यानें आम्हांला निक्षून सांगितलें. त्यामुळें विद्यापीठांतील आमचें वास्तव्य तर संपुष्टांत येईलच पण लोकशाही सरकारला आमच्या वर्तनाचा जाब द्यावा लागेल, असें आम्हांला सांगण्यांत आलें.

त्यानंतर पोझ्नान नांवाच्या पोलिश शहरांत जून महिन्यांत विद्यार्थ्यांनी एका निदर्शनाचें नेतृत्व केल्याची वार्ता येऊन थडकली. त्या

निदर्शनाचे परिणाम तेथील नागरी जीवनावर काय व कसे घडले, त्यांचा खोटानाटा वृत्तान्त आमच्या वाचनांत आला. त्यावरून आम्हांला एक गोष्ट मात्र स्पष्ट कळून चुकली. ती ही कीं ते विद्यार्थी स्वातंत्र्यासाठीं निदर्शनें करीत होते.

त्यानंतर दक्षिण हंगेरीमधील झेगेड युनिव्हर्सिटीचा एक विद्यार्थी आमच्या विद्यापीठांत अचानक दाखल झाला. त्यानें आणलेली वार्ता विलक्षण होती. १६ ऑक्टोबर रोजीं तेथील विद्यार्थी–संघानें 'कम्युनिस्ट यूथ' संस्थेशीं असलेले सर्व संबंध तोडून टाकले होते. ही बातमी मिळाल्यावर आम्ही स्वस्थ बसणें शक्यच नव्हतें. बुडापेस्टमधील विद्यार्थ्यांनीं कृति करण्याचा क्षण येऊन ठेपला होता.

आणि त्यानंतर जो आगडोंब उसळला, त्यांतील घटनांची नोंद मीं माझ्या डायरींत करून ठेविली आहे. ती येणेंप्रमाणें:

● ● ●

## ऑक्टोबर १६, १९५६

**नुकतेंच** तांबडें फुटलें होतें. दिशा उजाडल्या होत्या. बुडापेस्टमधील बेला बार्टोक स्ट्रीटवरील एका घरांत मी फोन करण्यासाठीं गेलों. तबडकीवरील योग्य ते आंकडे फिरवून लाँग डिस्टन्स ऑपरेटरला 'झेगेड युनिव्हर्सिटींतील फँकशीं मला बातचीत करावयाची आहे,'–म्हणून सांगितलें. फँक माझा चुलत भाऊ. मध्यंतरीं कांहीं सेकंद मी चुळबुळ करीत अस्वस्थ उभा होतों. प्रत्येक सेकंद मिनिटाप्रमाणें वाटत होतें. दुरून त्या टोंकावरून माझ्या भावाचा आवाज ऐकूं आला. त्या आवाजांत विलक्षण उत्साह होता.

"हॅलो लाझलो ? हॅलो,..."

"फँक,"–मीं ओरडून विचारलें, "काय रे, तूं नवा सूट घेतलास म्हणे. जुना टाकून दिलास होय ?"

झेगेड ते बुडापेस्ट एकशेंतीस मैलांचें अंतर तोडून फँकचें उत्तर खणखणीत मिळालें,––"होय. मीं सूट बदलला आहे...आम्हीं सर्वांनींच जुने सूट्स टाकून दिले आहेत."

ती बातमी खरी होती तर! झेगेडमधील विद्यार्थ्यांनीं कम्युनिटांशीं मुकाबला करण्याचे ठरविलें होतें. 'कम्युनिस्ट यूथ' संस्थेशीं जोडलेले सर्व संबंध त्यांनीं एका क्षणांत तोडून टाकले होते.

तेथील एका विद्यार्थ्यानें ही बातमी आम्हांला आधींच दिली होती. पण तरीसुद्धां आम्हांला खात्री करून घ्यावयाची होती. बुडापेस्ट शहरांतून होणारीं लाँग डिस्टन्स संभाषणें टेपरेकॉर्ड केलीं जातात, नंतर टेलिफोनचे अधिकारी हीं सर्व संभाषणें काळजीपूर्वक ऐकतात; हें सर्व आम्हांला चांगलें माहीत होतें. झेगेडमध्यें फँक हा आमचा एकच एक दुवा होता. आम्हांला

आशा होती कीं आमच्या प्रश्नाचें मर्म त्याला बरोबर समजेल. आमचा तर्क खरा ठरला होता.

पोझ्नानमधील बंडाळीचें वृत्त येऊन थडकल्यावर हंगेरींतील विद्यार्थ्यांनीं बंड पुकारण्याचा विचार चालविला होता. झेगेड विद्यापीठांतील तीन हजार विद्यार्थ्यांनीं हा विचार प्रथम कृतींत आणला होता.

'फ्रँकनें नवा सूट चढविला आहे.'—कागदाच्या एका कपटयावर मीं लिहिलें,—'तेथील सर्व विद्यार्थ्यांनीं नवे सूट घातले आहेत.'

ऑक्टोबर बंडांतील प्रमुख घटनांची नोंद मीं ह्या अशा कपटयांवर करून ठेवली आहे. त्यांतील ही पहिलीच नोंद. हे कागदाचे कपटे पुढें डायरी लिहितांना माझ्या कामीं आले.

झेगेडमधील विद्यार्थ्यांनीं स्वातंत्र्यासाठीं निदर्शन करण्याचा निश्चय केला आहे, ह्याविषयीं माझ्या भावानें आमची खात्री पटविली. नंतर बुडा-पेस्टमधील केलेनफोल्ड भागांत एका कोंदट, थंडगार खोलींत आम्ही सहा जण भेटलों. बुडापेस्टमध्यें फार मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचें असें एखादें निदर्शन घडवून आणण्याची कितपत शक्यता आहे, त्याविषयीं आम्हीं विचार केला. आमचें खलबत चालू असतांना 'एव्हीएच्' गुप्त पोलिस येऊन थडकले, तर काय होईल? हा विचार मनांत येतांक्षणीं आमची पांचावर धारण बसली. त्या दिवसांत दोनापेक्षां अधिक विद्यार्थी कोठें एकत्र जमलेले दिसले तरी ते सरकारविरुद्ध कट करीत आहेत, असा संशय लगेच घेतला जात असे. विशेषत कम्युनिस्ट फाइलसमध्यें ज्या विद्यार्थ्यांच्या नांवांपुढें काळ्या निशाण्या होत्या, ते तर प्रत्यक्ष कटवालेच आहेत, असें गृहीत धरूनच गुप्त पोलिस वागत.

"बुडापेस्टमध्यें आपल्याला कांहीं तरी करणं भाग आहे"—आमच्यांतील एक विद्यार्थी चार्ल्स इम्रे म्हणाला, "आतां प्रश्न असा कीं निदर्शनासाठीं कोणतं कारण शोधायचं? मला एक कारण सुचतं आहे. विद्यापीठाच्या फॅकल्टीमधील सर्व स्टालिनिस्ट प्रोफेसर्स काढून टाकावेत, अशी मागणी आपण करूं."

"ठीक आहे. कम्युनिस्ट प्रोफेसर्स आम्हांला नकोत, ही घोषणा चांगली आहे."—दुसरा एक विद्यार्थी लगेच म्हणाला.

हा निर्णय घेणें अगदीं सोपें होतें. आमच्या विद्यापीठांत बिगर-कम्युनिस्ट प्रोफेसर्स बहुसंख्य होते आणि कम्युनिस्ट प्रोफेसर्सविषयीं आमच्या सर्वांच्याच कांही ना कांहीं तक्रारी होत्या.

**त्या** दिवशीं आम्हीं सर्वांनीं लेक्चर्सना दांडी मारली आणि मध्यरात्रीपर्यंत ह्याच एका विषयासंबंधीं सर्वत्र बोलत फिरलों. झेगेडमधील विद्यार्थ्यांचा संदेश शक्य तेवढ्या विद्यार्थ्यांच्या कानीं आम्हीं घातला. दुसऱ्या कांहीं ओळखीच्या विद्यार्थ्यांशीं आम्ही टेलिफोनवर बोललों. त्यांचीं पण आमच्यासारखींच खलबतें चाललीं होतीं. अखेरीस पहाटे तीन वाजतां आम्हीं सर्वांनीं कृतीसंबंधीं कांहीं एक निर्णय घेतला. तो निर्णय सर्व विद्यार्थ्यांना कळावा, ह्यासाठीं एखादी सभा घेणें आवश्यक होतें. तत्पूर्वी जेवढे म्हणून विद्यार्थी भेटतील, त्यांच्याशीं ह्यासंबंधीं बोलणीं करावीत असें ठरविण्यांत आलें.

• • •

## ऑक्टोबर १७, १९५६

**सकाळीं** ७ वाजतां दोन दोस्तांशीं बातचीत करण्यासाठीं गेलों. रस्त्यांतील काळोख वितळत होता. उजाडत होतें. माझ्या मित्रांपैकीं एक जण ड्रामा कॉलेजमध्यें शिकत होता. दुसरा फाइन आर्ट्सकडे होता. माझे पांचहि मित्र त्यांच्या त्यांच्या जिव्हाळ्याच्या मित्रांच्या गांठीभेटी घेत होते. अशा रीतीनें रातोरात अनेक विद्यार्थ्यांच्या कानीं आमच्या निर्णयाची वार्ता गेलेली होती. बुडापेस्टमध्यें दहा हजार विद्यार्थी होते. आमचा निर्णय कानोकानीं झपाट्यानें पसरत चालला होता. आम्हीं ज्यांना सांगितलें, ते इतरांना सांगत होते. ज्यांना कळलें, ते अजूनपर्यंत ज्यांना कळलें नव्हतें, अशांच्या गांठीभेटी घेत होते.

सकाळीं दहा वाजतां आम्ही सर्व जण मिळून विद्यापीठांत गेलों. वर्गावर्गांतून पसरलों.

लेक्चर्स ऐकण्याच्या मनःस्थितींत मीं नव्हतों. एक पेंटिंगचा तास सोडला तर बाकीचे सर्व तास मीं त्या दिवशीं बुडविले. विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया

अनुक्रमांक २४५६८ दि.
क्रमांक ८५३ नों. दि. १२-२-५९


जाणण्याची मला जिज्ञासा होती. शक्य तेथें थवे करून विद्यार्थी उभे होते. झेगेडमध्यें खरोखर काय घडलें, त्याची खबर कोणालाच नव्हती. पण सांगोवांगीं पसरलेल्या बातम्या सर्व जण कान देऊन ऐकत होते. शक्य तेथें गुपचूप चर्चा करीत होते.

जे कम्युनिस्ट नव्हते, अशा अनेक तरुण शिक्षकांना सर्व कांहीं माहीत होतें. त्यांच्यापैकीं एक जण माझ्याजवळ आला आणि माझ्या कानाशीं लागून म्हणाला, "तुमची कांहीं तरी गडबड चाललेली दिसते आहे. जीते रहो ! शक्य ती सारी मदत मी देईन."

नंतर माझ्या कानीं आलें, तें असें कीं अनेक शिक्षकांनीं विद्यार्थ्यांच्या ह्या चळवळीस पाठिंबा देण्याचें स्वयंस्फूर्तीनें ठरविलें होतें. एवढेंच केवळ नाही, तर फॅकल्टी कौन्सिलच्या सभेंत त्यांनी विद्यार्थ्यांनीं केलेल्या मागण्या उचलून धरल्या होत्या. खरें म्हणजे आम्ही ज्या कांहीं योजना आंखल्या होत्या, त्या आमच्या आवाक्याबाहेरच्या आहेत, असें कांहीं शिक्षकांना वाटत होतें. त्यांचीं लेक्चर्स चालू असतांना किंवा तीं संपल्यानंतरच्या मधल्या वेळांत आमची जी काय चर्चा चालत असे, ती त्यांच्या कानीं गेली असती, तर त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला असता.

आमच्या योजनेंतील पहिलें कलम एका सभेचें होतें. ही सभा आम्हीं आमच्या विद्यापीठांतच दुपारीं चार वाजतां बोलाविली होती. ह्या सभेचा हेतु कम्युनिस्टांशीं बोलणीं करण्याचा होता. कोणाला लेखी आमंत्रणें पाठवावयाचीं म्हटलें तर तितका अवधि मुळींच नव्हता. पण प्रमुख कम्युनिस्टांना ह्या सभेंत बोलावणें आवश्यक होतें. म्हणून आम्हीं टेलिफोनवर त्या सर्वांशीं बातचीत केली. रेडिओ बुडापेस्टचा कम्युनिस्ट अधिकारीवर्ग कम्युनिस्ट वृत्तपत्रें, हंगेरिअन शिक्षणखात्याचे वरिष्ठ अधिकारी आणि कम्युनिस्ट पार्टीचे अत्युच्च पदाधिकारी, ह्या सर्वांना युनिव्हर्सिटींत कौन्सिलच्या वतीनें आम्ही सभेचीं आमंत्रणें दिलीं एक अत्यंत महत्त्वाची सभा आम्ही विद्यापीठांत घेत आहोंत, तेव्हां आपण जरूर उपस्थित राहावें, अशी आम्हीं त्या सर्वांना विनंती केली.

सभेस बरोबर चार वाजतां सुरुवात झाली. ह्या सभेस आमच्या कॉलेजचे तीनशें विद्यार्थी हजर होते विद्यापीठाच्या इतर विभागांचे आणि

संलग्न कॉलेजांचे वीस विद्यार्थी उपस्थित होते. पंचवीस निमंत्रित पाहुणे होते. त्यांजमध्यें 'झाबड नेप' (कम्युनिस्ट, स्वतंत्र लोक); 'झाबड इफजुसाग' (स्वतंत्र तरुण), 'झिलाग' (तारा) ह्या वृत्तपत्रांचे वार्ताहर होते. शिक्षणखात्यांतील अनेक विभागांचे प्रमुख आणि कम्युनिस्ट पार्टीचे दोन सेक्रेटरीज् सभेला आले होते.

सभागृहांतील वातावरण औत्सुक्यानें भरलेलें होतें. श्रोत्यांमध्यें शांतता होती; पण ती स्फोट होण्यापूर्वीची शांतता होती. कम्युनिस्ट पदाधिकारी सभागृहांत आले, तेव्हां कांहीं उत्साही विद्यार्थ्यांच्या मनांत त्यांची हुर्यो करण्याचे विचार दिसत होते. पण भोंवतालच्या कांहीं शहाण्या विद्यार्थ्यांनीं त्यांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांना गप्प बसविलें. विद्यार्थीश्रोते दगडां-सारखे स्तब्ध बसून होते. सभेचे संचालक सभा केव्हां सुरू करतात, ह्याची वाटच बघत होते.

चार्ल्स इम्रे प्रथम बोलण्यासाठीं उभा राहिला. आपल्या भाषणांत आरंभींच त्यानें झेगेड निदर्शनांचा निर्देश केला आणि विद्यार्थ्यांच्या बंडाचें महत्त्व समजावून सांगितलें. विद्यापीठांतील स्टालिनिस्ट प्रोफेसरांचा उल्लेख त्यानें भाषणाच्या ओघांत साभिप्राय केला. त्याच्यामागून बोलणाऱ्या वक्त्यांनीं ह्या अखेरच्या मुद्याचा चांगला पाठपुरावा केला.

नंतर मी बोलावयास उठलों. अर्धा तासपर्यंत मी आवेशानें बोललों. स्वतंत्र मत आणि विचार दडपून टाकण्याचा कम्युनिस्ट यत्न करतात, हें बरें नव्हे, ती त्यांची चूक आहे, असें आम्हांला वाटतें. कम्युनिस्टांच्या दड-पणामुळें कलेचे विद्यार्थी स्वतंत्र वातावरणांत काम करूं शकत नाहींत; त्यांची कुचंबणा होते, असें मी म्हणालों. इंग्रजी भाषेचा आणि पाश्चात्य कलाकृतींचा अभ्यास करण्याचें स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना मिळावें, अशी मीं मागणी केली. शेवटीं आमच्या आर्टस कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या वतीनें कॉलेजमधील स्टालिनिस्ट प्रोफेसरांच्या अविलंब बडतर्फीची मीं मागणी केली. आमच्या कॉलेजांतील कट्टर स्टालिनिस्ट प्रोफेसर्स म्हणून मीं ओव्हारी, शूबर्ट आणि व्हार्गा ह्यांचा नामनिर्देश केला.

भाषणें चालू असतांना सर्व श्रोते अगदीं शांत बसून होते. नियोजित भाषणें झाल्यावर कित्येक विद्यार्थ्यांनीं आपणांस बोलण्याचा हक्क आहे, म्हणून बोलण्याची संधि आपल्याला मिळावयास हवी, अशी मागणी केली.

त्यांची मागणी अर्थातच मंजूर करण्यांत आली. ज्यांनीं उत्स्फूर्त भाषणें केलीं, ते मोठ्या उत्साहानें भराभर बोलले. लहानसर दिसणारा, फिकट चेहेऱ्याचा चष्मेवाला एक विद्यार्थी त्याची पाळी आली, तेव्हां जागेवर उठून उभा राहिला आणि जोरांत ओरडला, " तो व्हार्गा ! नुकतंच त्यानें एक मोठं घर विकत घेतलं आहे. हें नवं घर त्यानें कसं घेतलं, माहीत आहे ? युनिव्हर्सिटीच्या बॅन्केनें त्याला चाळीस हजार फ्लोरिन्सचं कर्ज दिलं. ह्या कर्जांतून त्यानें मोठा बंगला उभारला ! '

एक तरुण मुलगी बोलण्यासाठीं पुढें आली. ती म्हणाली, "माझी एक मैत्रीण आहे. ड्राफ्टिंगच्या वर्गांत तिचा पहिला नंबर आहे. तिला पहिला नंबर कसा मिळाला, माहीत आहे ? तिचं ड्राफ्टिंग चांगलं आहे, असं मुळींच नाहीं. शूबर्टची ती मोठी लाडकी आहे.– तिच्या मुलाचा संभाळ तो करतो आहे, असं माझ्या कानांवर आलं आहे."

त्या दिवशीं लागोपाठ अनेक विद्यार्थी मनास येईल तें बोलले. त्यांनीं तक्रारींचा वर्षाव केला. ज्याला कोणाला बोलावयाचें होतें, त्या प्रत्येकाला बोलण्याची संधि देण्यांत आली.

विद्यार्थी मुक्तकंठ बोलत होते. कम्युनिस्टांवर त्वेषानें तुटून पडत होते. त्यांची टीका अगदीं असह्य झाली, तेव्हां कित्येक कम्युनिस्ट रिपोर्टर्स आणि प्रोफेसर्स आपल्या जागा सोडून उठले; आणि दारांच्या दिशेनें धांवले. हे असे धांवणार, ह्याची आम्हांला अगोदरपासूनच कल्पना होती. पुढें काय घडणार, तें ओळखून अगोदरपासूनच आम्हीं सर्व बंदोबस्त जय्यत करून ठेवला होता. पहिल्या वक्त्याचें भाषण पुरें होण्यापूर्वींच सभागृहाचे सर्व दरवाजे कुलूपबंद करण्यांत आले होते. तेव्हां सभा यथासांग पार पडेपर्यंत खोळंबून त्यांना बसावेंच लागलें. ––आणि सभा संपली, ती रात्रीचे ११ वाजून गेल्यावर !

तिकडे बाहेर इतर विद्यार्थ्यांनीं कम्युनिस्टांच्या मोटरींचीं एकूणएक चाकें खोलून हलविलीं होतीं. हीं सर्व चाकें एकत्र गोळा करून त्यांनीं जवळच्या एका टेकडीवर नेलीं होतीं; आणि मग तेथून मोठ्या समारंभानें खालच्या दरींत ढकलून दिलीं होतीं. !

● ● ●

*ऑक्टोबर १८, १९५६*

**ह्यानंतर** जें काय व्हावयाचें तें यथासांग झालें. अर्थातच आम्हीं जें काय केलें, त्याचा बदला घेतला जाईल, हें आम्हांला माहीत नव्हतें, असें थोडेंच आहे? तेव्हां मला, माझ्या बायकोला आणि आमच्याबरोबर आणखी इतर कित्येक विद्यार्थ्यांना जेव्हां अधिकारीवर्गानें दमदाटी करण्यासाठीं बोलावून घेतलें, तेव्हां त्याचें आम्हांला कोणाला मुळींसुद्धां आश्चर्य वाटलें नाहीं. आम्हांला सर्वांना शिक्षा मिळाली, ती बडतर्फीची. ही शिक्षा मिळणार, हें पण आम्ही सर्वजण गृहीतच धरून चाललों होतों.

डिसिप्लिन बोर्डासमोर एकामागून एक सर्वांना उभें राहावें लागलें. डायरेक्टरनें इतर कोणास काय सांगितलें, तें मला माहीत नाहीं. पण मला उद्देशून तो जें कांहीं बोलला, त्यांतील प्रत्येक शब्द अन् शब्द अजून माझ्या कानांत घुमत आहे. तो म्हणाला :

"गेले कांहीं दिवस तुझ्या वर्तणुकीवर आमची सक्त नजर होती."— बोलत असतांना हातांतील लठ्ठ मनिला फाईल त्यानें पुढच्यांतील टेबलावर दाणदिशीं आदळली.— "सरकारविरोधी कृत्यांत तुझा हात आहे, हें आम्हांला पूर्वीपासून माहीत आहे. विद्यापीठानें तुझ्यावर जो विश्वास टाकला, त्या विश्वासाला तूं लायक नाहींस. लोकशाही सरकारच्या मदतीनें चालविलेल्या विद्यापीठाचा तूं विश्वासघात केला आहेस. तूं हा जो द्रोह केलास, त्याची तुला शरम वाटावयास हवी... आणि आम्ही तुला स्कॉलरशिप दिली होती! लोकांचे पैसे तूं सरळ चोरलेस, असाच तुझ्या ह्या वर्तनाचा अर्थ आहे..."

आम्ही जो लढा लढत होतों, त्याच्याशी सहानुभूति दाखवावी, म्हणून आज दिवसभर सर्व विद्यार्थी वर्गांत गेलेच नाहींत. त्यांनीं हरताळ पाडला. आणि रात्रीच्या सभेंत केलेल्या मागण्या ते धरून बसले. कम्युनिस्ट स्टालिनिस्ट प्रोफेसरांना बडतर्फ केल्याशिवाय आम्ही वर्गांत जाणार नाहीं, असा ते हट्ट धरून बसले. इतर कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं पण तोच मार्ग धरला. जेथें जेथें विद्यार्थ्यांनीं निदर्शनें केलीं, तेथें तेथें विद्यार्थ्यांच्या पुढाऱ्यांना त्या त्या शिक्षणसंस्थांतून काढून टाकण्यांत आलें.

ह्या सर्व घटनांतून एक गोष्ट स्पष्ट झाली. ती ही कीं ह्यापुढें आम्ही सर्व विद्यार्थ्यांनीं जें काय करावयाचें, तें एकजुटीनें करावयास हवें...

● ● ●

## *ऑक्टोबर १९, १९५६*

**आज** बुडापेस्टमध्यें 'फ्री कौन्सिल ऑफ युनिव्हर्सिटी' नांवाच्या नव्या विद्यार्थी–संघटनेची स्थापना करण्यांत आली. प्रत्येक युनिव्हर्सिटीचे आणि कॉलेजचे पांच विद्यार्थीप्रतिनिधि ह्या कौन्सिलवर घेण्यांत यावेत, असें ठरविण्यांत आलें होतें. एकूण विद्यार्थी-प्रतिनिधींची संख्या ४३ भरली.

आमच्या युनिव्हर्सिटीचे जे पांच प्रतिनिधि होते, त्यांजपैकीं तिघे जण युनिव्हर्सिटीनें माझ्याबरोबरच काढून टाकलेले असे होते. एक जण मात्र अद्यापपर्यंत युनिव्हर्सिटींत टिकून होता. कौन्सिलची स्थापना तर झाली; आतां प्रश्न होता तो जागेचा. सभा कोठें घ्यावयाची ? प्रत्येक युनिव्हर्सिटीच्या आणि कॉलेजच्या परिसरावर गुप्त पोलिसांचा सक्त पहारा होता.

मॅग्नाचार्टावर सह्या करण्यासाठीं जे ब्रिटन्स एकत्र गोळा झाले होते, ते सर्व एका मोकळ्या मैदानांत; असें इतिहास सांगतो. त्यांचेंच अनुकरण करून 'फ्री स्टूडंट्स कौन्सिल'चे हे ४३ विद्यार्थीसभासद एका माळरानांत एकत्र जमले. हर्माशाक्टार– हेगी (तीन कडांचा डोंगर) हें आजचें सभा-स्थान होतें. ह्या माळरानाच्या एका टोकाला थोडी मोकळी जागा होती, तेथें ह्या विद्यार्थ्यांनीं आपल्या अंगावरील कोट काढून खालीं टाकले. कोटावर बसलेल्या सभासदांनीं सभेचें काम चालू केलें. कम्युनिस्टविरोधी अशी एक प्रबळ विद्यार्थी–संघटना ह्या सभेंत आकारास आली. हंगेरिअन भाषेंतील संस्थेच्या नांवाचीं आद्याक्षरें एकापुढें एक वाचलीं असतां जें अल्पाक्षर नाम तयार होतें, तें 'मेफेझ'(MEFESZ : हंगेरिअन युनिव्हर्सिटी व कॉलेज विद्यार्थ्यांची संयुक्त संघटना).

सर्व विद्यार्थी–प्रतिनिधि सभास्थानीं आले होते, ते पायीं चालत

एकएकटे; मोठा रस्ता सोडून, शेताडींतून, कांटयाकुटयांतून लोकांची नजर चुकवून. कांहीं जण तर पेस्ट भागांतून आडवळणाच्या पायवाटेनें आले होते. त्यांना कमींत कमी पंधरा मैलांचें अंतर तुडवीत यावें लागलें होतें.

आम्हीं जी योजना हातीं घेतली होती, ती खरोखरच केवळ अवाढव्य अशी होती. ही प्रचंड योजना मार्गस्थ कशी होणार? मार्गस्थ झाली, तरी तिचें भवितव्य काय? इत्यादि गोष्टींचा आम्हीं त्या वेळीं फारसा विचार केला नाहीं. कारण आम्ही जें कांहीं करणार होतों, तें तडकाफडकीं, ताबडतोब करावयास हवें होतें. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'एव्हीएच्'ला आमच्या कटाचा सुगावा लागणार नाहीं, अशी काळजीपूर्वक दक्षता घ्यावयास हवी होती. त्यांना ह्यांतलें कांहीं कळण्याचा अवकाश, एका क्षणांत ते आमच्यावर हल्ला करतील, आमची योजना पायाखालीं चिरडून टाकतील; आणि आमचा पण क्षणार्धांत निकाल लावतील!

• • •

## ऑक्टोबर २०–२१, १९५६

**प्रत्येक** जण आपआपल्या कामांत गर्क होता. हजारों विद्यार्थ्यांना आमच्या कटाची खबर द्यावयाची होती. शक्य तर त्यांच्यापैकीं प्रत्येकाला आमच्या कटांत सामील करून घ्यावयाचें होतें. त्यासाठीं विद्यार्थ्यांच्या लहानलहान सभा घेणें जरुरीचें होतें.

मी माझ्या लहानशा खोलींतून बाहेर पडलों नाहीं.

दिवसरात्र कम्युनिस्टविरोधी पोस्टर्स रंगविण्यांत मी गढलेलो होतों. ज्या वेळीं विद्यार्थ्यांचें प्रचंड निदर्शन होणार होतें, त्या वेळीं गांवांत सर्वत्र वांटण्यासाठीं आम्ही एक लहानसें हस्तपत्रक तयार केलें होतें. त्या हस्तपत्रकासाठी एक चित्र काढावयाचें होतें. पोस्टर्स काय, रंगवावीं तितकीं थोडींच होतीं. ह्या दोन दिवसांत एकदोन वेळां ईव्हानें बाहेर जाण्याचें धाडस केलें; आणि बाहेरच्या माझ्या विद्यार्थीमित्रांकडून निरोपांची नेआण केली.

• • •

## ऑक्टोबर २२, १९५६

आज सकाळीं ८ वाजतां आमच्या 'मेफेझ' कौन्सिलची दुसरी मीटिंग होती. ह्या वेळीं सभा फाईन आर्ट्स कॉलेजमध्यें घेण्यांत आली होती. कारण हें कॉलेज आंड्रासी स्ट्रीटवर आहे. आणि ह्या हमरस्त्यावर रहदारीची गर्दी नेहमींच असते. त्यामुळें तेथें विद्यार्थी जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांच्या घोळक्यातून आंत गेले, तरी तें कोणाच्या लक्षांत येणार नाहीं, असा आमचा कयास होता.

एकदा आम्ही सर्व जण आंत आलों, अशी खात्री करून घेतल्यावर आम्हीं सर्वांत मोठा हॉल सभेसाठीं पसंत केला. सर्व जण हॉलमध्यें आल्यावर आम्हीं दाराला कुलूप घातलें. जणुं काय आम्हांला कम्युनिझम दाराबाहेर ठेवावयाचा होता! हा क्षण ऐतिहासिक महत्त्वाचा ठरणार आहे, ह्या गोष्टीची जाणीव आम्हां सर्वांना होती. लगेच आम्हीं कामास सुरुवात केली. एकूण १४ मागण्या आम्हीं कागदावर लिहून काढल्या. आमच्यांत अनेक युनिव्हर्सिटींतील व कॉलेजमधील विद्यार्थी होते. त्या सर्वांच्या मागण्या ह्या वेळीं लक्षांत घेऊन आम्ही एकत्र केल्या होत्या. ह्या १४ मागण्या आम्ही मंजूर करून घेऊं शकूं अशी आम्हांला आशा होती. आजवर आमच्यावर अनेकविध अन्याय करण्यांत आले होते. आम्ही पुष्कळ भोगलें होतें. आमच्या मनांतील ध्येयांना व स्वप्नांना आम्हीं ह्या जाहीरनाम्यांत आकार दिला होता.

आमची पहिली मागणी स्वातंत्र्याची होती. आम्हांला खरेंखुरें स्वातंत्र्य हवें होतें. पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांत जें स्वातंत्र्य आकारास आलेलें आम्हांला दिसत होतें, तें स्वातंत्र्य आम्हांला हवें होतें.

आम्हीं आमच्यांतून पांच प्रतिनिधींची निवड केली. त्यांनी सरकारशीं विद्यार्थ्यांच्या वतीनें बोलणीं करावींत आणि आमच्या जाहीरनाम्यांतील १४ मागण्या मंजूर करून घेण्यासाठीं शक्य ते सर्व यत्न करावेत, असें ठरविण्यांत आलें. सरकारनें आमच्या जाहीरनाम्यास चांगली प्रसिद्धि द्यावी, अशी आमची मागणी होती. नंतर आमचे प्रतिनिधि आपल्या कामासाठीं ताबडतोब निघून गेले. ते परत येईपर्यंत आम्ही वाट बघत बसलों. तें सभागृह बरेंच मोठें होतें. तेथें एकमेकांच्या तोंडाकडे बघत अस्वस्थ चित्तानें आम्ही बसून राहिलों होतों. वेळ जातां जात नव्हता.

११ चे ठोके पडले आणि मग थोडयाच वेळानें आमचे प्रतिनिधि परतले. बेलाकोस प्रतिनिधिमंडळाचा नेता होता. त्यानें सांगितलें कीं, प्रधानमंत्री हेगेडस आणि त्याचें सरकार आमच्या जाहीरनाम्याचा विचार करावयास तयार आहेत. पण त्यासाठीं पंधरा दिवसांचा अवधि हवा होता. मध्यंतरींच्या काळांत आमच्या मागण्यांना मुळीच प्रसिद्धि दिली जाणार नाहीं; आणि सोव्हिएट सैन्य देशांत तसेंच राहील.

ह्या असल्या वेळकाढू सबबी आम्हांला मान्य होण्यासारख्या नव्हत्या. त्या घायकुतीच्या वातावरणांत सरकारी उत्तराचा शांतपणानें विचार करणें आम्हांला परवडण्यासारखें नव्हतें. आम्ही सर्व जण कृतीसाठीं उत्सुक होतों.

आम्हीं निदर्शनें करण्याचा निर्णय घेतला.

त्याच दिवशीं रात्रीं कौन्सिलनें सरकारी अधिकाऱ्यांस विनंती केली कीं, जोसेफ बेम स्क्वेअरमध्यें निदर्शनें करण्यास आम्हांला परवानगी मिळावी. कायद्याच्या कक्षेंत राहून शक्य तों सर्व कांहीं करण्याची आमची इच्छा होती. आणि निदर्शनें–सभा इत्यादिकांस सरकारी परवानगी मिळणें आवश्यक होतें.

● ● ●

## *ऑक्टोबर २३, १९५६*

**आज** पहिली महत्त्वाची बातमी मिळाली, ती ही कीं आमच्या नियोजित निदर्शनांना सरकारनें परवानगी नाकारली होती. सरकारनें आमची मागणी फेटाळून लावल्याचें वृत्त प्रथम सकाळीं रेडिओवरील बातम्यांत देण्यांत आलें.

नंतर कौन्सिलनें माझ्याकडे एक अशक्यप्राय मागणी केली. तावडतोब सकाळीं एक हस्तपत्रक छापून काढावयाचें. हस्तपत्रकांतील मजकुरांत कौन्सिलच्या मागण्यांचा पुनरुच्चार करावयाचा. निदान वीस हजार तरी प्रति छापून काढावयाच्या.

आतां कोणाला जर असें वाटत असेल कीं कम्युनिस्टनियंत्रित देशांत एवढया प्रति छापण्यासाठीं पुरेसा कागद व छापखाना सहज उपलब्ध

होऊं शकेल, तर मी ठामपणानें सांगतों कीं तें चूक आहे. पण कम्युनिस्ट सरकारच्या छापाचा एक नोटपेपर कोठून तरी मीं पैदा केला; आणि युनिव्हर्सिटीचा रबर स्टॅम्प पण. ताबडतोब मीं एक कामचलाऊ बनावट हुकूमनामा तयार केला. त्याच्या बळावर मीं युनिव्हर्सिटीच्या छोटया छापखान्यांत प्रवेश मिळविला.

आणि दोन तासांच्या अवधींत आम्हीं हजारों हस्तपत्रकें छापून काढलीं.

दुपारीं अडीच वाजतां बारा हजार विद्यार्थी आणि तरुण डॅन्युब नदी-जवळच्या पेटोफि स्क्वेअरमध्यें गोळा झाले. नेमक्या ह्याच क्षणाला आम्हीं आमच्या विद्यार्थी–संघटनेचें नांव बदललें. 'स्टूडंट्स रेव्होल्युशनरी कौन्सिल' रेव्होल्युशनरी–क्रांतिकारक–हा शब्द त्या वेळीं आम्हीं प्रथमच उपयोगांत आणला. अर्थातच ह्या वेळीं रक्तरंजित फ्रेंच राज्यक्रांति आम्हांला अभिप्रेत नव्हती.

ध्येयासाठीं आत्मसमर्पण, स्वातंत्र्याच्या यज्ञवेदीवर बलिदान, रणसंग्राम, इत्यादि कल्पना त्या वेळीं कोणाच्याच डोक्यांत नव्हत्या.

चौकांतील प्रत्येक खिडकी उघडी होती. आणि ठराविक वेळीं खिडक्याखिडक्यांतून हंगेरिअन निशाणें एकदम फडकूं लागलीं. जादूनें भारल्यागत जणूं हा चमत्कार घडला. कांहीं निशाणांच्या मधोमध नुसतीं भोकेंच दिसत होतीं. भोकांच्या ठिकाणी पूर्वीं कम्युनिस्टांचे लाल तारे होते ते कांहीं उत्साही लोकांनीं कापून टाकले होते. इतर सर्व लोकांनीं तें पाहिल्यावर आपआपल्या निशाणांवरील लाल तारे लगेच कापून टाकले.

पोझ्नान बंडाच्या अग्रभागीं असलेल्या विद्यार्थी–नेत्यांविषयीं सहानुभूति दाखविण्यासाठीं आमचीं हीं निदर्शनें होतीं. पोलंड आणि हंगेरी ह्या दोन राष्ट्रांतील प्राचीन बंधुभाव व सख्य प्रगट करण्यासाठीं आमचीं हीं निदर्शनें होतीं. निदर्शनासाठीं जोसेफ बेम स्क्वेअरची जागा आम्हीं मुद्दाम हेतुपुरःसर मुक्रर केली होती. कारण बेम हा पोलिश वीरपुरुष होता. ऑस्ट्रियाच्या मदोन्मत्त सत्तेविरुद्ध १८४८ सालीं हंगेरीनें क्रांतीचा उठाव केला होता त्या वेळीं ज्या लष्करी नेत्यांनीं क्रांतीचें नेतृत्व केलें होतें, त्यांजपैकीं बेम हा एक वीरपुरुष होता.

पेटोफि स्क्वेअरपासून बेमस्क्वेअर निदान अडीच मैल दूर होता. हें अडीच मैलांचें अंतर तोडण्यासाठीं निदर्शकांना पेस्ट भागांतील भरवस्तींतून जाणें भाग होतें.

निदर्शकांचा मोर्चा कोसूथ लाजोस स्ट्रीटवरून शांतपणानें निघाला. मोर्चास सुरुवात होण्यापूर्वींच अगोदरपासून शहरांतील सर्व लोकांना मोर्चाची खबर मिळालेली दिसली. लोक आपआपल्या घरांच्या दारांतून बाहेर पडत होते आणि लगेच मोर्चांत सामील होत होते; किंवा मिरवणूक पाहिल्यावर घरदार, कामधंदा सोडून रस्त्याच्या वाकणांवर मोर्चांत सामील होण्यासाठीं धांवत येत होते. कित्येक विद्यार्थ्यांच्या हातांत उंच धरलेलीं निशाणें होतीं; तर कित्येक विद्यार्थी हस्तपत्रकें वांटीत रस्त्यानें चालले होते. ज्या रस्त्यानें आम्ही जात होतों, त्या रस्त्यावर एकाएकीं सर्वत्र निशाणें फडकूं लागलीं होतीं. रस्त्यांतील सर्व रहदारी बंद पडली होती. सरकारी कचेऱ्या आणि दुकानें आपोआप ओस पडलीं. कारण तेथें काम करणारे नोकर लगेच रस्त्यावर आले. काय घडतें आहे, तें जाणून घेण्याची सर्वांनाच उत्कंठा होती.

आम्हीं निघालों, तेव्हां मोर्चांत बारा हजार विद्यार्थी होते. पण नाजस्की–झिलिन्स्की स्ट्रीट, मार्क्स स्क्वेअर आणि सेंट स्टीफेन बोलव्हार्ड-वरून जसा आमचा मोर्चा पुढें निघाला, तसे हजारों लोक मोर्चांत सामील झाले. आम्ही जेव्हां मार्गारिट ब्रिजजवळ येऊन थडकलों, तेव्हां साठसत्तर हजार लोक मोर्चांत असावेत.

मोर्चाला शिस्त लावण्यासाठीं कोणी पोलिसअधिकारी उपस्थित नव्हता. हा प्रचंड जनसंमर्द नंतर काय करणार आहे, त्याची कोणालाच निश्चित कल्पना नव्हती. कारण नियोजित कार्यक्रम काय आहे, त्याची प्रसिद्धि कोठेंच झालेली नव्हती.

संस्कृति आणि शिक्षणमंत्रालयाची इमारत दृष्टिपथांत आली, तेव्हां त्या इमारतीच्या दारांत उभा राहून युनिव्हर्सिटी विभागाचा एक अत्युच्च कम्युनिस्ट अधिकारी मिरवणुकीची गंमत बघत असलेला मला दिसला. लगेच जवळच्या एका विद्यार्थ्याला मीं माझ्याबरोबर ओढून नेलें. आम्ही धांवत त्याच्याजवळ जाऊन पोहोंचलों तेव्हां तो भेदरलेला दिसला. मीं

त्याचा एक हात धरला. दुसऱ्या विद्यार्थ्यानें त्याचा दुसरा हात पकडला. आणि आम्हीं दोघांनीं मिळून कॉम्रेड पलास्तीला विद्यार्थ्यांच्या मिरवणुकींत खेंचून आणलें.

आम्हीं त्याच्याकडे पाहून दांत विचकले आणि जोरांत ओरडलों,— 'गेरो मुर्दाबाद ! राकोसि मुर्दाबाद ! ' — (गेरो हा मॉस्कोचा हस्तक आणि 'कम्युनिस्ट सेंट्रल कमिटी'चा पहिला सेक्रेटरी होता. त्याच्यापूर्वी राकोसि हा हंगेरीचा कम्युनिस्ट बॉस होता. ) आमच्या घोषणा ऐकून कसेंबसें त्यानें क्षीण हास्य केलें. पण तो असा कांहीं घाबरलेला दिसत होता कीं विचारतां सोय नाहीं.

कडेवर लहानलहान अर्भकें घेतलेल्या कित्येक स्त्रिया आमच्या मिरवणुकींत सामील झाल्या होत्या. आम्ही बेम स्क्वेअरमध्यें पोहोंचलों, तेव्हां एक लाखाच्यावर लोक तेथें गोळा झालेले दिसले. तो प्रचंड जन-समुदाय एकदिलानें हसतबोलत होता, मनांतून अस्वस्थ होता.

सुमारें चार वाजले असावेत त्या वेळीं. लोकसागराला उधाण आलें होतें. मधूनमधून उत्साही विद्यार्थी घोषणा देत होते. आणि जवळपासचे लोक त्या घोषणांना साथ देत होते. —'रशियनांना हुसकून लावा ! ... राकोसि मुर्दाबाद! ... गुलामगिरी मुर्दाबाद! ...'

'नवें निशाण... नवें सरकार... भाषण स्वातंत्र्य' ... त्या भव्य चौकांत लोकांची नुसती खेंचाखेंच झाली होती. आणि भोंवतालच्या इमा-रतींच्या भिंती घोषणा पुनः पुन्हा प्रतिध्वनित करीत होत्या.

मी चौकांत शांत उभा होतों. तेवढ्यांत पुतळ्याच्या पायथ्याशीं एक माणूस जाऊन उभा राहिला. आणि मोठमोठ्यानें घोषणा देऊन बसलेल्या आवाजांत मोठ्या आवेशाने एका लोकप्रिय गाण्याच्या ओळी म्हणावयास लागला :

**'माग्यारांनो, उठा ! तुम्हांला हांक देतसे देश**
**ह्याच क्षणाला सन्मुख होऊन तोडुन टाका पाश.**
**स्वातंत्र्याचा स्वर्ग हवा कीं गुलामगिरिचा नरक ?**
**काय हवें तें ठरवा आतां, मुक्तीचा हा क्षण एक. '**

त्या बिचाऱ्याच्याजवळ लाऊड स्पीकरसुद्धां नव्हता. पण पेटोफीच्या त्या तेजस्वी गाण्यानें भोवतालचे लोक थरारून उठले.

इकडे चौकांत अस्वस्थता प्रतिक्षणाला वाढत चालली होती; आणि तिकडे बुडापेस्टचा कम्युनिस्ट रेडिओ ओरडून सांगत होता कीं, विद्यार्थ्यांचे घोळके शहरांतील रस्त्यांतून निदर्शनें करीत फिरत आहेत. आणि स्नेहशील सोव्हिएट युनियनच्या स्नेहपाशांतून हंगेरीला मुक्तता हवी, अशा फॅसिस्ट अफवा सर्वत्र उठत आहेत !

बेम स्क्वेअरमधील घराघरांच्या दारांखिडक्यांत बसविलेले लाऊड स्पीकर्स दुष्मन गेरोचा आवाज लोकांस ऐकवीत होते. हा गेरो असा एक अजब माणूस होता कीं ज्याच्यावर फक्त 'एव्हीएच' गुप्त पोलिसांनींच विश्वास ठेवला असता ! हा माणूस तीच एक खोटी गोष्ट पुनः पुन्हा ओरडून सांगत होता, – 'कम्युनिस्ट हंगेरिअन देशभक्त आहेत! '— आम्ही सर्व जण उंच आवाजांत घोषणा करीत होतों— 'गेरो मुर्दाबाद! ... आम्हांला स्वातंत्र्य पाहिजे ! '

आमच्या पाठीमागें बेम स्क्वेअरला लागून डॅन्यूब नदीशीं समांतर अशा राडेझकी बराकी होत्या. ह्या बराकींत फार तर एकदोन पलटणी असतील. बराकींचीं अवजड दारें बंद होतीं आणि तेथील पहारेकरी आपलीं ठाणीं सोडून थोड्या वेळापूर्वीच लोकांच्या घोळक्यांत सामील झाले होते.

क्षणार्धांत बराकींचीं दारें उघडलीं आणि आंतील सैनिक ओरडत बाहेर आले. तेसुद्धां मोठमोठ्यानें घोषणा देत होते, आवेशानें हातवारे करीत होते. त्यांच्या लष्करी टोप्यांवरील लाल तारे त्यांनीं ओरबाडून काढले होते. आमच्या निदर्शनांत सामील होण्यासाठीं ते निःशस्त्र बाहेर पडले होते. पुढील थोड्या तासांच्या अवधींत आम्हांला शस्त्रास्त्रांची किती आवश्यकता लागणार होती, त्याची त्या वेळीं कोणालाच कल्पना नव्हती.

हळुहळू काळोख पसरावयास लागला. आणि बेम स्क्वेअरमध्यें दाटी-वाटीनें गोळा झालेले लोक दोन तुकड्या करून वेगवेगळ्या दिशांनीं चाला-वयास लागले. विद्यार्थ्यांची जी लहान तुकडी होती, ती डोझा ग्यॉर्गी बोलव्हार्डच्या रोखानें निघाली. तेथें स्टालिनचें पंचवीस फूट उंच असें भव्य स्मारक होतें. तें स्मारक उखडून टाकण्याचा यत्न नागरिक करीत होते.

थोड्याच वेळांत बोल्शेव्हिझमचें हें तिरस्कृत स्मारक खालीं कोसळलें. तीन विद्यार्थ्यांनीं स्टालिनच्या मानेभोवतीं एक दोरखंड करकचून आवळला होता. कांहीं मिनिटांनीं आपल्या जागेवरून स्टालिन तोंडघशीं पडला. त्याचे गुडघे तुटले होते बंडखोर जमावानें त्याच्या सन्मान्य व्यासपीठावरून स्टालिनला खेंचून खालीं ओढलें होतें. आतां तो धूळ खात लोळत पडला होता.

विद्यार्थ्यांचा मोठा जमाव एकत्रित करण्यांत मीं यश मिळविलें होतें. आम्ही पार्लमेंटच्या रोखानें निघालों होतों. बेम स्क्वेअरपासून एक मैलभर अंतरावर पेस्ट भागांत पार्लमेंटच्या इमारती होत्या.

अर्थातच आमच्याबरोबर हजारों लोक होते. सेंट मार्गरिट ब्रिज-वरून बालाटन स्ट्रीटवर आम्ही पोहोचलों तेव्हां लोकांचा त्वेष अनावर झालेला होता.

'एव्हीएच्' पोलिस हेडक्वॉर्टर्सच्याजवळ आम्ही आलों, तेव्हां तेथील दारें कुलूपबंद केलेलीं दिसलीं. खिडक्यांवरील पडदे खालीं सोडलेले होते. ह्या वेळीं इमारतींत कोणी नसावेत, असें दिसलें. कारण तेथील तळ निर्मनुष्य होता. तिरस्कृतांची आम्हीं एक यादी केली होती. त्या यादींतील पहिलीं कांहीं नांवें ह्या इमारतींतील कांहीं माणसांचीं होतीं. पण त्यांच्या-पैकीं कोणीच तेथें दिसेना.

ह्याच बंदिस्त इमारतींत हजारों देशभक्तांचा अमानुष छळ करण्यांत आला होता. आणखी कैक हजार देशभक्तांची तेथेंच हत्या करण्यांत आली होती. त्या सर्व वंदनीय हुतात्म्यांची ह्या वेळीं आम्हांला आठवण झाली. त्या इमारतीसमोर थांबून आम्हीं घोषणा दिल्या, शिट्ट्या मारल्या, हातांच्या मुठी वळून गर्जना केल्या. पण त्या क्षणाला तेथले सर्व गुप्त पोलिस जणूं अदृश्य झाले होते. जणुं कांहीं आम्हांला भाजून काढणाऱ्या सूर्याकडे पाहून तावातावानें आम्ही हातांच्या मुठी वळीत होतों.

आमचा मोर्चा अखंड पुढें चालत होता. बुडापेस्टमधील नागरिकांच्या अंतःकरणांत रागाचा जो आगडोंब उसळला होता, त्याचीं दृश्यचिन्हें वाटेवर आम्हांला सर्वत्र दिसत होतीं. एक म्हातारा माणूस राकोसीचा फोटो हातांत धरून आपल्या घराच्या दारांत उभा होता आम्ही जवळ जातांच त्याने हातांतील फोटोला काडी लावली आणि बाजूनें जाणाऱ्या उत्साही

विद्यार्थ्यांना तो जळता फोटो हात वर करून दाखविला. रस्त्यांत पायाखालीं लक्षावधि कम्युनिस्ट आणि मार्क्सिस्ट पुस्तकांच्या चिंध्या, लाल हस्तपत्रकें, क्रेम्लिनच्या पुढाऱ्यांचे आणि त्यांच्या हंगेरिअन हस्तकांचे असंख्य फोटो, ह्यांचा नुसता गळाठा सांचला होता. तो तुडवीत पुढें जाण्यांत आम्हांला मनस्वी आनंद वाटत होता. जणुं कांहीं कम्युनिस्ट जीवनाची प्रथाच आम्ही पायांखालीं तुडवीत होतों. आमच्या पावलांत मस्ती होती, पाठींत ताठा होता, छातींत अभिमान होता, डोळ्यांत अंगार होता. अशा थाटांत गर्वभरानें आम्ही पार्लमेंटच्या रोखानें चाललों होतों. जेव्हां आम्ही कम्युनिस्ट नेत्यांचीं छायाचित्रें पायदळीं तुडविलीं, तेव्हां जणुं कांहीं ज्यांच्या छाया आत्तां पायदळीं तुडविल्या, तेसुद्धां असेच केव्हां तरी पायांखालीं तुडविले जातील; असा भाव आमच्या त्या उन्मत्त वर्तनांत होता. हंगेरिअन लोकांच्या मनांत जो द्वेष सांचलेला होता, त्याचें हें असें जाहीर प्रदर्शन आम्हीं मांडलें होतें.

रस्त्यावर कांहीं हंगेरिअन तरुण आम्हांला येऊन मिळाले. त्यांनीं बातमी दिली कीं, निदर्शकांस दमदाटी करण्यासाठीं गेरो एक भाषण तयार करीत आहे आणि हें भाषण बुडापेस्ट रेडिओवरून लगेच ध्वनिक्षेपित करण्यांत येणार आहे. तोंपर्यंत आम्ही पार्लमेंट स्क्वेअरमध्यें येऊन पोहोचलों होतों.

ज्या माणसावर विश्वास ठेवला असतां बहुतकरून चालेल, असा आमच्या मतें फक्त एकच माणूस तुरुंगाबाहेर होता.

त्याचें नांव इम्रे नाज.

नाज उदारमतवादी होता; आणि टिटोला अनुसरण्याची त्याची प्रवृत्ति होती. त्यामुळें राकोसीनें मुख्यमंत्रिपदावरून त्याची हकालपट्टी केली होती. ह्या ऐतिहासिक प्रसंगीं कदाचित् देशाचें नेतृत्व करूं शकेल, असा हा एकच माणूस आमच्या डोळ्यांसमोर होता. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं नेतृत्वाचे आदर्श गुण त्याच्या ठायी एकवटलेले होते. सध्यां आमच्यांत विद्यमान असलेला असा हा एकच एक पुढारी होता, बाकीच्या सर्वांना गोळ्या घालून ठार करण्यांत आलें होतें; किंवा सायबेरियांत हद्दपार करण्यांत आलें होतें.

वस्तुस्थिति अशी असल्यामुळें पार्लमेंटच्या इमारतीसमोर सहस्रावधि मुखांतून एकच घोषणा उमटत होती,—'आम्हांला नाज पाहिजे!'—

आणि त्याच वेळीं राष्ट्रगीतांतील एक स्फूर्तिदायक चरण कोणी तरी उंच आवाजांत म्हटला आणि प्रत्येक हंगेरियन देशभक्ताचें अंतःकरण त्या शब्दांनीं पेटून उठलें. मग त्याच एका चरणाचा मधुर पण उन्मत्त नाद कांहीं काळ वातावरणांत घुमत राहिला. आणि मग पुन्हा लोकांच्या घोषणा सुरू झाल्या– 'आम्हांला नाज पाहिजे ! ...नाज ! ...नाज ! ...नाज पाहिजे !'–पार्लमेंटच्या कुलूपबंद भिंतीच्या आड चोरूनलपून बसलेल्या कम्युनिस्ट अधिकाऱ्यांच्या कानांवर आमच्या घणाघाती घोषणा एक-सारख्या आदळत होत्या.

पण अर्धा तास उलटला, तरी तेथें नाज येण्याचें कांहीं चिन्ह दिसेना.

तेवढ्यांत एक धट्टाकट्टा, गिड्डा माणूस गॅलरींत येऊन उभा राहिला; आणि म्हणाला, कॉम्रेड नाज आत्ता येईल. थोडा वेळ शांत राहा,––पण हा माणूस केवळ वेळ मारून नेण्यासाठीं असें कांहीं तरी बोलत होता, हें आम्हांला लगेच कळून चुकलें होतें.

'आम्हांला कॉम्रेड नाज नको'––आम्ही सर्व जण एका आवाजांत ओरडलों,–'आम्हांला मिस्टर नाज पाहिजे. आणि आत्तांच पाहिजे !' आमच्या ह्या मागणीला कम्युनिस्टांनीं जें उत्तर दिलें, तें मोठें मासलेवाइक होतें. त्यानीं पार्लमेंट चौकांतील एकूणएक सर्व दिवे मालवून टाकले. एक लाखाच्या जनसमुदायाला काळोखांत डांबून ठेवण्याची कल्पना अजब म्हणावयास हवी.

दिवे गेल्यामुळें लोकांचा राग अनावर झाला. प्रत्येक जण खिशांत हात घालून कागदाचे कपटे शोधावयास लागला. थोड्याच वेळांत हजारों छोट्याछोट्या मशाली पेटविण्यांत आल्या. जळत्या कागदांचा क्षणभर लख्ख उजेड पडे, मग पुन्हा क्षणभर काळोख होई. क्षणभरानें पुन्हा कागदाच्या मशाली पेटत; असें बराच वेळ चाललें होतें. ह्या वेळपर्यंत सहा वेळां राष्ट्रगीत म्हणून झालें होतें. लोकांचे आवाज चढत्या पट्टींत लागले होते–– 'दारें उघडा'––मध्येंच कांहीं लोक ओरडून उठत. नंतर दुसरे कांहीं लोक घोषणा देऊं लागले.––' राकोसि मुर्दाबाद ! .. नाज झिंदाबाद !'... आणि मग––' आम्ही आंत जाणार ! ...चला रे, आपण आंत घुसूं या !'

अखेरीस तेथें इम्रे नाज येऊन पोहोंचला. भेदरलेल्या कम्युनिस्ट

अधिकाऱ्यांनीं त्याला घाईघाईनें बोलावून घेतलें होतें. त्या वेळीं रात्रीचे दहा वाजले होते.

कम्युनिस्टांनीं नाजला बाहेर पाठविलें, लोकांना शांत करण्यासाठीं. चौकांत मिट्ट काळोख होता. क्वचित् कोठें कागदाचे कपटे पेटत होते; नाहीं असें नाहीं. पण आतां कागद संपत आले होते. काळोख दाटत होता. आमच्यासमोर उभा असलेला माणूस नाजच आहे, ह्याविषयीं आमची खात्री पटत नव्हती. म्हणून सर्व लोकांनीं एकमुखानें स्पॉट लाइटची मागणी केली. एक वेळचा मुख्यमंत्री तो तोच आहे, ह्याची सर्वांना खात्री करून घ्यावयाची होती.

अखेरीस नाज बोलावयास लागला. शांतपणानें, सावकाश तो बोलत होता. आतां तेथील जमाव मोडावा आणि सर्व लोकांनीं शांतपणानें घरोघर निघून जावें, असें त्यानें लोकांना सांगितलें. पण आमच्यापैकीं जे कोणी ह्या वेळीं पुढच्या रांगांत उभे होते, त्यांना एक चमत्कारिक दृश्य दिसलें. नाज बोलत होता, त्या वेळीं पुनः पुन्हा मागें वळून बघत होता. एक वेळ तर मागून कोणीं तरी त्याला सांगितलें,–' ठरल्याप्रमाणें बोल.'–तें आम्हांला स्पष्ट ऐकूं आलें. म्हणजे कांहीं कम्युनिस्ट त्याला मागून ढोशीत होते. तें दृश्य आम्हांला असह्य झालें. एक आवाजांत आम्ही ओरडून उठलों, ' नाजला एकटयाला बोलूं द्या !'– पण तेवढयांत घाईघाईनें ते लोक नाजला आंत घेऊन गेले. आमच्या मागणीला त्यांनीं हें असें उत्तर दिलें होतें!

सर्व लोक भडकून उठले होते; संतापानें बेभान झाले होते. आम्हांला सर्वांना कांहीं तरी करून दाखविण्याची इच्छा होती. आणि जें काय करावयाचें, तें त्याच क्षणाला करावें, असें वाटत होतें. आमच्या निदर्शनामुळें आमच्या ताकदीची योग्य ती कल्पना आम्हांला पुरेपुर येऊन चुकली होती. लोकसागराच्या तुफानी लाटांना अडविण्याची आतां कोणाची हिंमत नव्हती. राज्यसत्ता नाजच्या हातीं यावी, ह्यासाठीं त्या क्षणाला आम्ही काय वाटेल तें करावयास तयार होतों.

पण केवळ विद्यार्थ्यांची संघटना प्राप्त परिस्थितींत फार वेळ तग धरणार नाहीं,–आम्ही फार तर बारापंधरा हजार होतों,–एकूण एक सर्व जण निःशस्त्र होतों. तर आमच्या विरुद्ध बाजूला शत्रूच्या गोटांत कमींत

कमी पंधरा हजार सशस्त्र गुप्त पोलीस आणि पोलिसांना पाठिंबा देणारी सोव्हिएट सत्ता होती.

विद्यार्थ्यांनीं स्वातंत्र्य युद्धाचें रणशिंग फुंकलें होतें. पण विद्यार्थी एकटे काय करूं शकणार होते? आम्हांला आमच्या जोडीला कामकरीशेतकरी हवे होते. १९१९ सालीं जेव्हां हंगेरीनें पहिल्यांदा कम्युनिस्टांची सत्ता उलथून टाकली होती, तेव्हां त्या लढयांत कामकरीशेतकरी विद्यार्थ्यांच्या खांद्याला खांदा भिडवून शौर्यानें लढले होते. त्यावेळीं आम्ही सर्वांनीं मिळून जगाला दाखवून दिलें होतें कीं नव्वद लक्ष लोकांचा हा देश कोणत्याहि परकीय राजसत्तेस प्राणपणानें विरोध केल्याशिवाय राहणार नाहीं. आतां लढा अटळ होता. सर्व स्वातंत्र्यवादी लोकांचें साहाय्य आम्हांला हवें होतें. देशांतील सर्व लोकांना हांक द्यावयाची, तर रेडिओ बुडापेस्ट हातीं असणें आवश्यक होतें. जसें कांहीं न कळत आम्हांला हें कळून चुकलें होतें. आतां पहिली गोष्ट म्हणजे रेडिओ ताब्यांत घेऊन स्वातंत्र्याची ग्वाही आधीं देशभर प्रसृत करावयास हवी. ह्या लढयांत नेमकें काय पणास लागलें आहे, कशासाठीं कोण काय करीत आहे, हें एकदां सर्व लोकांना कळलें, म्हणजे मग त्यांचे त्यांना काय करावयाचें, तें ते करतील.

म्हणून आम्हीं आमचा मोर्चा रेडिओच्या इमारतीच्या रोखानें चालू केला.

आतां पाहिलें, तर रस्त्यांवर खिडक्यांच्या तावदानांचा चुरा पडलेला होता. कम्युनिस्टांचे फोटो, त्यांचीं पुस्तकें, हस्तपत्रकें इत्यादि लाथाडून पुढें जावें लागत होतें. एक तासापूर्वी गेरोनें लोकांना उद्देशून रेडिओवर धमकावणीचें भाषण केलें होतें. त्या उन्मत्त भाषणाला निदर्शकांनीं हें सक्रिय प्रत्युत्तर दिलेलें दिसत होतें. निदर्शनांची उग्रता प्रतिक्षणाला वाढत होती. मध्यंतरीं आणखी हजारों स्त्रीपुरुष आमच्या मोर्चांत सामील झाले होते. तें एक विलक्षण दृश्य होतें. कित्येकांच्या हातांत क्षणभर जळणाऱ्या कागदी मशाली होत्या.

'स्टूडंट्स रेव्होल्यूशनरी कौन्सिल'नें रेडिओ स्टेशनवरील अधिकारी वर्गाशीं बोलणीं करण्यासाठीं जेनो फे आणि इस्तव्हान आंटाल ह्या दोन प्रतिनिधींची नेमणूक केली. आमचा उद्देश, आमचा चौदा कलमी जाहीरनामा

रेडिओवरून ध्वनिक्षेपित करण्याचा होता. सँडॉर स्ट्रीटवर लोक येऊन पोहोंचले, तेव्हां त्यांचा उत्साह शिगेस पोहोंचला होता. प्रत्येकाला मनोमन असें वाटत होतें कीं, क्रांतीचा क्षण येऊन ठेपला आहे. आमची खात्री होती कीं, जर रेडिओ आमच्या हातांत आला, तर हंगेरीमधील सर्व जनता आम्ही सहज वश करून घेऊं. आमच्या अंत:करणांत स्वातंत्र्यप्रेमाची ज्योत तेवत होती. त्या ज्योतीवर सर्वत्र लक्षावधि मशाली पेटवितां आल्या असत्या. त्या विशिष्ट क्षणाला रेडिओ हें आमचें सर्वांत प्रबळ शस्त्र होतें. विद्यार्थी–कामगार निदर्शकांचे पंचवीस प्रतिनिधि आणि कौन्सिलनें नियुक्त केलेले दोन प्रवक्ते हे सर्व मिळून रेडिओच्या इमारतींत शिरले.

पण कम्युनिस्टांना आमचें मनोगत आधींपासून समजलेलें दिसत होतें. आमची भेट घेण्यासाठीं त्यांची सर्व तयारी जय्यत होती. गुप्त पोलिसांच्या पलटणी जिकडे बघावें, तिकडे दिसत होत्या. आणि मधल्या वेळांत इमारतींच्या छपरांवर मशीनगन्स दिसावयास लागल्या होत्या. क्षणार्धांत मरण देणाऱ्या मशीनगन्सचीं तोंडें निदर्शकांवर रोखलेलीं होतीं.

लोक आतां कोणत्याहि प्रसंगास तोंड देण्यास सिद्ध होते. त्यांनीं ओरडून सांगितलें,–'गोळ्या घालतां? खुशाल गोळ्या झाडा!'

तेवढ्यांत एकाएकीं बाहेरचा दरवाजा उघडला. क्षणभरानें तेथील आवारांतून रेडक्रॉसची मोटर बघतांबघतां दाराबाहेर निघूनसुद्धां गेली. मोटर गेली, ती अगदीं भरधांव. पण तरीसुद्धां लोकांच्या घोळक्यांत पुढच्या रांगांत उभे असलेल्या कांहीं लोकांना रेडक्रॉसच्या पड्याआड दडलेला आजारी माणूस दिसलाच. हा आजारी माणूस दुसरातिसरा कोणी नसून कॉम्रेड अर्नो गेरोच होता. हा मॉस्कोचा भित्रा हस्तक शेवटीं लोकांच्या क्रोधापासून स्वत:चें संरक्षण करण्यासाठीं अशा रीतीनें भ्याडपणानें पळून गेला होता.

आतां मात्र आमच्या मागण्या घेऊन आंत गेलेल्या आमच्या मित्रांच्या भवितव्याविषयीं आम्हांला चिंता वाटावयास लागली. खरें म्हणजे फारफार तर दहा मिनिटांच्या अवधींत ते बाहेर यावयास हवे होते. पण अर्धा तास झाला, एक तास झाला. समोरच्या बंद दारावर हातांच्या मुठी आपटून लोक एकमुखानें गर्जना करावयास लागले,–'आमचे विद्यार्थी परत पाठवा! आमचे भाऊ परत पाठवा!'

ह्या वेळपर्यंत पोलिसांच्या ताब्यांत असलेल्या राज्यसत्तेचा सर्व अधिकार संपुष्टांत आला होता. ह्यानंतर कम्युनिस्टांनीं लोकांना कांहीं सांगितलें असतें, तरी त्यावर कोणाचा काडीमात्र विश्वास बसला नसता. त्यानंतर खोटींनाटीं उत्तरें ऐकण्याची कोणाला इच्छा नव्हती.

आणि मग अचानक एकाएकीं रक्तशून्य राज्यक्रांतीचें रक्तरंजित क्रांतींत पर्यवसान झालें. बघतांबघतां कांहीं माणसें पटापट डोळ्यांसमोर मरून पडलीं. कोणाचे मित्र, कोणाचे आप्त घायाळ होऊन खालीं कोसळले. तें भयंकर दृश्य बघतांक्षणीं लोकांच्या मनांत धुमसणाऱ्या रागानें एकदम कृतींत पेट घेतला. आप्तमित्रांचे मुडदे लोकांनीं पाहिले मात्र आणि बंड करून उठण्याचा क्षण येऊन ठेपला आहे, हें लोकांनीं मनोमन ओळखलें.

रेडिओच्या इमारतीचीं अवजड दारें एखाद्या भुकेल्या राक्षसाच्या अजस्र तोंडाप्रमाणें एकदम उघडलीं. आणि आंतल्या आवारांतील मशीन गन्स एकाएकीं आग ओकावयास लागल्या. बाहेर रस्त्यावर नि:शस्त्र स्त्रीपुरुष उभे होते. मुलें होतीं; अगदीं लहानलहान अर्भकेंसुद्धां आयाबहिणींच्या कडेवर होतीं. तत्क्षणीं मरणाचा एकच हाहा:कार उडाला. ऑक्टोबर बंडांतील ही पहिली कत्तल.

माझ्यापासून कांहीं थोड्या फुटांवर उभा असलेला एक माणूस गोळी लागून एकदम खालीं कोसळला. लोळागोळा झालेला; निर्जीव. एका क्षणापूर्वी तो मोठमोठ्यानें घोषणा देत होता. 'एव्हीएच्' मशीनगन्सचा हा पहिला बळी. ऑक्टोबर क्रांतीचा पहिला हुतात्मा. हंगेरिअन सैन्याचा एक अधिकारी लेफ्टनंट कर्नल इस्तव्हान झेलेक्सी. त्याचें नांव मी कधीं विसणार नाहीं. पहिल्या हुतात्म्याचें नांव लोक कधीं विसरत नाहींस तें त्यांच्या सदैव स्मरणांत राहतें. गृहखात्याचा कम्युनिस्ट मंत्री लाझलो पिरोज ह्यानें आपल्या हाताखालील खुनी सैनिकांस लोकांची कत्तल करण्याचा हुकूम दिला होता.

आणखी कांहीं सेकंदांनंतर माझे दोन जिवलग मित्र जमिनीवर कोसळले. युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांचे हे पहिले दोन हुतात्मे.– गेझा ज्युलिस आणि जेनो बोऱ्ही.

एका क्षणांत सर्वत्र हलकल्लोळ उडाला. वेडानें झपाटल्यासारखे लोक एकदम बेभान झाले. प्रत्येकाच्या मनांत आणि मनगटांत प्रत्याघाताची ऊर्मि

उसळली. उलट उत्तर देण्याची खुमखुमी होती; पण आम्हीं निःशस्त्र होतों. आमच्याजवळ शस्त्रें नव्हतीं, पण ताकद होती.

इम्रे, पेटि, गेझे आणि मी स्वतः आम्हीं चौघे जण रेडिओ–इमारतीच्या बाजूस असलेल्या रस्त्याच्या दिशेनें धांवलों. शस्त्राच्या शोधांत. पलीकडच्या कोपऱ्यावर एका नव्या इमारतीचें बांधकाम चालू होतें आमची नजर लगेच तेथील विटांच्या राशीकडे वळली. विटा चांगल्या जड मजबूत होत्या.

बाजूलाच लहान हातगाड्या होत्या; चुना, सिमेंट वाहून नेण्याच्या. ह्या हातगाड्यांतून भराभर आम्हीं हातास येतील तशा विटा भरल्या आणि लगेच धांवतपळत, त्या गाड्या लोटीत रेडिओइमारतीच्या समोर आणून उभ्या केल्या. आम्हीं परत आलों, तेव्हां आम्हांला समजलें कीं आमच्या मागण्या घेऊन आंत गेलेले आमचे सर्व मित्र 'एव्हीएच्' पोलिसांनीं कापून काढले होते म्हणून.

विटांनीं भरलेल्या हातगाड्या पाहिल्याबरोबर आजूबाजूचे इतर लोक आमच्या रस्त्यानें धांवले. आणि थोड्याच वेळांत विटा भरभरून हात-गाड्या चौकांत येऊं लागल्या. दारासमोर हजारों विटा आम्हीं रचून ठेवल्या. आणि परिणामकारक हल्ला करण्याच्या क्षणाची वाट बघत बसलों.

थोड्या वेळानें समोरचें दार किंचित् किलकिलें झालें; आणि रेडिओंत काम करणाऱ्या दोन स्त्रिया त्या दारांतून बाहेर पडल्या. त्यांच्या मागोमाग दोन 'ए व्ही एच्' पोलिस मशीनगन्स हातांत घेऊन बाहेर पडतांना आम्हांला दिसले. कोणी तरी शिट्टी मारून इषारा दिला. आणि लगेच शेंकडो विद्यार्थी–तरुणांनीं त्या सशस्त्र शिपायांवर विटांचा मारा केला. अनेक विटा त्यांच्या जिव्हारीं बसल्या असाव्यात. कारण मशीनगन्स टाकून निवाऱ्याच्या शोधांत ते अडखळत धांवत सुटले. लगेच दोन शूर जवानांनीं मशीन-गन्सच्या रोखानें धांव घेतली. आमच्या हातीं आलेलीं हीं पहिलींच शस्त्रें. त्या तरुणांनीं मशीनगन्सचीं तोंडें रेडिओ–स्टेशनच्या आंतील दाराच्या रोखानें वळविलीं. बाकी आमच्यापैकीं सर्व जण नुसत्या हातांनींच लढत होते. हें धर्मयुद्ध नव्हे, असें वाटून शेंकडों विद्यार्थी शस्त्रें पैदा करण्याच्या मोहिमेवर रवाना झाले होते.

पेटि लोरेंक नांवाचा माझा एक जानी दोस्त होता. विद्यार्थ्यांची एक

टोळी बरोबर घेऊन तो सेपेलच्या दिशेनें निघाला. बुडापेस्टच्या सरहद्दीवर असलेल्या ह्या ठिकाणीं हंगेरीमधील शस्त्रास्त्रांचा व दारूगोळ्यांचा सर्वांत मोठा कारखाना होता. दुसरे कांहीं विद्यार्थी जवळच्या लष्करी बराकींच्या रोखानें चाल करून गेले. जोसेफ नाडोर टेक्निकल युनिव्हर्सिटीचे पन्नास विद्यार्थी बरोबर घेऊन व्हिग्याझो फेरेंक स्ट्रीटवरील मुख्य पोलिसठाण्याच्या दिशेनें मी धांवत सुटलों. हें ठाणें सँडॉर स्ट्रीटवरील रेडिओ–इमारतीपासून अडीच मैल दूर होतें.

तेथें दारांतच दोन सशस्त्र पहारेकरी उभे होते. आम्ही त्यांच्याजवळ जाऊन पोहोंचलों तरी प्रतिकारासाठीं कांहीं सुद्धां हालचालींचा आविर्भाव त्यांनीं दाखविला नाहीं. त्यांची मूकसंमति ओळखून आम्हीं त्यांना बाजूला सारलें. फेरि कोव्हॅक्सनें आंत जातांजातां त्यांच्या गणवेषांवर तिरंगी रिबन्स लावल्या. आम्हीं सरळ आंतमध्यें घुसलों; कमांडरूममध्यें गेलों. ह्या ठिकाणीं चोवीस तास अखंड पहारा ठेवलेला असे.

“स्टूडंट्स रेव्होल्युशनरी कौन्सिलच्या नांवानें मी तुला हुकूम देतों, तुझीं शस्त्रें आधीं आमच्या स्वाधीन कर!”—– मीं ओरडून सांगितलें. माझ्या स्वतःच्याच कर्कश्श आवाजावर माझा विश्वास बसेना. मीं मारे ऐटींत पुढच्यांतील ऑफिसरला दमदाटीचा हुकूम दिला होता खरा. पण त्या हुकमाची तामिली कशी काय होणार, ह्याविषयीं माझा मीच साशंक होतों.

माझ्या पुढच्यांतील अधिकाऱ्याच्या हाताखालीं दोनशें पोलिस सतत असत. तो माझ्याकडे बघत होता, तेव्हां मला माझ्या कॉलेजमधील प्रोफेसरांची आठवण झाली. त्याच्याकडे बघत मी उभा होतों. पण माझी छाती धडधडत होती. मला धीर मिळावा, म्हणून भोवतालच्या विद्यार्थीमित्रांकडे बघत होतों. आम्ही सर्वस्वी निःशस्त्र होतों. पुढें काय करावयाचें, तें सारें तो ऑफिसर ठरविणार होता !

क्षणभरानें पंचेचाळीस वर्षांचा तो पोलिस मेजर दोन पावलें शिस्तींत पुढें टाकून आमच्याजवळ आला. आणि काय आश्चर्य! त्यानें मला सलाम केला. त्याच्याहून वीस वर्षांनीं मी लहान. पण मला सलाम ठोकून केविलवाणें हंसून तो म्हणाला,– “ठीक आहे!”—–बस्स फक्त दोनच शब्द. मी लगेच धांवत त्याच्याजवळ गेलों आणि हर्षभरानें त्याला मिठी मारली. नाहीं तर

अन्य कोणत्या मार्गानें माझ्या मनांतील कृतज्ञता मीं व्यक्त करूं शकलों असतों ? आणि मग तो पोलिसअधिकारी मुकाटयानें बाजूला झाला. तेथें आसपास पुष्कळ पोलिस होते. त्या सर्वांच्यां देखत आम्ही खुशाल हातीं येतील, तीं शस्त्रास्त्रें गोळा केलीं , आणि आवारांत उभ्या असलेल्या ट्रक्स-मध्यें चढविलीं. टॉमीगन्स, ऑटोमॅटिक पिस्तुलें, बंदुका, संगिनी.

आणि मग भराभर उडया मारून आम्हीं ट्रक्समध्यें चढलों. कांहीं थोडे मागें राहिले. त्याला इलाज नव्हता. रणांगणावर शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणें हें आमचें पहिलें कर्तव्य होतें. हातवारे, आरडाओरड करीत मोठ्या समारंभानें आम्हीं त्या ट्रक्स सँडॉर स्ट्रीटवर बाजूला उभ्या केल्या. तोंपर्यंत तेथें चांगली हातघाईची लढाई जुंपली होती.

युद्धास तोंड लागलें होतें. पण ह्या युद्धाला ना नेता, ना योजना; अशी स्थिति होती. त्या वेळीं तेथें जमलेल्या सर्व लोकांच्या मनांत फक्त एकच हेतु होता.—रेडिओ बुडापेस्ट हस्तगत करण्याचा.

• • •

## ऑक्टोबर २४, १९५६

**आम्ही** सँडॉर स्ट्रीटवर जाऊन पोहोंचलों, तेव्हां मध्यरात्र उलटून गेली होती. जवळपास त्याच वेळीं शस्त्रास्त्रांनीं भरलेल्या आणखी तीन ट्रक्स तेथें येऊन थडकल्या. सेपेलला गेलेली तुकडी परत आली होती. तेथील दारूगोळयाच्या कारखान्यांतून त्यांनीं हस्तगत करतां येईल, तेवढा 'माल' रणांगणावर आणून टाकला होता. त्यांनीं आपण कम्युनिस्ट व्हॉलंटिअर्स असल्याचा बहाणा केला होता त्यांची युक्ति पण संपूर्ण यशस्वी झाली होती. आत्तां, ह्या क्षणाला तरी निदान आमच्या हाताशीं भरपूर शस्त्रें होती रेडिओच्या इमारतींत कमींत कमी पन्नास तरी गुप्त पोलिस असावेत. कारण प्रत्येक खिडकींतून बाहेरच्या जमावावर गोळयांचा वर्षाव होत होता. आम्ही आजूबाजूच्या घरांच्या छपरांवर चढलों. रेडिओसमोर जी इमारत होती, तिच्या छपरावर मी चढलों आणि वाकून खालीं पाहिलें, तर रेडिओइमारतीच्या समोर जवळजवळ तीस प्रेतें अस्ताव्यस्त पडलेलीं दिसलीं.

अनुक्रमांक २८४६८ दि.


ह्या वेळपर्यन्त सर्व बुडापेस्ट जागें झालें होतें. दहा लाखांपेक्षा अधिक लोक गेल्या बारा वर्षांनंतरचें पहिलेंच सशस्त्र युद्ध कौतुकानें बघत होते. रेडिओ बुडापेस्टजवळ गुप्त पोलिसांनीं केलेल्या कत्तलीची बातमी मध्यरात्रीनंतर गांवभर वणव्यासारखी पसरली. आणि मग गांवभर 'एव्हीएच' पोलिसांची शोधाशोध तावडतोब सुरू झाली. ह्या वेळीं रात्रीं एकचा सुमार असावा.

आणखी दोन तासांनीं रेडिओ बुडापेस्ट आमच्या ताब्यांत आला. रात्रीं तीन वाजतां.

आणि मग फिकट चेहे-यांचे, भेदरलेले, थरथर कांपत असलेले 'एव्हीएच' पोलिस दोन्ही हात वर धरून त्या इमारतींतून बाहेर पडले. दारांतच बाजूला सोळा वर्षांचा एक कोवळा मुलगा उभा होता. त्याच्या गळयांत काडतुसांचा पट्टा होता आणि हातांत त्याच्याच उंचीची बंदूक होती. तो एकदम पुढें झाला; आणि बाजूनें जाणाऱ्या एका पोलिसाच्या थोबाडींत त्यानें अशी कांहीं सणसणीत ठेवून दिली कीं, विचारतां सोय नाहीं. त्याचेंच उदाहरण नंतर कित्येक विद्यार्थ्यांनीं गिरविलें आणि मग मात्र 'एव्हीएच'च्या मुर्दाड, लाचार, भाडखाऊ भेकडांना पळतां भुई थोडी झाली. कारण एक गोष्ट त्या क्षणाला त्यांना कळून चुकली होती. गेलीं बारा वर्षें ज्या लोकांना त्यांनीं बलात्कारानें छळलें होतें, ते लोक आतां दयामाया मुळींच दाखविणार नाहींत.

आमच्यापैकीं कांहीं बंडखोरांचें लक्ष त्या पोलिसांच्या दुरवस्थेकडे वळलें. त्यांनीं सर्व गुप्त पोलिसांना एका ठिकाणीं गोळा केलें आणि दाराजवळच उभ्या असलेल्या दोन ट्रक्समध्यें त्यांची भरती केली. पोलिसांबद्दल त्यांच्या मनांत मोठासा प्रेमभाव होता, अशांतला भाग नाहीं. पण संतप्त आणि सशस्त्र लोकांच्या सूडप्रवृत्तीपासून त्यांचें संरक्षण करावें, असें आमच्यापैकींच कांहीं जणांना वाटलें, ही गोष्ट मात्र अगदीं खरी. आणि कालांतरानें बंडखोरांनीं गुप्त पोलिसांना थंडपणानें, विचारपूर्वक ठार मारलें, हें खरें असलें, तरी रेडिओस्टेशन आमच्या ताब्यांत आल्यानंतर कोणी एक पोलिस लोकांच्या प्रखर सूडबुद्धीचा बळी झाला, असें घडलें नाहीं. ट्रक्समध्यें घालून त्यांना दूर नेण्यांत आलें, तें त्यांचा योग्य त्या तऱ्हेनें

इन्साफ करावा ह्याच हेतूनें. आमचा सरळ सामना चालू असतां पांच पोलिस रेडिओच्या इमारतींतच मरण पावले होते.

पण 'एव्हीएच'नें आपलें काम बरोबर बजावलें होतें. थोड्याच वेळांत आम्हांला आढळून आलें कीं रेडिओस्टेशनमधील ध्वनिक्षेपणाच्या बहुतेक सर्व यंत्रसामग्रीचा संपूर्ण विध्वंस करण्यांत आला आहे. क्षीण शक्तीचा एक ध्वनिक्षेपक आम्ही कसावसा उभा करूं शकलों. पण त्याचा आवाज बुडापेस्टच्या आसपास कांहीं थोडे मैल ऐकूं जाण्यासारखा होता. त्यामुळें खुद्द रेडिओस्टेशन बंडखोरांनीं उध्वस्त केल्याची बातमी त्याच रेडिओवरून आम्ही फक्त बुडापेस्टबाहेरच्या मर्यादित हद्दींतील फारच थोड्या लोकांस देऊं शकलों. ज्या ज्या ठिकाणीं टेलिफोननें संबंध जोडतां येणें शक्य होतें, त्या त्या ठिकाणीं अर्थातच ही बातमी आम्ही देऊं शकलों. पण बुडापेस्टच्या बाहेर कित्येक प्रादेशिक विभागांस आमच्या बंडाची बातमी मुळीच मिळूं शकली नाहीं. त्याला आमचा कांहीं इलाज नव्हता.

ह्या वेळपर्यंत कम्युनिस्ट रेडिओ पुन्हा चालू झाला होता; आणि पूर्वीचेंच श्रवणक्षेत्र तसेंच अबाधित ठेवून. फरक एवढाच होता कीं ह्या वेळीं ध्वनिक्षेपण होत होतें, तें गृहखात्याच्या इमारतीतून; तात्पुरत्या उभारलेल्या रेडिओ-स्टेशनमधून. पहाटे साडेचार वाजतां कम्युनिस्ट रेडिओनें दिलेली ही बातमी आम्हीं आमच्या कानांनीं ऐकली. 'फॅसिस्ट व प्रतिगामी बंडखोरांनीं आज कांहीं काळ रेडिओ बुडापेस्ट इमारतीचा ताबा मिळविला होता——पण आतां त्याची तेथून हकालपट्टी करण्यांत आली आहे.'— साक्षात् रेडिओ बुडापेस्ट इमारतीच्या आंतल्या भागांत बसून कम्युनिस्ट रेडिओवरून सांगितली गेलेली ही धडधडीत खोटी वार्ता आम्ही ऐकत होतों. आतां रेडिओ-इमारती-वर आमचाच संपूर्ण ताबा होता.

पहाटे पांच वाजण्याच्या सुमारास मी अगदीं पार थकून गेलों होतों. शिवाय दिवसरात्रीच्या अखंड घडामोडींत मी गुंतून पडलों होतों. त्या काळांत माझ्या बायकोचें कांहींच वर्तमान मला समजलें नव्हतें. त्यामुळें तिची एक काळजी माझ्या मनाला एकसारखी लागून राहिली होती. कांहीं थोड्या क्षणांसाठीं कां होईना, पण मला एकदां घरीं जाणें भाग होतें. ती सुखरूप आहे, अशी मला खात्री करून घ्यावयाची होती. आणि एखाद्या सुरक्षित

निवाऱ्याच्या जागीं तिला नेऊन ठेवणें आवश्यक होतें. ईल्हा गरोदर होती, म्हणून मीं पूर्वी सांगितलेंच आहे. नाहीं तर ह्या आणीबाणीच्या वेळीं इतर विद्यार्थ्यांच्या खांद्याला खांदा भिडवून ती लढली असती.

माझ्या घराजवळ राहणारे आणखी दोन सहकारी तेथें होते. त्यांना बरोबर घेऊन मी बुडा भागांतील आमच्या घराच्या दिशेनें चालावयास लागलों. कॅल्व्हिन स्क्वेअर, वाम्हाझ कोरूट, लिबर्टी ब्रिज असा आमचा रस्ता होता.

नुकतेच पांच वाजले होते. रस्त्यानें जातांना सहज दूरवर आमची नजर गेली. डॅन्यूब नदीच्या पलीकडच्या कांठावर गेलर्ट हिल्च्या पायथ्याशीं असंख्य छाया हलतांना दिसत होत्या. त्यावरून एक गोष्ट आम्हांला समजून चुकली. हजारों माणसें त्या ठिकाणीं गोळा झालीं असलीं पाहिजेत. आम्ही पुलाजवळ आलों, तेव्हां पलीकडचें दृश्य अधिक स्पष्ट झालें. बुडापेस्ट-मधील असंख्य स्त्रिया तेथें गोळा झाल्या होत्या. त्यांच्यापैकीं कोणाचा पति, कोणाचा पुत्र, कोणाचा भाऊ, तिकडे कोठें तरी लढत होता. आणि येथें हातांत जळत्या मेणबत्त्या घेऊन प्रार्थनामंदिरांत जाण्यासाठीं अधीर झालेल्या स्त्रियांच्या प्रचंड रांगा दिसत होत्या. येथेंच पॉलिस्ट फादर्सचें सुप्रसिद्ध केव्ह चॅपेल होतें. ह्याच प्रार्थनामंदिरांत कार्डिनल मिंडझेंटी अखेरचें प्रवचन करीत असतांना गुप्त पोलिसानीं त्याला गिरफदार केलें होतें.

पहाटेच्या काळोखांत एकत्र जमून ह्या लक्षावधि स्त्रिया एकमुखानें परमेश्वराची करुणा भाकीत होत्या. बंडखोराना जय मिळावा म्हणून प्रार्थना करीत होत्या.

बेला बार्टोक स्ट्रीटवर आम्ही आलों, त्या वेळीं सशस्त्र कामगारांनीं भरलेल्या ट्रक्सची एक भलीमोठी रांग पुलाच्या दिशेनें पेस्ट भागाकडे भर-धांव जातांना दिसली. हे सर्व शूर कामगार बंडखोरांना साथ देण्यासाठीं रणांगणाच्या रोखानें निघाले होते.

कामगारांच्या हातांत तिरंगी राष्ट्रध्वज फडकत होते. प्रत्येक निशाणाच्या मध्यभागीं वाटोळीं भोकें दिसत होतीं. भोकांच्या ठिकाणीं पूर्वी केव्हां तरी लाल तारे होते, ते कामगारांनीं खिशांतील चाकू काढून, कापून टाकलें होते. आमच्या अपेक्षित राज्यक्रांतीचा ध्वज अशा रीतीनें आपोआप निश्चित

झालेला दिसला. लाल, शुभ्र आणि हिरवा. हंगेरीचा हा तिरंगी राष्ट्रध्वज आणि त्याच्या मधोमध तान्याच्या आकाराचें दुरून वाटोळें दिसणारें भोक. आगामी क्रांतीचा अग्रदूत असा हा आमचा राष्ट्रध्वज होता.

कांहीं ठिकाणीं आम्हीं पाहिलें, तर सैनिक आणि शिपाई ट्रक्स वाटेंत थांबवीत होते, आणि आपल्या जवळचीं शस्त्रें कामगारांच्या स्वाधीन करीत होते. कामगारांच्या हातीं सैनिकांनीं आपलीं रिव्हॉल्व्हर्स आपखुपीनें स्वाधीन केलेलीं आम्ही आमच्या डोळ्यांनीं साक्षात् बघत होतों.– "आत्तां पुरतीं तुम्ही हीं घेऊन जा."–एक सैनिक मोठ्यानें ओरडून कामगारांना सांगत होता,–"आम्ही तेथें आलों की परत आमची हत्यारें मागून घेऊं." त्या क्षणाला तरी निदान वातावरण आशादायक दिसत होतें.

ह्या वेळीं रस्यावर एकसुद्धां रशियन सैनिक कोठें दिसत नव्हता. आमच्या बाजूला येऊन मिळालेल्या एका रशियन सैनिकानें नंतर आम्हांला सांगितलें कीं, सोव्हिएट सैन्याधिकाऱ्यानें सोव्हिएट लष्कराला बराकींतच रोखून ठेविलें होतें. ह्या वेळेला तिकडे गांवांत जें कांहीं घडत होतें, त्याच्या–पासून सोव्हिएट सैनिकांनीं अलिप्त राहावें, असा सक्त हुकूम देण्यांत आला होता.

**ज्या** खोलीला मी माझें घर समजत होतों, त्या खोलीच्या दारांत येऊन पोहोंचल्यावर मीं माझ्या दोन्ही मित्रांचा निरोप घेतला आणि मग ईव्हाला बघण्यासाठीं मी धांवत आंत गेलों.

ती रेडिओला कान देऊन बसली होती. ती माझ्या पावलांचा आवाज ऐकतांक्षणीं दचकून उभी राहिली. दारांतून मी आंत आलेला दिसलों, तेव्हां तिनें छातीवर दोन्ही हात दाबून धरले; आणि वेड्यासारखी माझ्याकडे बघत ती उभी राहिली. दाढी वाढलेली, पायांपासून डोक्यापर्यंत धुळीनें आणि सिमेंटनें सारें अंग माखलेलें, मशीनगन्सच्या आणि शस्त्रास्त्रांच्या वंगणाचे डांबरी डाग कपड्यावर पडलेले, असें त्या वेळचें माझें ध्यान होतें.

एक क्षणभर तिनें मला ओळखलें नाहीं, हेंच खरें. नंतर जेव्हां खिडकीजवळच्या अंधुक प्रकाशांत मी जाऊन उभा राहिलों, त्या वेळीं बहुतकरून तिला माझी ओळख एकदम पटली असावी. ती लगेच धांवत माझ्याजवळ आली आणि मला मिठी मारून म्हणाली, " लाझलो.. अरे,

काय ही दशा झाली आहे तुझी ?...आणि हा रेडिओ काय खोटारडा आहे ?...मला असं झालं होतं कीं आपली भेट कधीं होणार आहे कीं नाहीं, कोणास ठाऊक ?...बरं, पण एवढा वेळ तूं होतास तरी कुठें ?...काय करीत होतास ?"

तिला जवळ घेऊन तिच्या पाठीवरून हात फिरवीत थोडक्यांत मीं तिला सर्व हकीकत सांगितली. बोललों तें अगदीं थोडें आणि तेंसुद्धां घाई-घाईनें. बोलतांबोलतां मीं तिला हळूच खाटेवर नेऊन बसविलें. गांवाबाहेर चार फळकुटें धुडून मींच माझ्या हातांनीं ती कामचलाऊ खाट कशी तरी बनविली होती. तरी बरें, रेडिओ बुडापेस्टच्या इमारतीच्या जवळपास मी कोठें तरी होतों, हें अजूनपर्यंत तिला ठाऊक नव्हतें. नाहीं तर एव्हांना बेभान होऊन तिनें नुसता गोंधळ केला असता. पण आतां मात्र एकीकडे ती शांतपणानें रडत होती, आणि एकीकडे बोलत होती.

"अरे, गेले दोन दिवस तुझी कांहीं बातमी कळेल, म्हणून धडपडतें आहें. तुला फोन करण्याचा प्रयत्न केला. आपल्या माहितीचे मित्र होते, त्यांना पण रिंग करून पाहिलें. तूं कोठें होतास, त्याचा मला कांहींच पत्ता नव्हता. आणि टेलिफोनवर कोणी बोलतच नव्हते. एकदोन ठिकाणीं शेवटीं निरोप पाठविले, तेव्हां कळलं कीं, आपल्या मित्रांपैकीं गेल्या दोन दिवसांत कोणी घरी आलेच नव्हते. तूं कुठें होतास, हें कळायला कांहीं मार्गच नव्हता. तुझ्या काळजीनें मी अगदी खंगून गेलें आहें. बघ."

ईव्हानें त्या तशा घाईंत मला खाण्यासाठीं थोडेंसें करून दिलें. मला युनिफॉर्ममध्यें पाहून तिला मनस्वी अभिमान वाटला असावा, अशी माझी समजूत झाली. युनिफॉर्म तरी कसला, म्हणा ? माझा एक जुनाट, मळकट तपकिरी सूट होता, तोच मी गेले दोन दिवस अंगावर वागवीत होतों. माझ्या डाव्या खांद्यावर तिरंगी रिबन होती. चामडयाच्या वादींत अडकवलेली एक सोव्हिएट टॉमीगन माझ्या खांद्यावर होती. माझ्या पट्टयावर चार हँड-ग्रेनडस् लोंबत होतीं. तीन वर्षांपूर्वीं सैन्यांत मीं लष्करी शिक्षण घेतलेलें होतें. माझी अशी समजूत होती कीं त्या काळांतल्यापेक्षां आज शस्त्रसामुग्री अधिक सुसज्ज होती.

लाऊड स्पीकरच्या गाडया खालच्या रस्त्यावरून एकसारख्या गस्त घालीत फिरत होत्या. 'स्वातंत्र्ययुद्धांत सर्व नागरिकांनीं यथाशक्ति सर्व

मदत करावी,'— असें आवाहन ध्वनिक्षेपकांतून वातावरणांत सर्वत्र घुमत होतें.—'लढतां येत असेल, तर लढा द्या. तें शक्य नसेल, तर जखमी सैनिकांस शक्य तें साहाय्य द्या, शस्त्रं द्या, पैसे द्या. शक्य त्या सर्व मार्गांनीं हंगेरीला मदत करा.'

नंतर थोडय़ाच वेळानें ध्वनिक्षेपकावरून दिलेली घोषणा मीं ऐकली,—'हजारोंच्या संख्येनें सामील व्हा...पार्लमेंट स्क्वेअरमध्यें सर्व जनता पुन्हा एकदा निदर्शनें करणार आहे...हजारोंच्या संख्येनें सामील व्हा.'

ही घोषणा ऐकतांक्षणीं मी फोनकडे धांवलो. आणि लगेच झोलि साबायला फोनवर बोलावून घेतलें. आमच्या कौन्सिलच्या ४३ सभासदांपैकीं तो एक होता.

इम्रे नाजला व्यक्तिशः जोडणारा असा झोलि हा एकच एक दुवा विद्यार्थी–संघटनेंत होता. नाजशीं त्याची ओळख असण्याचें कारण म्हणजे त्याचा वडील भाऊ नाजचा दोस्त होता. झोलीनें मला फोनवर सांगितलें कीं गेरोनें सोव्हिएट सैन्यास शहरांत बोलावून घेतलें आहे. हेगेडसचें सरकार आतां नामशेष झालें आहे आणि त्याच्या जागीं नाजनें नव्या सरकारची स्थापना केली आहे. त्यानें आणखी सांगितलें कीं, नाजला विद्यार्थी–संघटनेच्या प्रतिनिधींशीं बातचीत करण्याची इच्छा आहे. पार्लमेंट स्क्वेअरमध्यें सकाळीं ९ वाजतां कौन्सिलचे पदाधिकारी जमणार होते. त्या वेळीं तेथें त्यानें मला बोलावलें.

झोलीशीं बोलून झाल्यावर मी पुन्हा ईव्हाजवळ जाऊन बसलों. अलीकडे ती सदा रेडिओजवळ बसलेली दिसे. गेले सहा महिने आमच्या दुपारच्या जेवणांत अमानुष काटकसर करून अन्नाच्या मोबदल्यांत आम्हीं हा रेडिओ मोठ्या मिनतवारीनें विकत घेतला होता. तो रेडिओ आतां कम्युनिस्टांचे संदेश ध्वनिक्षेपित करीत होता ! त्या संदेशांतील अखेरचीं वाक्यें मीं ऐकलीं, तीं अशी. 'सरकारनें सोव्हिएट लष्कराला मदतीसाठीं पाचारण केलें आहे. कारण बंडखोरांच्या टोळ्या गांवांत सर्वत्र धुमाकूळ घालीत फिरत आहेत. लोकहो, सोव्हिएट सैनिक आपले दोस्त आहेत; मदतगार आहेत. त्यांचें स्वागत करा. कृपा करून आपआपल्या घरांतील रेडिओ रस्त्यावरच्या खिडक्यांतून नेऊन ठेवा. म्हणजे सर्व नागरिकांना सरकारचा हा संदेश

समजेल...आणि बुडापेस्टमध्यें मार्शल लॉ पुकारण्यांत आला आहे, हें लक्षांत ठेवा.'

म्हणजे आमच्या मनांतील शंका खरी होती तर? ह्या क्षणापर्यंत नाजवर आमचा विश्वास होता. पण आतां बघतों, तर गेरो, पिरोस आणि हेगेडस्सारख्या कट्टर कम्युनिस्टांचा केवळ एक हस्तक म्हणून तो काम करीत होता. नाजच्या नांवानें त्यांनीं बुडापेस्टमध्यें आतां मार्शल लॉ पुकारला होता. आणि नाजच्या नांवानें त्यांनीं सोव्हिएट मार्शल कोनीव्ह ह्या देशभक्तास मारून काढण्यासाठीं आपलें सैतानी लष्कर रवाना करण्यास सांगितलें होतें.

आम्हांला माहीत होतें कीं इम्रे नाज हा माणूस स्वत:च्या देशावर असा उलटणारा नव्हे. कांहीं झालें, तरी सोव्हिएट तुरुंगांत त्यानें अनेक कष्टप्रद वर्षें काढलीं होतीं. पण त्याच वेळीं राजकीय सत्ताधाऱ्यांनीं रोखलेल्या बंदुकांची सत्ता काय असते, त्याचा प्रत्यय पण आम्हांला नव्हता, असें नाहीं. बोलूनचालून नाज हा एक दुर्बल मनाचा माणूस होता. आणि आणीबाणीच्या संकटकाळीं अशा रीतीनें तडजोड पत्करण्याशिवाय त्याला गत्यंतरच नव्हतें.

खरे हरामखोर लोक होते, ते म्हणजे स्वत: गेरो आणि त्याचे हस्तक! आणि 'एव्हीएच' गुप्त पोलिस.

तेव्हां ह्या घटनेचा अर्थ असा कीं, तूर्त कम्युनिस्टांनीं इम्रे नाजच्या नांवाचा गैरवाजवी फायदा घेतला होता. कारण त्यांना माहीत होतें कीं ह्या वेळीं लोक फक्त नाजवर विश्वास ठेवतील. तेव्हां चाणाक्ष कम्युनिस्टांनीं नाजलाच आपला हस्तक बनविला होता.

पण आतां पार्लमेंट चौकांत जाण्याची वेळ झाली होती. ईव्हाचा मुका घेऊन मीं तिचा निरोप घेतला. जातांजातां मीं तिला सांगितलें कीं, संध्याकाळपर्यंत केव्हां तरी मी परत येईन, आणि तेथून तिला हलविण्याची व्यवस्था करीन.

नंतर मी घाईघाईनें रस्त्यावर आलों. आणि जरा इकडेतिकडे बघत उभा राहिलों. तेवढ्यांत अपेक्षेप्रमाणें तरुण कामगारांनीं खच्चून भरलेली एक आर्मी ट्रक रस्त्यानें जातांना दिसली. त्या ट्रकमध्यें मुळींच जागा नव्हती

तरी मी घुसलों. ते लोक जवळच्या बुडाफोक गांवांतून आले होते. आणि क्रांतियज्ञांतील आपला हविर्भाग देण्यासाठीं मोठ्या उत्साहानें ते रणांगणावर चालले होते. त्यांनीं मला एक नवीनच बातमी दिली. प्रचंड तोफखाना आणि रणगाडे घेऊन दक्षिण दिशेनें सोव्हिएट पलटणी बुडापेस्टवर चाल करून येत होत्या. तें दृश्य त्यांनीं आपल्या डोळ्यांनीं साक्षात् पाहिलें होतें. आणि तरी सुद्धां स्वातंत्र्यासाठीं लढणारे हे शूर शिपाई केवळ बलिदान करण्यासाठीं युद्धभूमीवर जात होते. ती बातमी कळल्यावर पार्लमेंट चौकांत जाण्याचा विचार मीं रद्द केला. ह्यापुढें शांततेनें निदर्शनें पार पडतील, अशी आशा फारच थोडी होती. आतां ह्यापुढें कांहीं काळपर्यंत शांततेला सवड सांपडणार नाहीं, हें मला कळून चुकलें होतें.

सध्यां आम्ही ज्या भागांतून जात होतों, तेथून जोसेफ नाडोर टेक्निकल युनिव्हर्सिटी सर्वांत जवळ होती. त्या वेळीं आमची ट्रक फेहेरव्हारि स्ट्रीटवरून जात होती. तेथून एक मैलभर अंतरावर ही युनिव्हर्सिटी होती. तिच्या रोखानें ट्रक चालविण्यास मीं ड्रायव्हरला सांगितलें. आम्ही तेथें जाऊन पोहोचलों, तेव्हां तेथें हजारों विद्यार्थी व तरुण माणसें गोळा झालेलीं दिसलीं. मी लगेच धांवत्या ट्रकवरून उडी मारून खालीं उतरलों. आणि लगेच मधल्या लॉबीच्या दिशेनें धांवत सुटलों. तेथें मला आमच्या कौन्सिलचे तीन सभासद दिसले. कांहीं थोड्याच दिवसांपूर्वीं हर्माशाटार–हेगीच्या माळरानांत आमची पहिली सभा झाली होती, तेव्हां तेथें मला पाहिल्याचें त्यांना आठवत होतें.

सोव्हिएट लष्कराच्या हालचालींची मीं त्यांना माहिती दिली. पण त्यांनीं उपहासपूर्वक हंसून माझ्या बातमीकडे दुर्लक्ष केलें. सोव्हिएट लष्कर शेवटीं येऊन थडकणार, असें सर्व जण गृहीतच धरून चालले होते.

आतां ह्यापुढें औपचारिक सभा वगैरे बोलावण्यास तशी सवड नव्हती. त्या तीन विद्यार्थ्यांनी कॉलेज फॅकल्टीज्मधील माझ्या ओळखीच्या दोस्तांची भेट घेण्यास मला सांगितलें. जर यदाकदाचित् त्यांच्या कानांवर सोव्हिएट लष्कराच्या आगमनाची बातमी अजूनपर्यंत थडकली नसेल तर मीं त्यांना योग्य तो इशारा द्यावा, असें त्यांनीं मला सांगितलें.

अजूनपर्यन्त टेलिफोनचें दळणवळण आमच्या ताब्यांत होतें, ह्याबद्दल

मीं मनोमन देवाचे आभार मानले. निदान टेलिफोनच्या साहाय्यानें अपेक्षित ती सर्व व्यवस्था करतां येणें शक्य होतें.

म्हणून मीं पहिल्यांदा कॉलेज ऑफ आर्टसमधील माझ्याच फॅकल्टीला फोन केला. तेथील माझ्या दोस्तांना मीं निक्षून सांगितलें कीं कदाचित् सर्व रशियन लष्कराशीं आणि हंगेरिअन गुप्त पोलिसांशीं मिळून आपल्याला लढा द्यावा लागेल. माझ्या बातमीनें कोणाला धक्का बसला आहे, असें मला मुळींच आढळलें नाहीं उलट ह्या नव्या बातमीनें ते सर्व जण उल्हसित झाल्यासारखे दिसले. जणु काय ते ह्या महोत्सवाची वाटच बघत होते. शेवटीं निदर्शनापासून कोणाला परावृत्त करण्याचा नाद मला सोडून द्यावा लागला. नाहीं तरी माझ्या इच्छेविरुद्ध केवळ कर्तव्यबुद्धीनें मी कौन्सिलच्या सभासदांस हें असें आवाहन करण्याचा यत्न करीत होतों. पण माझे सर्व सहकारी खंबीर आहेत, अशी खात्री पटल्यावर त्यांच्यापैकीं एकाला मी एक नवी योजना समजावून सांगितली. गोळा करतां येतील, तेवढे सर्व विद्यार्थी व युवक बरोबर घेऊन त्या सर्वांनीं बोरावोस स्क्वेअरमध्यें ताबडतोब जमावें. दक्षिणेकडून सोरोक्सारी स्ट्रीटनें चालून येणारें रशियन लष्कर बहुतकरून एक तासाभराच्या अवधींत तेथें येऊन पोहोंचेल, असा आमचा अंदाज होता, आणि म्हणून टेक्निकल युनिव्हर्सिटीचे बहुतेक सर्व विद्यार्थी तेथें दबा धरून बसणार होते.

नंतर हाच एक संदेश मी मेडिकल स्कूल, व्हेटेरिनरी कॉलेज आणि कॉलेज ऑफ फिझिकल एज्युकेशन, ह्या शिक्षणसंस्थांतील सर्व विद्यार्थ्यांस वेळेवर मिळेल, अशी मीं योजना केली. 'स्टूडंट्स कौन्सिल'च्या नांवानें सर्व विद्यार्थ्यांस साद घालून मीं त्यांना बंडखोर सैन्यांत आपलें स्थान शोधण्याचा संदेश दिला. शक्य तेवढें लवकर, एका क्षणाचासुद्धां विलंब न लावतां प्रत्येक विद्यार्थ्यानें युद्धक्षेत्रावर आपलें स्थान शोधावें, असा कौन्सिलचा सक्त आदेश आहे, असें शेवटीं मीं सर्वांस निक्षून सांगितलें.

रशियन फौजा जेथून गांवांत शिरूं शकतील, अशीं एकूण तीन ठिकाणें होतीं. आणि तीं तिन्हीं ठाणीं प्राणपणानें लढविणें आवश्यक होतें. टेकड्या उतरून त्यांनीं बुडा भागांत प्रवेश केला, तर ते झेन। स्क्वेअरमध्यें प्रथम येतील. ह्या ठिकाणीं सबवे स्टेशनचा आश्रय करून तटबंदी उभारण्याची

सोय होती. जर ते फेहेर्व्हारि स्ट्रीटनें शहरांत घुसले तर केलेन फोल्डमधील माझ्या घरापासून एका हांकेच्या अंतरावर मॉरिझ झिग्मंड सर्कल होतें, तेथें लढा द्यावा लागला असता. तिसरें ठाणें म्हणजे हॉर्थी ब्रिजच्या पेस्ट भागांतील बोरारोस स्क्वेअर.

टेक्निकल युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी आपल्या विद्यापीठाच्या आवाराचेंच रणक्षेत्र करावयास उत्सुक होते. टेक्निकल युनिव्हर्सिटीची वास्तु ज्या ठिकाणीं उभी होती, ती जागा खरोखरच युद्धाच्या दृष्टीनें सर्वथा अनुकूल अशी होती. पहिली गोष्ट म्हणजे ही वास्तु नगराच्या मध्यभागीं होती. आणि तिचा विस्तार केवळ प्रचंड असा होता. ह्या एका शिक्षणसंस्थेंत जवळपास पांच हजार विद्यार्थी एका वेळीं शिकत होते.आणि केवळ तळमजल्यावर एकूण १८० वर्गांच्या व प्रयोगशाळांच्या खोल्या होत्या. विद्यार्थ्यांनीं ह्या मध्यवर्ती वास्तूचा केव्हांच ताबा घेतला होता. आणि कोणत्या खोल्या कोणत्या कामासाठीं उपयोगांत आणावयाच्या त्याचीसुद्धां व्यवस्थित खातेवार वांटणी होऊन चुकली होती. कांहीं वर्गांतून मशीनगन्सचा सांठा रातोरात करून ठेवण्यांत आला होता. ह्या खोल्यांतून जरुरीप्रमाणें लढवय्यांना मशीनगन्स देण्यांत येत होत्या कांहीं वर्गांतून दारूगोळ्याचे आणि शस्त्रास्त्रांचे साठे करून ठेवण्यांत आले होते. कांहीं वर्गांतून वेगवेगळ्या कमिट्यांचीं सभागृहें व त्यांचीं कार्यालयें थाटण्यांत आलीं होतीं. एका वर्गांत केवळ ध्वज होते. दुसऱ्या वर्गांत नुसत्या रिबन्स होत्या. अर्थातच कांही मोठ्या वर्गांतून रेडक्रॉस हॉस्पिटलमधील मिळतील तीं उपकरणें, साधनें एकत्र जमवून ठेवण्यांत आलीं होतीं.

कोणी विचारतील, रिबन्ससाठीं एक स्वतंत्र वर्ग, म्हणजे ही काय भानगड आहे ? आमच्या लेखीं ह्या रिबन्सचें महत्त्व केवळ अनन्यसाधारण असें होतें. दोस्त कोण व शत्रु कोण तें ओळखण्यास तें एकच एक साधन उपलब्ध होतें. जीवनमरणाच्या ह्या लढाईंत शत्रुमित्र ओळखणें अत्यंत महत्त्वाचें होतें.

माझ्या कमिटीच्या कार्यालयांत बसून मी कोणाशीं तरी फोनवर बोलत होतों. तेवढ्यांत तेथें एक तरुण मुलगी धांवतधांवत आली. तिच्या दोन्ही खांद्यांवर चामड्याचे पट्टे आवळलेले होते. त्या पट्ट्यांवर कमींत कमी दहा हॅंड ग्रेनेड्स तरी लटकावलेलीं होतीं. तिच्या हातांत तिच्या उंचीची एक

मशीनगन होती; आणि तिच्या एका हाताच्या मनगटावर बँडेज बांधलेलें होतें.

" माझ्याजवळ दारूगोळा भरपूर आहे. "— माझ्याकडे वळून ती म्हणाली, " पण मला माझी रिबन कुठें मिळेल, तें कृपा करून सांगाल का? कालचा दिवस माझ्याजवळ रिबन नव्हती, तर लगेच मला हा प्रसाद मिळाला, बघा."— असें म्हणून बँडेज बांधलेला आपला हात तिनें माझ्या समोर धरला आणि ती म्हणाली,—"आज माझी तिरंगी रिबन घेतल्याशिवाय मी येथून बाहेर पडणार नाहीं."

तिची अडचण ओळखून मीं तिला जवळच्या एका विद्यार्थ्याच्या स्वाधीन केलें. तो तिला घेऊन रिबनरूमच्या रोखानें चालावयास लागला.

रेडिओवरून अखंड दिवसरात्र कम्युनिस्टांचा विषारी प्रचार वातावरणांत प्रसृत होत होता.— 'बुडापेस्टमधील स्त्रियांनो, आपआपले नवरे सांभाळा. त्यांना युद्धाच्या खाईत जाऊं देऊं नका. बंडखोरांना मदत करण्यासाठीं ते जातील, तर नाहक मरतील. आयाबहिणीनो, आपआपलीं मुलें नीट सांभाळा. त्यांना घराबाहेर जाऊं देऊं नका. रस्त्यारस्त्यांतून मशीनगन्सचा भडिमार चालू आहे. शक्य तर घरांतील सर्व मुलांना एकाच खोलींत डांबून ठेवा.'

ह्या वेळपर्यन्त आम्हांला एक गोष्ट स्पष्ट कळून चुकली होती; ती ही कीं, रशियन लष्कर ह्याच मार्गानें निश्चित जाणार आहे. आणि येथेंच प्रथम घनचक्कर लढाई जुंपणार आहे. तेव्हां ईव्हाला आतां आमच्या लहानशा खोलींतून हलविणें भाग होतें. तेव्हां माझ्या एका विद्यार्थी–मित्राच्या घरीं तिची राहण्याची व्यवस्था करून देण्याचें मीं ठरविलें. तेथें निदान पहारेकऱ्याच्या जाचांतून तिची मुक्तता होईल. स्वतःच्या सर्व हालचालींवर गुप्त पोलिसाची सतत टेहळणी असणें, म्हणजे काय गोष्ट आहे, ह्याची कदाचित् तुम्हांला कल्पना नसेल. चाळींचाळींतून कम्युनिस्टांच्या हाऊस कमिटया काम करीत होत्या. ह्या कमिटया कम्युनिस्टांना एकूणएक सर्व खबर चोख पुरवीत असत. संशयास्पद अशा प्रत्येक हालचालीवर 'एव्हीएच'ची सक्त नजर असे. अशा स्थितीत माझ्या बायकोच्या बाबतींत कांहीं तरी झटपट निर्णय घेणें जरुरीचें होतें. म्हणून वेळांत वेळ काढून मीं एक छोटी जीपगाडी

घेतली आणि ईव्हाला आणण्यासाठीं घरीं गेलों. तिनें अंगावर रेनकोट चढविला आणि जरूर त्या सर्व वस्तु एका छोटया बॅगेंत कोंबल्या. मोठ्या कष्टानें गोळा केलेल्या माझ्या खोलींतील सर्व वस्तु तेथेंच टाकून आम्ही झपाटयानें निघालों. दारांत दारवान उभाच होता. त्यानें आम्हांला हटकलें. मीं त्याला थाप मारली, वेळेदर सुचली ती. सांगितलें कीं, शंभर मैल दूर शहराच्या पश्चिम दिशेला माझ्या बायकोचें माहेर आहे; आणि तेथें मी तिला घेऊन जातों आहें.

साऊथ रेल्वे स्टेशनच्या नजीक विद्यार्थ्यांचें एक होस्टेल होतें. तेथून जवळच व्हर्मेझो नांवाचें मोठें मैदान होतें. (व्हर्मेझो म्हणजे रक्ततीर्थ, धारा-तीर्थ.) ह्या होस्टेलमध्यें माझ्या कित्येक लढवय्या दोस्तांच्या बायका सकाळपासून येतच होत्या. कारण हें ठिकाण तमें सुरक्षित होतें. फर्स्ट-एड सेंटर म्हणून आम्ही ह्या वसतिगृहाचा उपयोग वेळप्रसंगीं करणार होतों. पण अगोदरच तेथें रुग्णांची भरती झाली होती.

आतां दुपार टळून गेली होती. आज ऑक्टोबरची २४ तारीख. पण अजून गांवांत कोठें रशियन लष्कराची चाहूल लागलेली दिसत नव्हती. ठीक आहे. शत्रु दृष्टिपथांत येईपर्यंत आम्हांला दुसरीं पुष्कळ कामें होतीं. तोंपर्यंत 'एव्हीएच' गुप्त पोलिस हुडकून काढून त्यांची वाट लावणें जरुरीचें होतें.

ह्या वेळपर्यंत बुडापेस्टमधील जनता त्याच एका उद्योगांत गढून गेलेली होती. –'एव्हीएच्' मुर्दाबाद! – ही घोषणा रस्त्यारस्त्यांतून सर्वत्र ऐकूं येत होती. गुप्त पोलिसांची शिकार करणें, हा लोकांचा एक आवडता छंद झाला होता.

विद्यार्थी पांचपांच सहासहाच्या टोळक्यांनीं गांवभर फिरत होते. खुनी पोलिसांचा शोध घेत होते. दिसतील तेथें त्यांना गोळ्या घालीत होते. एका अमेरिकन जीपगाडींत मीं आणखी पांच विद्यार्थी कोंबून भरले. गाडी पंधरा वर्षांची जुनी होती पण अजून चांगलें काम देत होती. रस्त्या–रस्त्यांतून सर्वत्र मशीनगन्सच्या भडिमाराचे आवाज घुमत होते. बुडा भागांतील एका मोठ्या 'एव्हीएच्' ऑफिसच्या रोखानें आम्ही आमची जीप भरधांव सोडली. हें ऑफिस मार्टिर्स बोलव्हार्डजवळ होतें. ऑफिसची वास्तु

प्रचंड, राखी रंगाची होती. आंतमध्यें 'एव्हीएच्' पोलिस अजूनपर्यंत दबा धरून बसले होते; रस्त्यांवरील बंडखोरांवर गोळ्यांचा मारा करीत होते. ह्या इमारतीच्या समोर एक मोकळें मैदान होतें. त्या मैदानांत बंडखोरांनीं आसरा घेतला होता. तेथें हारीनें मशीनगन्स मांडून ठेविलेल्या होत्या. झाडांच्या आणि बाकांच्या मागें दडून बंडखोर पोलिसांच्या माऱ्याला परिणामकारक प्रत्युत्तर देत होते.

मधल्या चौकांतील एका कोपऱ्यांत उलथून टाकलेली एक ट्रक उभी होती. तिचा आडोसा करून कांहीं बंडखोर 'एव्हीएच्'ला जबाब देत होते. तेथील सर्व परिस्थिति आम्ही दुरून न्याहाळीत होतों. तेवढ्यांत ट्रकच्या मागें दडलेले दोन बंडखोर पोलिसांच्या गोळ्यांनीं नेमके टिपून काढलेले आम्हीं पाहिलें.

नंतर लगेच रेडक्रॉसची फीत हातावर बांधलेला एक तरुण स्वयंसेवक त्यांच्या मदतीसाठीं पुढें धांवला. आणखी दोघे पाठीमागून स्ट्रेचर घेऊन पुढें आले पण ते तिघेहि ट्रकपर्यन्त जाऊन पोहोंचले नाहींत, तोंच ते तिन्ही स्वयंसेवक वाटेंतच खालीं कोसळले. पोलिसांनीं त्यांचें टिपण अचूक साधलें होतें.

तेथून कोसूथ मिलिटरी ॲकॅडमी तशी फार दूर नव्हती. आणि तेथें दहाबारा रणगाडे जय्यत तयार ठेवलेले असत. कदाचित तेथें कोणी आम्हांला जरूर ती मदत देऊं शकतील, असें मला वाटलें. एकदोन रणगाडे आम्हांला मिळाले असते, तरी आमचें काम भागण्यासारखें होतें. मीं आणखी एक विद्यार्थी ओढून जीपमध्यें घेतला; आणि लगोलग आमच्या स्वाऱ्या मिलि-टरी ॲकॅडमीच्या आवारांत जाऊन थडकल्या.

आवारांत सारें कसें शांत शांत होतें. आम्ही मुख्य दरवाज्याजवळ येऊन पोहोचलों तेव्हां दारालगत जिन्याचा आडोसा करून दोन सैनिक पत्ते खेळण्यांत गढून गेलेले आम्हांला दिसले. सुदैवानें आम्ही तेथें आल्याचें त्यांनीं पाहिलें नव्हतें. मीं झट्दिशीं माझ्या दंडावरील रिबन ओरबाडून पँटच्या खिशांत कोंबली. आणि त्यांना न कळत त्यांच्या मागें जाऊन उभा राहिलों.

"मी 'ए व्ही एच्'चा ऑफिसर आहें. अशा वेळीं तुम्ही पत्ते खेळत होतात, म्हणून तुम्हांला मीं अटक केली आहे"– अठरा वर्षांच्या त्या भेद–रलेल्या पोरांना मीं दमांत ओरडून सांगितलें.

त्यांच्यापैकीं एक तगडा गडी खाडकन् उठून उभा राहिला.– त्याचे केस रुपेरी होते.– घाईघाईनें सलाम करून तोंडानें कांहीं तरी पुटपुटत त्यानें माफी मागितली.–" पण साहेब, आम्ही आतां ड्यूटीवर नाहीं आहोंत· आम्हांला वाटलें कीं आम्ही येथें खेळत बसलों, तर...तर..."

आतां मात्र मला हंसें आवरेना. खिशांतून मीं तिरंगी रिबन ओढून काढली. आणि धीर एकवटून त्यांना सांगितलें कीं हंगेरीच्या स्वातंत्र्यासाठीं आम्ही लढत आहोंत.

"पलीकडच्या केलेटि स्ट्रीटवरील 'एव्हीएच्' पोलिसस्टेशनवर आमचे लोक लढत आहेत. आम्हांला थोडीशी मदत हवी आहे. तेथील दारें तोडून आत घुसून पोलिसांना आम्ही बाहेर काढणार आहोंत." असें सांगून मीं चिलखती गाड्यांची उघड मागणी केली. तेव्हां त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, वरिष्ठ अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय तेथील गाड्यांना कोणी हात लावूं शकणार नाहीं तरीसुद्धा मीं त्यांना विचारलें,– "तुम्हांला गाडी चालवितां येते काय?"

"होय' मला येते."– त्यांच्यापैकी जो उंच होता, त्यानें सांगितलें.

'काय रे, तूं येथें खुशाल पत्ते खेळत बसला आहेस. त्याच्याऐवजीं देशासाठीं कांहीं करावें, असें तुला वाटत नाहीं काय?'– मीं त्याला विचारलें.

"ठीक आहे. आम्ही तुम्हांला मदत करूं."–बुटका होता तो म्हणाला, "एव्हीएच्' बरोबर तुम्ही लढत असाल, तर मी तुमच्या बाजूचा आहें. सत्ते–चाळीस सालीं माझा भाऊ सायबेरियन तुरुंगांतून परत आला, तेव्हां ह्याच लोकांनीं त्याला ठार मारलें होतें. तेव्हांपासून त्याच्या मरणाचा सूड घेण्याची संधि मी शोधतों आहें."

झालें. माझें काम झालें होतें. आम्हीं आवारांत गेलों. तेथें सात चिलखती गाड्या उभ्या होत्या. एक गाडी आम्हीं आमच्या ताब्यांत घेतली; दुसरी गाडी त्यांनीं बाहेर काढली. मालिनावस्की स्ट्रीटवरून आम्ही परतलों; तेव्हां वाटेनें लोकांचे थवे स्वातंत्र्याचीं गाणीं गात जात असलेले दिसले.

रस्त्यावर कांहीं दुकानें पुन्हा उघडलेलीं दिसलीं. दुकानांच्या बाहेर लोकांच्या लांबलचक रांगा लागलेल्या आम्हीं पाहिल्या. त्यांना बहुतकरून अन्नधान्य हवें होतें. सर्वांत अधिक लांब रांगा ब्रेडसाठीं लागलेल्या होत्या.

आम्ही जेव्हां 'एव्हीएच' इमारतीजवळ जाऊन पोहोचलों, तेव्हां तेथें संहाराचें भयंकर दृश्य दिसलें. चौकांत सर्वत्र मोडतोडीच्या खाणाखुणा पसरलेल्या होत्या. मध्यंतरीं हंगेरिअन सैन्याचा एक रणगाडा तेथें येऊन ठेपला होता. त्याचें पुढचें टोक फुटपाथच्या एका मोठ्याथोरल्या भगदाडांत घुसलेलें होतें. कोपऱ्यांतील हॉटेलची नासधूस झालेली होती.

तें भयंकर दृश्य पाहून मी मनांत चरकलों आणि मग मात्र फार जपून सावधपणानें सावकाश गाडी चालवूं लागलों. मीं सगळीकडे निरखून पाहिलें. पण माझे विद्यार्थी–मित्र मात्र कोठेंच दिसेनात. एक क्षणभर मीं माझी गाडी रस्त्याच्या कडेला उभी केली. आणि तिचा आडोसा करून मी हळुहळू पार्कच्या दिशेनें चालावयास लागलों.

"लाझलो... अरे, इकडे बघ..."

लगेच आवाजाच्या रोखानें मीं माझी नजर वळविली. तेथील झाडाझुडपांच्या आड बेला आणि दुसरे कित्येक मित्र जमिनीवर पालथे पसरलेले मला दिसले. त्यांच्यापैकीं दोघे इम्रे आणि गेझे जखमी होऊन पडलेले होते. दोघेंहि वीसएकवीस वर्षांचे तगडे जवान होते.

"हें बघ, लाझलो, ह्या दोघांना उचलून घेऊन जा आधीं–" बेला म्हणाला—"त इथें असेच पडून राहिले, तर थोड्या वेळानें मरतील. रेसिडेन्सींत घेऊन जा त्यांना. तिकडे कोणी तरी त्यांची काळजी घेतील."

मला त्याचें म्हणणें पटलें. आणि बरोबरच्या मिलिटरी ड्रायव्हरवर मीं तें काम सोपविलें. जखमी विद्यार्थ्यांना तेथून आधीं हलविणें जरुरीचें होतें. मीं त्याला तसें समजावून सांगितलें. तें रणांगण सोडून जाण्यास तो गडी नाखूष दिसला. पण आधीं जखमी मुलांची व्यवस्था करणें भाग होतें. आम्हीं दोघांनीं मिळून त्या जखमी मुलांना काळजीपूर्वक उचललें आणि बाजूच्या गाडींत अलगद नेऊन ठेवलें.

आमच्याजवळ जी दुसरी चिलखती गाडी होती, ती लगेच आम्हीं रणगाड्याच्या आडोशाला नेऊन उभी केली आणि मग मात्र पोलिस-इमार-

तीच्या दारावर आम्हीं मशीनगन्सचा भडिमार सुरू केला. दहा मिनिटांच्या अवधींत तें दार होतें कीं नव्हतेंसें झालें. दार जळून खाक झाल्यावर इमारतींत घुसण्याचा रस्ता मोकळा झाला. लगेच आम्ही आमची गाडी सरळ दारांत नेऊन उभी केली. आणि मग कांहीं विद्यार्थ्यांनीं आंतील लोकांना ओरडून सांगितलें,– "तुम्हांला दहा मिनिटें दिलीं आहेत. तेवढ्या वेळांत मुकाट्यानें बाहेर याल, तर ठीक आहे. नाहीं; तर याद राखून ठेवा."

पण त्या भेकड माणसांना दहा मिनिटेंसुद्धां देण्याची जरूर नव्हती. एक मिनिटभरांत त्या हरामखोर पोलिसांपैकीं एक जण दारांत येऊन उभा राहिला. पण तो एकटाच नव्हता. पांच वर्षाच्या एका छोट्या मुलीला पुढें घालून तो आमच्या समोर आला. तो बोलला, तेव्हां भयानें माणसाची काय अवस्था होते, त्याची आम्हांला कल्पना आली. थरकांपत्या आवाजांत तो म्हणाला,– "तुम्हीं गोळी घातली नाहीं, तर मी कांहीं ह्या मुलीला इजा करणार नाहीं."

त्याच्या पाठोपाठ उरलेले सर्व जण एकामागून एक दारांत गोळा झाले. त्या छोट्या मुलीमुळें आम्हांला आमचा भडिमार थांबविणें भागच पडलें. तेवढ्यांत इमारतीच्या आंतून गोळीबाराचे आवाज ऐकूं आले. आमच्याबरोबर मुकावला करण्यापेक्षां कांहीं पोलिसांना आत्महत्या परवडली, असें दिसतें. लहान मुलीच्या मागें दडलेल्या त्या शेळपट मेजरच्या मागोमाग जे शिपाई बाहेर आले, त्यांची शीरगणति आम्हीं सुरू केली.–चौतीस पस्तीस...पंचेचाळीस शेहेचाळीस...चौसष्ट...पासष्ट...सहासष्ट.. सदुसष्ट...आणि हा बहुतकरून अखेरचाच....अडुसष्ट.'

ते सर्व लोक भयानें पांढरेफटक पडले होते. सर्व जण थरथर कापत होते. सर्वांच्या पुढें असलेला मेजर मुलीला पुढें घालून बाजूच्या बोळांत शिरला. तेथें एखादी कार मिळेल आणि आपली सुटका करून घेतां येईल, असें त्याला वाटलें असावें. आमच्यापैकीं एकानें असाध्य तें साध्य करण्याचा सायास केला.––त्या छोट्या मुलीला न दुखवितां त्यानें अचूक नेम धरून मेजरच्या पायांवर गोळी झाडली. गोळीबाराचा आवाज ऐकतांक्षणीं ती लहान मुलगी वेड्यासारखी धांवत सुटली. त्याच क्षणाला मेजर खालीं कोसळला.

नंतरच्या कांहीं मिनिटांत जें कांहीं घडलें, त्याची आठवण मी जन्मांत कधीं विसरणार नाहीं. ज्या क्षणाला तो जखमी मेजर जमिनीवर खालीं कोसळलेला आम्हीं पाहिला, त्याच क्षणाला गेल्या दहा वर्षांतील हंगेरिअन हुतात्मतेचा सारा इतिहास आमच्या डोळ्यांसमोर उभा ठाकला. दहा वर्षांच्या ह्या दुर्दैवी अवधींत लक्षावधि देशभक्तांचा अमानुष छळ ह्याच 'एव्हीएच' लोकांनीं अमानुष क्रूरपणानें केला होता. आणि सहस्रावधि देशभक्तांच्या हत्येचें पातक ह्याच लोकांच्या शिरावर होतें. तेव्हां ह्यानंतर जें कांहीं घडलें, तें सर्व यथायोग्यच समजावें लागेल.

आमच्यापैकीं कांहीं विद्यार्थ्यांनीं त्या मेजरला धरून फरफटत ओढीत आवारांतील एका झाडाजवळ आणलें. त्याचे दोन्ही पाय करकचून आवळून बांधण्यांत आले; आणि नंतर झाडाच्या जमिनीलगत वाकलेल्या एका फांदी-वर त्यांनीं त्याला दोरखंडानें अधांतरीं टांगून ठेवलें. हताश झालेल्या त्या दुर्दैवी प्राण्यानें दोरखंडाशीं हुज्जत घालावयास सुरुवात केली. त्यासरशीं त्याच्या खिशांतून फ्लोरिन्सच्या नोटा भराभर बाहेर पडूं लागल्या. एखाद्या कामगाराला जन्मजन्मांत कधीं साठवितां आला नसता, एवढा कागदी पैसा क्षणार्धांत वाऱ्यावर उडून गेला. त्याचें शरीर जमिनीपासून अवघें तीन फूट उंचीवर होतें. झाडावर टांगलेल्या मेजरच्या अंगाखालीं बंडखोरांनीं पाला-पाचोळ्याचा, कागदकाटक्यांचा ढीग रचला. मेजरला पुढील गोष्टींची अगोदरच कल्पना आली असावी. तो मोठमोठ्यानें ओरडूं लागला. भोवता-लच्या तरुण माणसांची त्यानें करुणा भाकली. त्या अखेरच्या क्षणांत काय नाहीं नाहीं तीं आश्वासनें त्यानें आम्हांला भराभर देऊन टाकलीं. आतां आमच्याशीं सहकार्य करण्यासाठीं तो मनस्वी अधीर झालेला दिसला. म्हणाला कीं, तुम्हांला हवीं असलेलीं 'एव्हीएच्' अधिकाऱ्यांचीं सर्व नांवें मी तुम्हांला सांगतों. पण विद्यार्थी कामगारांनीं त्याच्या आरडाओरड्याकडे लक्षच दिलें नाहीं. त्याच्याकडे बघून ते केवळ तुच्छतेनें हंसत होते. चिता रचून झाल्यावर त्यांनीं इतर पोलिसांना बंदुकांच्या धाकांत मेजरजवळ आणून उभें केलें. आणि मग त्यांच्या साक्षीनें आमच्या लोकांनीं धडाकून चिता पेटविली.

जाळ जसा त्यांच्या केसांपर्यंत जाऊन भिडला, तशी त्यानें गर्जना

केली,—'जगांतील कम्युनिझमचा विजय असो, कम्युनिझम चिरायु होवो.'— जळून त्याचें सारें शरीर काळें क्कर पडलें. त्याची चिता भडकलेली बघून इतर पोलिस भयानें पांढरेफटक पडले. नंतर त्या सर्वांची कुलूपबंद कोठडींत रवानगी करण्यांत आली.

आम्हीं आंतमध्यें जाऊन पाहिलें, तर भेदरलेल्या पोलिसांनीं तेथील एकूण एक दरोबस्त चीजवस्त जशीच्या तशी ठेवून दिलेली आम्हांला दिसली. कागदपत्रांच्या फाइल्स जाळून टाकण्याची कल्पनासुद्धां त्यांच्यापैकीं कोणाच्या डोक्यांत कशी आली नाहीं, कोणास ठाऊक? ज्या निरपराध स्त्रीपुरुषांचा छळ करण्यांत आला होता वा ज्यांची कत्तल करण्यांत आली होती, त्या सर्व *हुतात्म्यांच्या नांवांच्या याद्या* आम्हांला तेथें आयत्या तयार मिळाल्या. आतां ह्या *याद्या* स्वतंत्र जगांत सुखरूप सुरक्षित आहेत. ह्या कागदपत्रांच्या बळावर आम्ही सर्व लोकांची आतां अशी खात्री पटवून देऊं शकतों कीं ह्या एका चिमुकल्या देशांतील स्वातंत्र्यप्रेमी लोकांना गुलामगिरींत डांबण्यासाठीं कम्युनिस्टांना पन्नास हजारांहून अधिक गुप्त पोलिसांची मदत घ्यावी लागली.

नंतर आम्ही आमची चिलखती गाडी ज्या वेळीं तेथून बाजूला काढली, तेव्हां दहाबारा बंडखोर पटकन् उड्या मारून गाडीवर चढले किंवा गाडीला धरून लोंबकळत निघाले. आम्ही सेंट मार्गारेट ब्रिजजवळ येऊन पोहोचलों, तेव्हां आम्हांला दिसून आलें कीं पुढील सर्व रस्ता हजारों लोकांनीं रोखून ठेविलेला आहे. अर्थातच ह्याच शूर लोकांनीं पेस्ट बाजूनें शहरांत येऊं पाहणाऱ्या रशियन रणगाड्यांचा रस्ता पण दुसऱ्या टोकाला रोखून धरलेला होता.

प्रधान-मंत्री नाजच्या विनंतीस मान देऊन बुडापेस्टमध्यें प्रवेश करणारे हे पहिलेच रणगाडे होत. अर्थातच नाजची विनंती म्हणजे त्याला घेरणाऱ्या 'एव्हीएच' पोलिसांची विनंती. रणगाडे पुलावरून गांवांत शिरण्याचा अटोकाट यत्न करीत होते. पण लोकांनीं ते रणगाडे रोखून धरण्यांत निदान आतांपर्यंत तरी यश मिळविलेलें दिसत होतें. आमचे लोक एकसारखे घोषणा देत होते—'रशिया मुर्दाबाद ! रशिया मुर्दाबाद !'

ह्या वेळीं आम्ही सुमारें दोनशें यार्ड अंतरावरून ही सर्व झटापट बघत होतों बघतांबघतां एक रणगाडा लोकांची नजर चुकवून तिरकस

८८०८

पुढें सटकला त्याच क्षणाला अकराबारा वर्षांचा एक छोटा मुलगा उडी मारून त्या रणगाड्यावर चढला आणि त्या रणगाड्याच्या माचीवरील तोफेच्या उरावर त्यानें हंगेरीचा राष्ट्रध्वज ऐटींत फडकवला.

नेमक्या ह्याच क्षणाला तो रणगाडा माथेफिरू वेड्यासारखें वर्तन करूं लागला. क्षणार्धांत सर्व दिशांनीं रणगाड्यावरून गोळ्यांचा भडिमार सुरू झाला. आजूबाजूला भोवतालीं असंख्य निःशस्त्र स्त्रीपुरुष दाटवाटीनें उभे होते. लहानलहान मुलेंसुद्धां किती तरी होतीं. गोळीबाराचे आवाज उमटल्या-बरोबर ह्या सर्व लोकांची एकच धांवपळ सुरू झाली. नंतरच्या कांहीं क्षण त धूर आणि धुरळा हवेंत इतका कोंदला कीं आम्हांला समोर काय घडतें आहे, तेंसुद्धां धड दिसेना. नंतर बघतों, तर एका क्षणार्धांत गोळीबारचे आवाज एकदम बंद पडले. जणूं काय रशियन सैनिकांना गोळीबार थांबवि-ण्याचा आदेश रेडिओवरून देण्यांत आला होता. गोळीबार थांबल्याबरोबर भीतिग्रस्त लोकांची एकच धांवाधांव सुरू झाली. जो तो आपआपलीं प्रिय माणसें धुळींत शोधावयास लागला. ती संधि साधून रणगाडे माघारीं वळले आणि मार्टिर्स बोलव्हार्डच्या रोखानें भरधांव निघाले. आमच्या चिलखती गाडीकडे त्यांनीं लक्षच दिलें नाहीं. कारण आमच्या मिलिटरी गाडीवर लाल तारा रंगविलेला होता. त्यांच्या पाठोपाठ आम्ही पण निघालों. रशियन रणगाडे पुढें आणि आमची चिलखती गाडी मागें, अशी आमची यात्रा सुरू झाली. थोडेसें अंतर आम्ही चालून गेलों नाहीं, तोंच लहानलहान तीन शाळकरी मुलांनीं आमची गाडी अडविली. त्यांच्या हातांत जड जड पिशव्या होत्या—"आम्हांला तुमच्याबरोबर गाडींतून नेतां का ?"— म्हणून त्यांनीं विचारलें.

"काय रे पोरांनो, तुमच्या त्या पिशव्यांत काय आहे ?"— आमच्या-पैकीं कोणीं तरी विचारलें.

"रशियन लोकांसाठीं आम्हीं हा खाऊ आणला आहे."— त्या तिघां-तील सर्वांत लहान होता, तो म्हणाला. त्याच्या डोळ्यांत कांहीं वेगळीच चमक दिसत होती. त्यांनीं आपल्या हातांतील पिशव्या खोलून आमच्या डोळ्यांसमोर धरल्या. प्रत्येक पिशवींत दुधाच्या चारपांच चारपांच बाटल्या होत्या. पण ह्या बाटल्यांत दूध नव्हतें; गॅसोलिन होतें. बाटल्यांचीं तोंडें

चिध्यांच्या बुचांनीं बंद केलेलीं होतीं. केवळ बारातेरा वयाचीं हीं चिमुरडीं मुलें; पण स्वातंत्र्यसैनिकांच्या आघाडीवर लढण्यास तीं उत्सुक होतीं.

"नवल आहे. ह्या चिमुरड्या मुलांच्या डोक्यांत वयाला न शोभणारी ही अक्कल कोठून आली ?"—आमच्यापैकीं कांहीं जण रस्त्यांत उभे असलेल्या त्या लहान मुलांना हात देऊन वर चढवीत होते, तेव्हां कोणीं तरी विचारलें. आणि मग त्यानेंच तो प्रश्न सरळ त्या मुलांना विचारला,—"काय रे मुलांनो, ही विद्या तुम्हीं कोठून पैदा केलीत ?"

त्यावर त्या मुलांपैकीं एक जण म्हणाला,—"काय हो, आमच्या शाळेंत फक्त लिहायलावाचायला शिकवीत होते, असं तुम्हांला वाटतं कीं काय ? आणखी किती तरी गोष्टी आम्ही शाळेंत शिकलों. आठवड्यांतून दोनदां पी. टी. च्या तासाला आमचे ड्रिल मास्तर आम्हांला दूर शेताडींत घेऊन जात. आणि तिथें ह्या असल्या वस्तु कशा बनवाव्यात, तें आम्हांला समजावून सांगत. त्यांच्याजवळ एक पुस्तक होतं. मोलाडाजा ग्वार्डिया. त्या पुस्तकांत ही सर्व माहिती दिलेली होती. पश्चिमेकडून येणाऱ्या शत्रूशीं लढण्यासाठीं ह्या ज्ञानाचा तुम्हांला चांगला उपयोग होईल, असं ते आम्हांला सांगत."—बोलतांबोलतां तो लहान मुलगा खळखळून हंसला.

'वा: हें फार चांगलं आहे. म्हणजे ह्या रशियन लोकांची चांगलीच जिरली म्हणायची."—माझा मित्र हंसतहंसत म्हणाला.

थोड्या वेळानें बाजूच्या एका गल्लींतून तीन रणगाडे आमच्या रस्त्याच्या रोखानें येत असलेले आम्हांला दिसले. तेव्हां त्या लहान मुलांनीं "जरा वेळ गाडी थांबवा,"—म्हणून आम्हांला सांगितलें. नंतर ते तिघेहि गाडींतून उड्या टाकून पटापट खालीं उतरले.

एका मुलाच्या हातांत लांब सुतळीची गुंडी होती. सुतळीचें एक टोक त्यानें आपल्या मित्रांच्या हातीं दिलें. आणि गुंडी घेऊन रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला जाऊन तो उभा राहिला. नंतर एका मुलानें पिशवींतील तीन बाटल्या काढून त्या रस्त्याच्या मधोमध नेऊन ठेवल्या. तोंपर्यंत रस्त्यांतील सुतळी धुळींत दिसेनाशी झाली होती. त्या सुतळींत त्यानें त्या तिन्ही बाटल्या गुंतवून ठेवल्या होत्या.

नंतर तीं तिन्हीं मुलें बाजूच्या इमारतींच्या आश्रयाला येऊन उभीं

राहिलीं. हातांतील सुतळीच्या हालचाली त्यांनीं अशा कुशलतेनें केल्या कीं, त्या बाटल्या नेमक्या रणगाड्यांच्या चाकोरींत येऊन पडल्या. नंतर सर्वांत लहान मुलानें वर्तमानपत्राचा एक कपटा पेटविला आणि तो जवळच्या मोठ्या मुलाच्या हातीं दिला. पहिल्या रणगाड्याच्या चाकाच्या दांत्यांत कोठें तरी ती सुतळी अडकली, आणि लगेच तीं तिन्हीं मुलें निर्भयपणानें रणगाड्यावरील लांब पल्ल्याच्या बंदुकींच्या टप्प्याच्या अलीकडे रस्त्यांत उभीं राहिलीं. आणि मग हातांतील कागदांचे जळते बोळे त्यांनीं त्या बाटल्यांवर भिरकावले व मग जीव घेऊन ते धूम पळत सुटले. कसे तरी अडखळत, धडपडत ते एकदांचे बाजूच्या फूटपाथवरून चर्चच्या दारांत जाऊन पोहोचले. आणि तत्क्षणीं पहिल्या बाटलीचा प्रचंड स्फोट झाला.–मग दुसरी; आणि मग तिसरी बाटली फुटली. लागोपाठ झालेल्या त्या तीन स्फोटांनीं कानठळ्या बसल्या.

रणगाडे एकूण तीन होते. आणि ते एकाला एक लागून असे रस्ता अडवून जात होते. आणि क्षणार्धांत स्फोटांचे आवाज हवेंत घुमले. आणि मग काय विचारतां? रणगाडे पोलादाचे खरे, पण एका क्षणांत ते जळावयास लागले. आंतील माणसें आगीनें होरपळून निघालीं. मोलोटोव्हच्या शूर सैनिकांची कर्तबगारी आतां आम्हांला दिसणार होती, म्हणून आम्ही डोळे ताणून उत्सुकतेनें बघावयास लागलों. रशियाच्या शूर शिपायांनीं रणगाड्यांचीं दारें धडाधड खोललीं. आणि मग एका क्षणापूर्वीं ज्या नराधमांनीं निरपराध आणि निःशस्त्र हंगेरिअन स्त्री-पुरुषांची कत्तल केलेली होती, ते सर्व शूर वीर एकामागून एक रणगाड्यांतून बाहेर पडावयास लागले. आणि काय आश्चर्य त्यांच्यापैकीं प्रत्येकाच्या हातांत पांढरेशुभ्र कपडे फडकत होते.

ह्या वेळपर्यंत त्या रस्त्यावर दोनतीनशें लोक गोळा झालेले होते. ह्यानंतर तेथें जें कांहीं घडलें, त्यावर आमची सत्ता मुळींच नव्हती. तेथें जमलेल्या ह्या घोळक्यांतून सतराअठरा वर्षांची कांहीं मुलें धावत पुढें गेलीं आणि त्यांनीं एका रणगाड्याच्या जळत्या मशीनमधून ड्रायव्हरचें बखोटें धरून त्याला ओढून बाहेर काढलें. एका मिनिटभरांत त्या पोरांनीं त्याचा अगदीं चेंदामेंदा करून टाकला. नंतर त्यांनीं त्याचें निर्जीव कलेवर रणगाड्याच्या जळत्या आगींत परत भिरकावून दिलें.

नंतर बाजूच्या दुसऱ्या रणगाड्यांतून ज्या पहिल्या माणसानें बाहेर पडण्याचें धाडस केलें होतें, त्याची पण तशीच वासलात लावण्यांत आली. रणगाड्यांतील इतर सर्व सैनिक आंतल्याआंत जळून भाजून ठार झाले. जे कोणी थोडे लोक बाहेर पडले, त्यांना मरेपर्यंत मारपीट करून लोकांनीं पुन्हा रणगाड्यांच्या जळत्या धगींत फेंकून दिलें.

जवळपास ह्याच वेळीं सरकारनें रेडिओवरून एक नेहमींची घोषणा ध्वनिक्षेपित केली.——'जे कोणी शस्त्रें खालीं ठेवतील, त्यांना सरकार अभय देईल.'——आतां शहरांत सर्वत्र अनवस्था प्रसंग गुदरला होता. रस्त्या-रस्त्यांतून हजारों जखमी लोक धुळींत लोळत पडले होते. प्रत्येक खाजगी किंवा सार्वजनिक वाहनांतून रस्त्यांत विव्हळणाऱ्या जखमी लोकांची इस्पितळांत रवानगी करणें ह्या क्षणाला अत्यंत जरुरीचें होतें. हंगेरिअन रेड-क्रॉसनें रक्तदानासाठीं लोकांस आवाहन केलें होतें.

रेडिओ वारंवार ओरडून सांगत होता कीं, बंडवाल्यांच्या टोळ्या बहुतेक सर्व शरण आल्या आहेत. जे शरण आले नाहींत, त्या सर्व बंड-वाल्यांचा निःपात करण्यांत आला आहे.——रेडिओ खऱ्याखोट्याची तमा न धरतां निर्लज्जपणानें काय हवें तें बकत होता. पण बुडापेस्टमधील रस्ते मात्र कांहीं वेगळीच कहाणी सांगत होते.

चेन ब्रिजवरून आम्ही आमची गाडी पेस्ट भागांत घेऊन गेलों. ह्या वेळपर्यंत चेन ब्रिज आमच्या ताब्यांत आला होता. येथें डॅन्यूब नदीच्या उभय तीरांवर जें दृश्य दिसलें, तें भयानक होतें. एके काळीं–दुसऱ्या महायुद्धापूर्वीं–शहराचा हा सुंदर भाग फॅशनेबल वेष परिधान केलेल्या धनिक स्त्रीपुरुषांनीं फुलून गेलेला दिसत असे. तेथेंच व्हिगॅडो स्क्वेअरमधील एका कोपऱ्यांत दिव्याच्या प्रत्येक खांबावर एकएक प्रेत लटकत असलेलें आम्हांला दिसलें. कांहीं ध्वजस्तंभांवर पण अशींच प्रेतें लटकत होतीं. बारा प्रेतें तर आम्हीं चटकन् मोजलीं. काल ह्याच चौकांत लोकांचा प्रचंड जमाव गोळा झालेला होता. ह्या चौकांत साठ फूट उंचीच्या व्यासपीठावर एका सोव्हिएट विमानाची शिल्पाकृति बसविलेली होती; ती ह्या संतप्त लोकांनीं समूळ उखडू टाकली होती. आज 'एव्हीएच्' नें सूडबुद्धि मनांत बाळगून विद्यार्थ्यांचीं प्रेतें खांबांवर लटकावून दिलीं होतीं. जे सोव्हिएट स्मारकाचा

विध्वंस करूं पाहतात त्यांना हें असें शासन भोगावें लागतें, असा इशारा हीं प्रेतें लोकांस देत राहतील, अशी 'एव्हीएच्' ची कल्पना. नंतर आम्हांला कळलें कीं, येथें ठार करण्यांत आलेले बहुतेक सर्व विद्यार्थी पाझमनी सायन्स कॉलेजचे होते. नवलाची गोष्ट म्हणजे त्या सर्वांनीं आपण होऊन आपलीं शस्त्रास्त्रें पोलिसांच्या स्वाधीन केलीं होतीं. त्या सर्वांना तेथें एकत्र गोळा करण्यांत आले होतें. सरकारला आतां फिर्यादीचा देखावा करण्याचीसुद्धा जरुरी वाटत नव्हती! त्या गरीब बिचाऱ्या विद्यार्थ्यांना येथेंच गोळ्या घालण्यांत आल्या होत्या. चेन ब्रिजवरून आम्हांला जें दृश्य दिसलें, तें हें असें होतें !

ह्या वेळपर्यंत बुडापेस्टमधील परिस्थिति केवळ अराजकाची झाली होती.

अखेरीस आम्हीं आमचा मोर्चा परत टेक्निकल युनिव्हर्सिटीच्या रोखानें वळविला. येथेंच आमच्या कौन्सिलचें तात्पुरतें कार्यालय होतें. येथें बेकेसी नांवाचा माझा एक दोस्त भेटला. तो नुकताच बोरारोस स्क्वेअरमधून परत आला होता. तेथें सोव्हिएट रणगाडे सोरोक्सार मार्गानें गांवांत घुसण्याचा यत्न करीत होते. तेथेंहि मोठी रणधुमाळी माजली होती. तेथील लढाईंत आमचे पांच विद्यार्थी मरण पावले ह ते; अकरा जखमी झाले होते.

गांवांतील हालचालींवर पोलिसांची पकड अधिक दृढ झाली होती आणि पहिल्याप्रमाणें एकमेकांशीं संबंध ठेवणें आतां कठीण झालें होतें. त्यामुळें आमच्या कौन्सिलच्या कचेरींत ठिकठिकाणीं जाण्यायेण्यासाठीं आतां आम्ही अगदीं लहानलहान मुलांचा उपयोग करावयास लागलों होतों. अर्थातच बारा वर्षांच्या आंतील हीं मुलें इतकीं लहान होतीं कीं त्यांच्या हातीं बंदुका देणें शक्यच नव्हतें. तेव्हां स्वतःच्या संरक्षणासाठीं त्यांना हँड ग्रेनेडस् आणि पिस्तुलें देण्यांत आलीं होतीं.

आमच्या कौन्सिलच्या सभासदांमध्यें मी एकटा एकच असा होतों कीं ज्यानें प्रत्यक्ष सैन्यांत ऑफिसरच्या हुद्यावर, कांहीं थोडे दिवस कां होईना, काम केलेलें होतें. त्यामुळें कौन्सिलनें माझ्यावर दोन खास कामगिऱ्या सोपविल्या होत्या. पहिली म्हणजे सैन्यांतील माझ्या जुन्या तुकडीशीं संबंध जोडून किंवा माझा लष्करी ऑफिसरचा जुना युनिफॉर्म पैदा करून, काय

वाटेल त्या मार्गानें एक रेडिओ ट्रान्समिटर पैदा करावयाचा. असा एखादा रेडिओ ट्रान्समिटर आमच्या हातीं लागला, तर ह्या विभागांत ठिकठिकाणीं पसरलेल्या विद्यार्थ्यांच्या गुप्त संघटनांशीं संबंध जोडतां येईल. दुसरी कामगिरी म्हणजे कॅसल हिलवर जुन्या राजवाड्यांत प्रस्थान मांडून बसलेल्या क्रांतिकारक सैन्याच्या अधिकारीवर्गाशीं विद्यार्थी–वर्गाचा प्रतिनिधि म्हणून संबंध प्रस्थापित करण्याची होती.

मी कौन्सिलच्या मुख्य कचेरींत परत आलों आणि लगेच दुसऱ्या कांहीं तशाच महत्त्वाच्या कामासाठीं मला तेथून पुन्हा बाहेर पडावें लागलें. मीं परत मुकाट्यानें चिलखती गाडी गांठली आणि माझ्या नव्या कामगिरीवर लगेच रुजू झालों.

ॲकॅडमीच्या एका विद्यार्थ्यानें मध्यंतरीं माझ्या गाडीचा ताबा घेतलेला दिसला. आपली जागा सोडून कोठें तरी तो आमच्या ह्या गाडीला लटकला होता. आम्ही निघालों. आणि वेड्यावाकड्या रस्त्यानें व्हर्मेझो भागांतून कॅसल हिल् विभागांत पोचलों. येथील राजवाडा म्हणजे इतिहासकाळांतील एक प्रेक्षणीय शोभास्थान होतें. ह्या राजवाड्याच्या परिसरांतील सैन्याच्या एका जुन्या प्रचंड बराकींत क्रांतिकारक हंगेरिअन सैन्याच्या सूत्रचालक अधिकारी वर्गाची मुख्य कचेरी होती. हेल्योरसेगि लाक्टान्याच्या दिशेनें आम्ही बॅबिटस् प्रोमनेड मार्गानें जसे वरचढावयास लागलों, तशीं ठिकठिकाणीं मशीन गन्सचीं ठाणीं मांडलेलीं दिसलीं. माझी चिलखती गाडी पाहून त्यांनीं आम्हांला थेट वरपर्यंत जाऊं दिलें. मीं माझी मशीनगन गाडींतच ठेवली; आणि मुख्य कचेरीच्या रोखानें निघालों. एका तरुण कॅप्टननें मला रस्त्यांत हटकलें; आणि माझ्याजवळ ओळखपत्राची मागणी केली. माझ्याजवळ माझें मिलिटरी पास-बुक होतें; पण त्याचा येथें फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता. त्याला विश्वासाचीं वाटतील, अशीं कांहीं नांवें मीं त्याला सांगितलीं. गेल्या कांहीं दिवसांत घडलेल्या घटनांचा इतिहास आमच्या कौन्सिलच्या संबंधांत त्याला सांगावा लागला. नाना तऱ्हांनी मला त्याची खात्री पटवावी लागली.

नंतर तो जवळच कोठें तरी टेलिफोन करण्यासाठीं म्हणून गेला. माझी अशी कल्पना आहे कीं, तिकडे आमच्या कौन्सिलच्या कार्यालयांत

त्यानें बोलणें केलें असावें. थोडचा वेळानें तो परत आला; आणि मग मात्र सरळ मला मुख्य कचेरींत घेऊन गेला. तेथें बाहेरच्या बाजूला एक मोठा हॉल होता. तेथें माझ्यासारखींच पुष्कळ माणसें गोळा झालेलीं दिसलीं. निदान पंचवीस तरी असतील. त्यांच्यापैकीं कांहीं लष्करी गणवेशांत होते; तर कांहीं जणांचा पोषाक अगदीं साधा होता. ह्या हॉलला लागून पलीकडे असेंब्ली रूम होती. तेथें जाण्यासाठीं हे सर्व लोक उत्सुक होते.

माझ्याजवळ एक मध्यम वयाचा, पिकल्या केसांचा माणूस बसलेला होता. त्याला मीं विचारलें, "काय हो' तुम्ही एखाद्या फॅक्टरीमधून आला आहांत काय?" तेथें जमलेलीं सर्वच माणसें वयानें माझ्यापेक्षां किती तरी वडील होतीं. त्याच्या संगतींत संयमाचा आणि शांतपणाचा देखावा वठविणें भाग होतें.

"होय." तो म्हणाला, "बेलोजानिस इलेक्ट्रिकल वर्क्सचा मी ट्रस्टी आहें." बुडा भागांतील युद्धसाहित्य निर्माण करणारी ती सर्वात मोठी फॅक्टरी होती. नंतर त्यानें स्वतःच आपण होऊन मला आणखी कांहीं माहिती सांगितली. "आजवर सोव्हिएट सैन्याला मी माल पुरवीत असें. क्रांतिकारक हंगेरिअन सैन्याच्या हवालीं ह्यापुढें माझ्या फॅक्टरीचा सर्व माल करावा, ह्यासाठीं आमच्रीं बोलणीं चालू आहेत. एकदां करारमदार पक्के झाले कीं लगेच कामाला सुरुवात करतां येईल."

नंतर त्यानें मला माझी माहिती विचारली.– "मी स्टूडंट्स रेव्होल्यु-शनरी कौन्सिलचा प्रतिनिधि म्हणून येथें आलों आहें," असें म्हणालों. त्याबरोबर मोठ्या उत्साहानें तो म्हणाला, 'तुमची विद्यार्थ्यांची काम–गिरी हंगेरी कधीं विसरणार नाहीं." तो जें काहीं बोलत होता, त्यांत आमच्या कार्याचा वाजवी गौरव होता, अभिमान होता. त्याचें बोलणें ऐकून क्षणभर मी कोणी तरी फार मोठा माणूस आहें, असें मला वाटलें.

तेथें जमलेले इतर सर्व लोक वेगवेगळ्या औद्योगिक संघटनांचे प्रति-निधि होते, असें त्यानें मला सांगितलें. मधूनमधून केव्हां तरी पलीकडच्या खोलीकडचा दरवाचा उघडे, तेव्हां आंतमध्यें कोण लोक बसले होते, ते दिसत. त्यांच्यांतील कांहीं माणसें तरी निदान वयानें तरुण दिसत होतीं.

त्या वेळीं तें दृश्य बघून माझ्या मनांत सहज असा विचार आला कीं अशा आणीबाणीच्या प्रसंगीं लोक आपआपसांतील सर्व भेद विसरून एकत्र

येतात आणि लगेच कामास लागतात. अशा वेळीं फक्त एकच एक भावना लोकांच्या मनांत असते. ती म्हणजे, आम्ही सर्व हंगेरिअन्स आहोंत.

तेवढ्यांत माझ्या शेजारचा माणूस आपल्या भागांतील लोकांच्या उठावाची माहिती सांगावयास लागला. बुडापेस्टच्या वायव्य दिशेस ग्यॉर नावाचें एक शहर आहे. तेथें आजूबाजूस पुष्कळ कारखाने आहेत. सत्तावन्न हजार लोकवस्तीच्या ह्या औद्योगिक शहरांत बंडखोरांनीं सर्व सत्ता सहज हस्तगत केली होती. आणि नवलाची गोष्ट म्हणजे सत्तांतर झालें, त्या वेळीं उभयपक्षीं रक्तपात असा प्रायः झालाच नव्हता.

ही बातमी मला नवीन होती. देशाच्या इतर भागांतसुद्धां उठावाच्या घटना घडत आहेत, हें मला आतां प्रथमच कळत होतें. माझ्या मनांतील हर्ष अनावर झाला होता. पण त्या सर्व आनंददायक बातम्या ऐकत असतांना माझ्या मनात एक चोरटा विचार एकसारखा राहूनराहून येत होता. ह्या वेळीं कोणी मला एखादी सिगारेट देईल, तर किती बरें होईल !

तेवढ्यांत कोणी तरी माझें नांव पुकारलें. मघाचा तो तरुण कॅप्टन लगेच माझ्याजवळ आला, आणि मला आंतील खोलींत घेऊन गेला. तेथें पहिल्यादा माझ्या दृष्टींत कांहीं भरलें असेल, तर तें मधोमध ठेवलेलें लांबलचक टेबल. त्या टेबलावर एक प्रचंड नकाशा पसरलेला होता. आणि त्याच्या भोवतालीं कित्येक सैनिक आणि वरिष्ठ लष्करी अधिकारी उभे होते.

तेथें जमलेल्या लोकांच्या अग्रभागीं एक वृद्ध गृहस्थ दिसला. दगडांतून कापून काढावी, तशी त्याची मुद्रा दिसत होती. हिवाळ्याच्या बर्फाळ थंडींत शेकोटीचा सहवास जसा सुखकर वाटतो, त्याप्रमाणें ह्या वृद्धाच्या मुद्रेवरील स्मित आश्वासक वाटत होतें. त्यानें माझा हात आपल्या हातांत घेतला आणि आपल्या मुठींत घट्ट दाबून धरला. आणि मग नजरेला नजर भिडवून त्यानें माझ्याकडे रोखून पाहिलें. त्याच्या खांद्यावर सोनेरी तारा लखलखत होता. हंगेरिअन सैन्यांतील सेनापतीचें तें बहुमान निदर्शक चिन्ह पाहून माझें अंतःकरण उचंबळून आलें.

क्रांतिकारक हंगेरिअन सैन्याच्या ह्या नव्या चीफ ऑफ स्टाफचें नाव होतें जनरल कोव्हॅक्स.

माझ्याशीं तो जें कांहीं बोलला, तें आजसुद्धां माझ्या चांगलेंच स्मरणांत आहे. त्या वेळीं पहिल्याच भेटींत तो मला म्हणाला होता,--

—"आज, ह्या क्षणाला सर्व हंगेरिअन राष्ट्र सोव्हिएट अधिराज्या-विरुद्ध बंड करून उठलं आहे. दर तासाला नव्या नव्या वार्ता आमच्या कानांवर येऊन थडकत आहेत. सैन्यांतील कित्येक फौजा आमच्या बाजूला येऊन मिळत आहेत. खरं म्हणजे अशा सर्वव्यापी प्रचंड आंदोलनासाठीं कांहीं तरी पूर्वतयारी म्हणून करावी लागते. ह्या वेळीं तयारी तर कशी ती मुळींच नाहीं. आणि देशभर उठाव तर अनपेक्षित होऊन चुकला आहे. आतां ह्या पहिल्याच सलामींत जे विजय आम्हांला प्राप्त झालेले आहेत, ते सार्थकी लावावयाचे असतील, तर आपल्याला शक्य तों लवकर मोठ्या प्रमाणावर हालचाली करावयास हव्यात...

..."ह्या स्वातंत्र्ययुद्धात सैन्याचे सर्वात मोठे दोस्त, म्हणजे शहरांत विद्यार्थी, कामगार आणि बाहेर खेड्यापाड्यांतून शेतकरी. सोव्हिएट सत्तेला जबरदस्त तडाखा हाणावयाचा असेल, तर ह्या सर्व शक्ति आपल्याला कारणीं जुंपावयास हव्यात. आणि उजव्या हातानें ज्या वेळीं आम्ही शत्रूला ठोकून काढीत आहोंत, त्याच वेळीं डावा हात काय करीत आहे, त्याची पण बिनचूक माहिती आपल्याला असली पाहिजे.'

हें झालें स्वातंत्र्ययुद्धावरील सर्वसाधारण भाष्य. नंतर जनरल कोव्हॅक्स माझ्या विशेष कामाकडे वळला. विद्यार्थ्यांचें कौन्सिल आणि स्वातंत्र्य-सेनेचा जनरल स्टाफ ह्यांना जोडणारा दुवा मी होतों. कौन्सिलची कचेरी बुडा भागांत तर आमच्या लष्कराची मुख्य कचेरी तेथून फार दूरवर होती. आमच्या हालचालीची सर्व माहिती सैन्याच्या अधिकारीवर्गास वेळोवेळीं कळविणें जरुरीचें होतें. त्यासाठीं बुडा भागांत कोठें तरी रेडिओ ट्रान्समिटर बसविणें भाग होतें. त्याचप्रमाणें ग्यॉरमधील विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्य-संघटनेशीं आमच्या कौन्सिलचा संबंध जोडणें आवश्यक होतें. हीं दोन्हीं कामें ताबडतोब हातीं घेऊन तडीस न्यावयास हवींत, असें मोठ्या कळकळीनें त्यानें मला निक्षून सांगितलें. सर्व विद्यार्थ्यांच्या मनांत सहकार्याची एकात्मभावना प्रस्थापित करावयास हवी, ह्या गोष्टीकडे पण त्यानें माझें लक्ष वेधलें.

जनरल कोव्हॅक्सच्या संगतींत फारफार तर दहा मिनिटें मी असेन नसेन, पण तेवढ्या अल्पावधींत त्यानें जीं प्रचंड कामें माझ्या हातीं सुपूर्द केलीं

होतीं, त्यांच्या केवळ कल्पनेनेंसुद्धां माझ्या वयाचा तरुण मनोमन गोंधळून गेला असता. अंगीकृत कार्याची जबाबदारी फार मोठी होती. आणि माझ्या डोक्यावर तिचें असह्य दडपण पडल्यासारखें मला वाटलें.

माझ्या गाडीच्या ड्रायव्हरचें नांव होतें फेरि म्हणून. तो तर रणांगणावर जाऊन लढण्यासाठीं मनस्वी उत्सुक होता. मी गाडीत बसतांक्षणीं झेना स्क्वेअरच्या रोखानें गाडी नेण्याचा आपला बेत त्यानें मला बोलून दाखविला. सोव्हिएट रणगाडयांवर आमच्या चिलखती कारमधील शस्त्रास्त्रांचा वर्षाव करण्यासाठीं त्याचे हात जणूं शिवशिवत होते. अशा स्थितींत जनरल कोव्हॅक्सनें मला जें काम तांतडीनें करावयास सांगितलें होतें, त्याचें महत्त्व माझ्या ह्या उतावळया मनाच्या मित्राला समजावून सांगितलें. पण त्या क्षणाला मला तें फार जड गेलें.

" पण गडया, ह्या वेळीं एक वचन मी तुला आत्तांच देऊन ठेवतों. ज्या पुढच्या लढाईंत मी भाग घेईन, त्या लढाईंत आपण बरोबर लढूं." मीं त्याला सांगितलें.

मग डॅन्यूब नदीच्या कांठाकांठानें आमची गाडी निघाली. रस्त्यांत सर्वत्र घनचक्कर चढाई चाललेली दिसली. पण ह्या वेळीं मात्र मनांत तीव्र इच्छा असूनसुद्धां आम्ही वाटेंत कोठें थांबूं शकलों नाहीं. वाटेंत कोठेंच न थांबतां आम्ही सरळ टेक्निकल युनिव्हर्सिटीच्या आवारांत येऊन दाखल झालों. मधल्या वेळांत विद्यार्थ्यांनीं तेथील एकंदर साहित्याची जी व्यवस्था लावली होती, ती बघून आम्ही थक्कच झालों. युनिव्हर्सिटीच्या स्टाफवरील दोनतीन तरुण प्रोफेसरांच्या मदतीनें विद्यार्थ्यांनीं तेथील वातावरणांत चांगलीच शिस्त आणि व्यवस्था आणलेली दिसली.

युनिव्हर्सिटीच्या त्या भव्य इमारतीस आतां सुसज्ज शस्त्रागाराचें स्वरूप आलें होतें. एक उदाहरण म्हणून सांगतों. ७ नंबरच्या खोलींत जो वर्ग होता, तेथें पूर्वीं ऑर्गॅनिक केमिस्ट्री शिकविली जात असे. तेथें आतां बंदुकांचें प्रचंड कोठार झालें होतें. तेथून आवारांत उभ्या असलेल्या ट्रकपर्यंत जवळपास चाळीस विद्यार्थ्यांनीं एक रांग लावली होती. आणि भराभर खोलींतील बंदुकांची बाहेरच्या ट्रक्समध्यें भरती होत होती. व्यायामशाळेच्या हॉलमध्यें शेंकडों पेटारे खोलण्याचें काम चाललें होतें. ह्या पेटाऱ्यांतून ७.६५ कॅलिबर

रायफल्स ठासून भरलेल्या होत्या. त्या विद्यार्थी भसाभस उपसून काढीत होते. कांहीं पेट्यांतून दारूगोळा सांठविलेला होता.

ह्या नव्या व्यवस्थेमुळें माझा मात्र थोडासा गोंधळ झाला होता. कारण आमच्या कौन्सिलच्या कोणत्या सभासदास कोठें शोधावें, त्याचा मला पत्ता लागत नव्हता. माझी धांवपळ चालू होती. तेवढ्यांत रुपेरी केसांचा एक तगडा जवान गडी पायऱ्या चढून पोर्टर्स रूमकडे जात असलेला मला दिसला. तेथें जे कोणी चारदोन विद्यार्थी काम करीत होते, त्यांना त्यानें ओरडून सांगितलें,—"मी किलियन बरॅक्समधून आलों आहें. तुमचे कोण पुढारी इथें असतील, त्यांची मला भेट घ्यायची आहे."

मी लगेच त्याच्याजवळ गेलों. आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणालों, "स्टूडंटस् कौन्सिलचा मी एक सभासद आहें, माझ्याबरोबर चल. मी पण माझे इतर सहकारी कोठें आहेत, त्यांचा शोध घेतों आहें. चल. तुझी त्यांच्याशीं मी गांठ घालून देतों...पण काय रे, किलियन बरॅक्समध्यें काय झालं, तें तर सांगशील कीं नाहीं ?'

"सांगणार काय ! शिपाई बंड करून उठले आहेत आणि बंडवाल्यांच्या बाजूनें लढायचं त्यांनीं ठरवलं आहे." तो म्हणाला,—"आज दुपारीं एक वाजतां ते रस्त्यावर आले आहेत. आणि सोव्हिएट रणगाड्यांवर तुटून पडले आहेत. सोव्हिएट पलटणींची दिसतील तिथें त्यांनीं कत्तल चालविली आहे."

आम्ही बरोबरच वर गेलों. तेथें कौन्सिलचे दोन सभासद दिसले. त्यांच्याजवळ गल्यावर प्रथम मीं त्या तरुण माणसाला बोलूं दिलें. त्यानें आणलेली बातमी मला फार सुखाची वाटली आणि माझ्या आनंदांत माझ्या सहकाऱ्यांना प्रथम सहभागी करावें, असें मला वाटलें. कारण ही कांहीं लहान-सहान घटना नव्हती.

"हें बघा, माझ्या वडिलांनी मला इथें तुमची भेट घेण्यासाठीं पाठवलं आहे. सैन्यांतील दोन ऑफिसर्स इथें पाठवून लढाऊ विद्यार्थ्यांच्या आघाडीशीं संबंध जोडण्याची त्यांची इच्छा आहे. मी विद्यार्थी आहें आणि म्हणून मीं तुमच्याबरोबर लढावं, असं त्यांनीं मला सांगितलं आहे. आणखी त्यांचा निरोप असा आहे कीं थोड्याच वेळांत त्यांचे ऑफिसर्स इथें येतील, तेव्हां तुम्हीं त्यांच्याशीं बोलणीं करावींत."–आमच्याशीं बोलणारा हा छोटा

मुलगा फारफार तर सोळासतरा वर्षांचा दिसत होता. तो जें कांहीं बोलत होता त्यामुळें त्यानें आमचीं मनें जिंकून घेतलीं होतीं.

पीटर फिलो नांवाचा कौन्सिलचा सभासद होता. तो त्या मुलाला म्हणाला,–"पण तुझे वडील कोण, तें तूं आम्हांला अजून सांगितलंच नाहींस."

त्याच्या बोलण्याचें त्या मुलाला आश्चर्य वाटलेंसें दिसलें. नदीपलीकडच्या भागांत त्याचा बाप बराच प्रसिद्ध असला पाहिजे, असा आम्हीं तर्क केला. हा काळ असा होता कीं ज्या दिवसांत क्षणाक्षणाला रस्त्यारस्त्यांतील सामान्य माणसें रस्त्यारस्त्यातून असामान्य शौर्याचीं निदर्शनें करीत होतीं.

"माझे वडील म्हणतां?... कर्नल पॉल मालेटर"—तो मुलगा म्हणाला, "आणि माझं नांव पीटर–पीटर मालेटर."

अर्थातच कर्नल पॉल मालेटर हा ह्या क्रांतीच्या अद्भुत काळांत मोठें नांव करणार होता. मालेटरचें नांव असंख्य दंतकथांतून गुंफलें जाणार होतें. आणि शाहीर त्याच्या शौर्याचे पोवाडे गाणार होते ह्या भविष्यकाळांतील वार्तांची त्या वेळीं आम्हांला खबर असण्याचें कांहींच कारण नव्हतें. बुडापेस्टच्या सरहद्दीवर किलियन बरॅक्सची प्रचंड छावणी होती. नंतरच्या काळांत अलौकिक धैर्याचा हा वीर पुरुष शिपायांच्या बंडाचें नेतृत्व करणार होता.

त्यानंतर थोड्या वेळानें कौन्सिलचे आम्ही सर्व सभासद एकत्र जमलों, तेव्हां जनरल कोव्हॅक्सबरोबर माझी जी मुलाखत झाली, तिचा वृत्तान्त मीं सर्वांना सादर केला. तोंपर्यंत मध्यरात्रीचा सुमार झाला असावा. लाजोस नांवाच्या आमच्यांतील एका विद्यार्थ्यानें कोठून तरी सिगारेटचीं पाकिटें पैदा केली होती. काळोखांत मजेनें धूम्रपान करीत असतांना अमृताची चव आमच्या ओठांना आली. अर्थातच एकीकडे आम्ही आमचे बेत आंखीत होतों. ग्यॉर हें शहर स्वतंत्र झाल्याची बातमी आम्हांला मिळाली होती. आणि तेथील विद्यार्थीनेत्यांशी संबंध प्रस्थापित करणें आवश्यक होतें, म्हणून तांतडीनें दोन विद्यार्थी–जवानांना ग्यॉर येथें पाठविण्याचा आम्हीं निर्णय घेतला. तेथील विद्यार्थ्यांच्या कौन्सिलला आणखी एक महत्त्वाची

बातमी कळविणें जरुरीचें होतें. क्रांतिकारक हंगेरिअन सैन्याच्या जनरल स्टाफला पश्चिमेकडून मदत मिळण्याची आशा एकदम नव्यानें निर्माण झाली होती. ही मदत वेळेवर मिळूं शकली, तर आमच्या क्रांतीचें बळ पुष्कळच वाढणार होतें.

त्याप्रमाणें ग्यॉरला पाठविण्यासाठीं दोन विद्यार्थ्यांची आम्हीं निवड केली. त्यांची रवानगी केल्यावर उत्तररात्रीं थोडीशी स्वस्थता आम्हांला मिळाली तिचा फायदा घेऊन मधल्या वेळांत मीं माझ्या बायकोची खबर घेण्याचें ठरविलें. चिलखती गाडींतून तिच्याकडे जात असतांना रस्त्या-रस्त्यांतून जें कांहीं घडत होतें, त्याची चाहूल मला सहजच लागली. इकडे आमच्या आघाडीवर थोडीशी शांतता होती. पण इकडे बघतों, तर वातावरण चांगलेंच तापलेलें, तंग दिसलें. मरण देणाऱ्या मशीनगन्सचा मारा सगळीकडे चालू होता. आणि ठिकठिकाणीं होणारे स्फोट वातावरणांतील शांततेचा अचानक भंग करीत होते. लढाईत गुंतलेल्या लोकांना विश्रांतीची जरुरी मुळीच वाटत नव्हती, असें दिसलें. सर्वत्र लोक मोठ्या उत्साहानें लढत होते. त्यांचें कर्तृत्व पाहून माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें, असें मला वाटलें. स्वातंत्र्याच्या महाद्वारांतच जणूं आम्ही उभे होतों! त्या विचारानें जणूं मला पंख फुटले. स्वतंत्र हंगेरीच्या भूमीवर स्वतंत्र हंगेरिअन म्हणून अभिमानानें मान ताठ करून चालण्याचा हक्क आम्हांला प्राप्त होणार, ह्याविषयीं त्या क्षणाला माझी खात्री पटली.

● ● ●

## ऑक्टोबर २५, १९५६

**कालची** मध्यरात्र उलटली होती. मी होस्टेलमध्यें पोहोचलों, त्या वेळीं माझें चित्त ठिकाणावर नव्हतें. आपल्या खोलींत ईव्हा मला दिसली नाहीं. आणि माझ्या अंतःकरणाचा थरकांप झाला. तेथें जमिनीवर चौदा वर्षांची एक मुलगी पडलेली होती. गेल्या महायुद्धाच्या वेळीं तिच्या बापाला हद्दपार करण्यांत आलें होतें. तिची आई पूर्वी एका शाळेंत शिक्षिकेचें काम करीत होती. पण दुर्दैवानें आतां तिला एका कम्युनिस्ट सरकारी अधिकाऱ्याच्या घरीं मोलकरणीचें काम

करावें लागत होतें. मला बघतांच ती मुलगी सावरून उठली. तिनें सांगितलें कीं तेथील सर्व माणसें खालच्या तळघरांत आहेत. तळघराचें रूपांतर आतां इमर्जन्सी हॉस्पिटलमध्यें झालेलें दिसलें.

जुनाट जिन्यावरून मी खालीं उतरत होतों. तेव्हांच मला ईव्हाचें दर्शन झालें. एका लहान मुलाची शुश्रूषा करण्यांत ती गढून गेलेली दिसत होती. त्याच्या छातीवर बँडेज् बांधलेलें होतें. त्याच्या अंगावरील पांढऱ्याशुभ्र चादरीसारखाच त्याच्या मुद्रेवरील निस्तेज फिकटपणा दिसत होता. मी त्याच्याजवळ जाऊन उभा राहिलों, तसा त्यानें हंसण्याचा क्षीण यत्न केला. पण लगेच त्याच्या ओठांतून रक्त बाहेर आलें. वैद्यकशास्त्रांत मला कांहींच कळत नव्हतें. पण तरीसुद्धां त्याच्या फुप्फुसांत गोळी शिरली आहे, हें लगेच माझ्या ध्यानांत आलें. फारफार तर कांहीं थोड्या तासांचाच तो सोबती होता. तळघरांत त्याच्या आजूबाजूला सोळा तरुण मुलें पडलेलीं दिसलीं. त्या सर्वांना तळघरांत आणून ठेवण्याचें कारण उघड होतें. 'एव्हीएच्' गुप्त पोलिस बंडखोरांच्या शोधांत घरोघर झडती घेत फिरत होते. घरांत शिरलें कीं त्यांचा प्रश्न ठराविक असे,— ' ह्या घरांत स्वातंत्र्यासाठीं लढणारे कोणी शूर सैनिक आहेत काय?'— दिसतांक्षणीं बंडखोरांना गोळ्या घालून ठार मारण्याचा सरकारी हुकूम ते घरोघर बजावीत होते.

मीं तिच्या कार्यांत व्यत्यय आणला नाहीं. एका कोपऱ्यांत स्तब्ध उभा राहिलों. तिच्या निळ्या पोषाखावर सगळीकडे रक्ताचे तांबडे डाग पडलेले दिसत होते. बिचारी थकलीभागलेली दिसत होती. तिचें माझ्याकडे लक्ष गेल्याबरोबर ती माझ्याजवळ आली आणि दोन्ही हात माझ्या गळ्यांत टाकून स्वस्थ उभी राहिली. एक अक्षर बोलली नाहीं. थोड्या वेळानें एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून आम्ही मुकाट्यानें वर आलों; तिच्या खोलींत गेलों. दोघांनाहि भूक लागलेली होती. चार दिवसांची शिळी ब्रेड तिनें माझ्यासाठीं राखून ठेवली होती. ती ब्रेड आणि चहाचा एक कप तिनें माझ्या पुढ्यांत आणून ठेवला. गेल्या कांहीं तासांत ज्या घटना घडल्या होत्या, त्यांजविषयीं आम्ही बोलत बसलों. आरंभींच मीं तिला सांगितलें कीं फारफार तर अर्धा तास मी घरीं थांबूं शकेन.

"खालीं फेरि माझी वाट बघतो आहे"— मीं तिला सांगितलें, "आज रात्रीं त्याला कोठें तरी घेऊन जाण्याचं मीं वचन दिलं आहे."

फेरीच्या मनांतून बुडाकेझि स्ट्रीटवर पहिल्यांदा जावें, असें होतें. तेथें त्याची अॅकॅडमी होती. मधल्या वेळांत आमच्या गाडींत आणखी तीन मुलांची भरती झालेली होती. परत जातांना झेना स्क्वेअरमधून आम्ही आमची गाडी घेतली. रस्त्यारस्त्यांतून रणगाड्यांवर लोक तुटून पडत होते. त्याच्या अॅकॅडमीजवळ आम्हीं आमची गाडी उभी केली. फेरि धांवतच आंत गेला. क्षणभरानें लगेच बाहेर आला. त्या वेळीं त्याच्याबरोबर आणखी दोन मुलें होतीं. ते तिघे जण विजयोन्मादानें हंसत होते. ते त्याचे मित्र त्याच्याबरोबर अॅकॅडमींत शिकत होते. त्यांनीं फेरीला सांगितलें कीं, थोड्या वेळापूर्वी अॅकॅडमीच्या सर्व विद्यार्थ्यांनीं क्रांतिकारक हंगेरिअन सैन्यांत दाखल होण्याचा निर्णय घेतला होता. त्या दोघांच्या मनांतून लढाईच्या आघाडीवर जाण्याचें होतें. पण त्यांच्यापेक्षां वयानें मोठे असलेले इतर विद्यार्थी ह्या दोन लहान मुलांना मागें ठेवून स्वत: लढण्यासाठीं म्हणून आघाडीवर निघून गेले होते. आतां आमच्या गाडींत आम्ही एकूण सात जण होतों.

आमच्या चिलखती गाडींत फार दाटी झाली होती. बाजूच्याच एका छोट्या रस्त्यावर मीं माझी जीप उभी करून ठेवली होती; त्याची आतां मला आठवण झाली होती. तिचा शोध घेण्यासाठी मीं धांवत निघालों. मोठ्या रस्त्यावरून ती दिसू नये, म्हणून कोणी तरी त्या जीपवर झाडाच्या फांद्या अस्ताव्यस्त टाकल्या होत्या. त्या बाजूला करून मीं माझी जीप ताब्यांत घेतली. जीपमध्यें आतां आम्ही एकूण चौघे जण होतों. अॅकॅडमींतील आपले दोन दोस्त फेरीनें चिलखती गाडींत आपल्याबरोबर घेतले होते. जीप पुढें होती. चिलखती गाडी मागून येत होती. रस्त्यांत टोळक्या-टोळक्यांनीं लोक हिंडत होते. त्यांच्याजवळ तपास केला, तेव्हां कळलें कीं पलीकडच्या पासारेट भागांत हातघाईची लढाई चालू आहे. तेथें 'एव्हीएच्' पोलिस घराघरांतून बंडवाल्यांची झडती घेत आणि धुमाकूळ घालीत होते. झेपिलोना आणि बुडाग्योंग्ये भागांतून आमच्या गाड्या फिरत होत्या. तेवढ्यांत कोठून तरी गोळीबाराचे आवाज एकदम कानांवर पडले. त्यांच्या दिशेनें आम्हीं आमच्या गाड्या फिरविल्या. बघतों तर त्या भागांत तुंबळ युद्ध जुंपलें होतें.

समोरच एक लहानशी शाळा होती. शाळेच्या बाजूला एक छोटेंसें चॅपेल होतें. ह्या इमारतींत बंडखोरांनीं आश्रय घेतला होता. आजूबाजूला

पंचवीस 'एव्हीएच्' पोलिस उभे होते. त्यांनीं शाळेच्या व चॅपेलच्या भोंवतीं कडें केलें होतें. जवळच रस्त्यांत त्यांच्या पोलिस व्हॅन्स उभ्या होत्या. एका गाडीवर लाऊडस्पीकर होता. मधूनमधून कोणी तरी लाऊड स्पीकरवरून दंगलखोरांना दमदाटी करीत होता– "बंडवाल्यांनीं आपल्या हातांतील शस्त्रें खाली ठेवावींत. तसें केल्यास त्यांना अभय मिळेल;"–असें तो वारंवार ओरडून सांगत होता.

दुसऱ्या एका व्हॅनवर अद्ययावत् दोन रेडिओ ट्रॅन्समिटर बसविलेले होते. आम्ही एका बोळांतून हें सर्व दृश्य शांतपणानें बघत होतों त्याच वेळीं माझ्या मनांत एक साहसी कल्पना आली. रेडिओचीं अवजारें आम्हांला हवीं होतीं. विशेषत: ट्रान्समिटरचे सुटे भाग आम्हांला हवे होते. मध्येंच केव्हां तरी 'एव्हीएच्'चा एखादा माणूस त्या रेडिओ कारजवळ यावयाचा. मायक्रो-फोनवरून शाळेच्या इमारतींत दडलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठीं धाकदपटशा देणारीं चारदोन वाक्यें ओरडून बोलावयाचा. बाकीचा सारा वेळ सर्व गाड्या रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांजवळ एकाकी उभ्या होत्या. गाड्यांच्या आसपास कोठें एकसुद्धां माणूस दिसत नव्हता.

माझ्याबरोबर आलेल्या सर्व मुलांना गुपचूप एकत्र गोळा करून मीं माझ्या मनांतील बेत सर्वांना समजावून सांगितला. आपल्यापैकीं दोघांनीं कसेंहि करून रेडिओ कार पळवून लावली, तर मागें राहिलेल्या सर्वांनीं मिळून शत्रूशी मुकाबला करावयाचा आणि त्यांना सुरक्षित पळून जाण्यासाठीं योग्य ती संधि द्यावयाची, असें आम्हीं ठरविलें.

आमच्यामध्यें ओरोझ नांवाचा एक मुलगा होता. त्यानें आणि मी मिळून रेडिओ कार ताब्यांत घ्यावी आणि इतरांनीं हातांतील बंदुका सरसावून शत्रूवर हल्ला करण्यासाठीं सज्ज राहावें, असें ठरलें. मग आम्ही दोघे जण पोटावर पालथे पडलों आणि सरपटत कारच्या रोखानें निघालों.

"तो बघा. मारा त्याला."– 'एव्हीएच्' मधील एक माणूस ओरडून उठला. मला वाटलें कीं, झालें; भरली कंबख्ती. मीं गपकन् डोळे मिटले. आणि माझ्या रोखानें येणाऱ्या गोळीची वाट बघत निपचित पडून राहिलों. गोळीबाराचा मोठा आवाज झाला. पण आमच्या दिशेनें एकहि गोळी आली नाहीं. शाळेंत कोंडलेल्या कोणा बंडखोरांसाठीं हा गोळीबार होता. मागाहून एक पोलिस—'नेम–चुकला'–असें म्हणाला, तें पण आम्हीं ऐकलें.

देवाची कृपा ! – मी मनांत म्हणालों. ओरोझ माझ्याच बाजूला पडून होता. आमची दोघांची भुईसरपट पुन्हा चालू झाली.

आम्ही एका कारजवळ जाऊन पोहोचलों. ही कार पोलिसांपासून बऱ्याच दूर अंतरावर होती. त्या गाडीच्या मागच्या चाकांतील हवा सोडून दिली. नंतर आम्हीं सरपटत दुसऱ्या कारजवळ गेलों. दैव आम्हांला अनुकूल होतें. कारण तेवढ्यांत एक पोलिस आमच्या दिशेनें धांवत येतांना आम्हांला दिसला. पण तो सरळ उडी मारून रेडिओ कारमध्यें चढून बसला; आणि त्यानें पुन्हा मोठमोठ्यानें बंडखोरांना उद्देशून बोलावयास सुरुवात केली. त्या वेळीं त्याची भाषा मग्रुरीची नव्हती; मवाळ होती.

" मुकाट्यानें आमच्या स्वाधीन व्हा. तुम्ही आतां शरण आलांत, तर सरकार उदारपणानें तुमचा विचार करील. तुम्हांला कोर्टांत न्याय मिळेल."

"न्याय" मी मनांत म्हणालों, " अरे हरामखोरांनो, दोन डोळ्यांच्या मधोमध कपाळांतून आरपार तुम्ही गोळ्या घालणार. हाच ना तुमचा न्याय ?"

भाषण संपवून तो परत शाळेच्या इमारतीकडे धांवत गेला. मग लगेच मी त्या कारजवळ सरपटत गेलों. गाडीचें दार बंद होतें.

पण किल्ली कुलपाच्या भोकांत तशीच लटकत होती. आम्हीं गाडी चालू केली कीं मोठा आवाज होणार, हें मला माहीत होतें. पण हा धोका पत्करणें भागच होतें. मी उडी मारून आंत चढलों आणि स्टिअरिंग व्हील पकडलें. ओरोझ माझ्या बाजूला चढून बसला. मीं मोटर चालू केली. दिवेसुद्धां लावले नाहींत. दिव्यांचा स्विच कोठें होता, तेंसुद्धा मला माहीत नव्हतें. काळोखांतून गाडी भरधांव निघाली. आमच्या पाठीमागें गोळीबाराचे धडाधड आवाज झालेले मीं ऐकले. आमच्या डाव्या बाजूला विटांची एक भिंत होती. त्या भिंतींतून उलटलेल्या गोळ्या मला दिसल्या.

"चला. सुटलों एकदांचे !" ओरोझ मोठ्यानें ओरडला.

नंतर एक तासाभरानें ठरल्याप्रमाणें कॉगव्हील रेल्वेयार्डजवळ लिबर्टी हिलच्या बाजूला आमची सर्वांची गांठ पडली. नवलाची गोष्ट म्हणजे आमच्यापैकीं कोणाच्या अंगावर ओरखडासुद्धां उठला नव्हता. आमचे मित्र मशीनगन्स रोखून तयार होते. आमच्या गाडीचा आवाज ऐकल्या-

बरोबर सर्व 'एव्हीएच्' पोलिस बंदुका रोखून आमच्या मागें धांवले होते. त्यांच्या पाठी वळल्या मात्र, शाळेच्या इमारतींतील लोक लगेच धांवत बाहेर आले. उभयतांनीं मिळून एकूणएक सर्व गनिमांचा निकाल लावला. त्या चकमकींत 'एव्हीएच्' चा एकसुद्धां माणूस जीवानिशीं सुटला नाहीं.

आम्हांला सर्वांत अधिक ज्या वस्तूची जरुरी होती, ती वस्तु मिळाली होती. रेडिओ ट्रान्समिटर.

अर्थातच 'एव्हीएच्' गाडींतून फिरणें भयंकर धोक्याचें होतें. त्यापेक्षां आम्हीं सरळ आत्महत्या केली असती, तरी चाललें असतें. तेव्हां आतां उपाय एकच होता. कारमधील रेडिओ काढून घ्यावयाचा आणि गाडीची संपूर्ण मोडतोड करून ती तेथेंच टाकून द्यावयाची.

थोड्याच अवधींत तें काम आम्हीं केलें. नंतर सकाळचे सात वाजेपर्यंत आम्ही आमच्या उद्योगांत पुन्हा गढून गेलों. जेथेंजेथें म्हणून 'एव्हीएच्' पोलिस आढळले, तेथें तेथें आम्ही त्यांना टिपून काढलें. गांवांतील लोक रात्रभर टोळचाटोळधांनीं रस्त्यांतून गस्त घालीत फिरत होते. त्यांना गुप्त पोलिस दृष्टीसमोर नको होते. त्यांच्या शोधांत गांवकरी रात्रभर सगळीकडे हिंडत होते. साठसत्तर वर्षांचीं म्हातारीं माणसें हातांत शस्त्रास्त्रें घेऊन रस्त्यांतून लढत होतीं. शत्रु निपटून काढण्याच्या कामीं आपल्या धाकट्या भावांना साथ देत होतीं. रस्त्यांत मला आमचा फॅमिली डॉक्टर डॉ. काझिक्सी भेटला. हा म्हातारा पासष्ट वर्षांचा होता. त्याच्या हातांत पहिल्या महायुद्धांतील रायफल होती. त्याचा मुलगा अणि नातू दोघेहि त्याच्याबरोबर होते. एकाच वेळीं तीन पिढ्या देशाच्या शत्रूशीं त्वेषानें लढत होत्या.

सात वाजून गेल्यावर मी आणि फेरि पुन्हा चिलखती गाडींतून निघालों. वाटेंत आम्हांला चार माणसांचें एक कुटुंब दिसलें. आई, बाप आणि दोन मुलें. एक चौदापंधरा वर्षांचा. दुसरा सोळा सतराच्या घरांतील. त्या सर्वांच्या हातांत शस्त्रें होतीं. दंडांवर तिरंगी फिती होत्या. माना खालीं घालून रस्त्यानें तें कुटुंब चाललें होतें. दोन्ही मुलें रडत होतीं. आई, बाप शांत होते. पण तेसुद्धां आंतल्याआंत संतापानें जळत होते. ओरोझ लासि माझ्या उजव्या बाजूला खिडकीजवळ बसला होता. त्यानें फेरीला गाडी थांबविण्यास सांगितलें.

"काय हो, एवढ्या सकाळीं तुम्ही सर्व लोक कोठें चालला आहांत?" त्यानें विचारलें. सकाळच्या प्रहरीं तें सर्व कुटुंब रस्त्यावर आलेलें बघून त्याच्या मनांतील जिज्ञासा जागी झाली होती.

"त्या गिधाडांनीं माझ्या मुलीला रात्रीं ठार मारलें. त्यांच्या शोधांत आम्ही फिरतों आहोंत." बाप म्हणाला.

त्यानें आपली हकीकत आम्हांला सांगितली, तेव्हां त्याची बायको रडावयास लागली. कांहीं केल्या तिला आपलें रडें आवरेना. त्यानें जी हकीकत सांगितली, ती अशी : "माझी मुलगी तेरा वर्षांची होती. आमच्या घरासमोर एक सरकारी गाडी उलथून पडली होती. त्या गाडीच्या दोन्ही दारांवर लाल तारे होते. लोकांना नको असलेल्या राजवटीचीं हीं तिरस्कृत चिन्हं पुसून त्यांच्या जागीं हंगेरिअन ध्वजचिन्हं रंगविण्याचा उद्योग दोन मुलं करीत होतीं. हीं दोन्हीं मुलं तिच्याच वयाचीं होतीं. तिच्या हातांत रंगाचे ब्रश होते. रंगकाम चालू असतांना 'एव्हीएच्' पोलिसांची एक चिलखती गाडी त्या गल्लींत शिरली. त्यांनीं तें दृश्य पाहिलं. चार पोलिस उड्या टाकून गाडींतून बाहेर आले. एका मुलाला त्यांनीं धरलं. तो बिचारा त्यांच्या तावडींतून सुटण्यासाठीं धडपड करूं लागला. दुसरा मुलगा कसाबसा निसटला आणि पळत सुटला.

"माझी लहान मुलगी पण तेथून धांवत निघाली. तोंडानें ती ओरडत होती,– 'सेगित्सेग! ए व्ही ओसोक! सेगित्सेग! ए व्ही ओसोक!' [धांवा! एव्हीएच् पोलिस!] आमचें घर तेथून शंभर फूट अंतरावर होतें.

"मुलीचा आरडाओरडा ऐकून आम्ही धांवत खिडकीजवळ आलों. पाहिलं तर एक पोलिस नेम धरून गोळी झाडीत होता. आम्हीं गोळीबाराचा आवाज ऐकला तत्क्षणीं मुलगी रस्त्यांत कोसळून पडलेली दिसली. तिला मदत करण्यासाठीं आम्ही धांवत गेलों. पण त्यापूर्वींच खुनी गुन्हेगार तिथून पसार झाले होते. त्यांच्या गाडीचा लायसेन्स नंबर आमच्याजवळ आहे. त्या गाडीचा शोध घेत आम्ही गांवभर फिरतों आहोंत. ती गाडी मिळाल्याशिवाय पाण्याचा थेंब आम्ही तोंडांत घालणार नाहीं.

"माझ्या लहान मुलीला त्यांनीं गोळी घालून रस्त्यांत ठार मारलं. त्यांना पण गोळ्या घालून आम्ही ठार मारणार आहोंत."– संतापानें थरथरत बाप म्हणाला. नंतर तें छोटें कुटुंब पुन्हा सूडाच्या मार्गावर निघालें.

त्यानंतर ईव्हाला भेटण्यासाठीं मी घरीं गेलों. ती झोंपली होती. रक्तानें डागळलेले कपडे अजून तसेच तिच्या अंगावर होते. खोलीचें दार मीं बंद केलें त्याच वेळीं तिला जाग आली. आतां प्रत्येक वेळीं मी तिच्या दृष्टीस पडलों कीं लगेच गळा मोकळा करून ती रडावयास लागे. आमच्या भागांत किती तरी प्रेतें रस्त्यांत पडलेलीं दिसत. मी तिच्याजवळ नसलों कीं तिला वाटा-वयाचें कीं माझें प्रेत रस्त्यांत असेंच कोठें तरी पडलेलें असेल. त्या भयानें बिचारीची अवस्था वेड लागल्यासारखी झाली होती.

" छातींत गोळी लागली होती, तो लहान मुलगा रात्रीं मेला. " तिनें मला सांगितलें, " त्याच्यासाठीं मी कांहीं करूं शकलें नाहीं. "

ताज्या बातम्यांसाठीं मीं रेडिओ लावला. पहिली बातमी कानांवर पडली ती ही: 'झाबड नेप' [स्वतंत्र लोक] नांवाचें कम्युनिस्ट पार्टीचें मुखपत्र होतें. त्या पत्राच्या कचेरीवर बंडखोरांनीं धाड घातली होती. नंतर त्यांनीं कचेरीला आग लावून दिली. तेथील बुकस्टॉलमधील सर्व कम्युनिस्ट पुस्तकें आगींत जळून भस्मसात् झालीं. ती बातमी ऐकून मला फार बरें वाटलें.

थोडा वेळ विश्रांति घेण्यासाठीं म्हणून मी खाटेवर पसरलों. रेडिओंतून बातम्या कानांवर पडत होत्या. कम्युनिस्ट पार्टीच्या सेंट्रल कमिटीच्या पॉलिट ब्यूरोनें सेंट्रल कमिटीचा फर्स्ट सेक्रेटरी अर्नो गेरो ह्याचें अधिकारपद काढून घेतलें आहे. त्याच्या जागीं जानोस कादर ह्याची नेमणूक करण्यांत आली आहे...इम्रे नाज आणि जानोस कादर ह्या दोघांच्या सहीनें एक संयुक्त पत्रक काढण्यांत आलें आहे,—'हंगेरिअनांनो राष्ट्रीय ध्वज पुन्हा उभारा. घराघरांतून तिरंगी निशाणें फडकूं द्या.'

ह्या नंतरची जी गोष्ट मला आठवते ती ही कीं कोणी तरी मोठ-मोठ्यानें रडत होतें. बाहेरून मशीनगन्सच्या गोळीबाराचा आवाज ऐकूं येत होता. मी एकदम दचकून जागा झालों. ईव्हा बिछान्यावर पडली होती. मुसमुसून रडत होती. कसल्या तरी असह्य वेदनेनें तडफडत होती.

मी उठून बसलों. तिच्या पाठीवरून हात फिरवला. तिला विचारलें, " इव्हा, काय झालं ग ?"

" लाझलो ! लाझलो ! अरे, तुला कसं सांगूं !" तिचे हुंदके अजून थांबले नव्हते. " तूं तें बघायला हवं होतंस. असा भयंकर देखावा मीं जन्मांत

कधीं पाहिला नाहीं. आपल्या देशांतील सर्वच लोकांची कत्तल होणार आहे का रे?"

"ईव्हा तूं कुठें गेली होतीस?" मीं विचारलें, "काय झालं? मला एकदां नीट सांग बघूं किती वेळ झोंपलों होतों मी?"

मला झोंप लागली होती, तेवढ्या अवकाशांत लिबर्टी स्क्वेअरमध्य बारापंधरा हजार लोकांचा भलामोठा जमाव जमला होता. होस्टेलमधील विद्यार्थ्यांनीं तिला सांगितलें होतें कीं हें निदर्शन अत्यंत शांतपणानें करण्यांत येणार होतें. मीं नुकतीच नाज–कादर संबंधांतील घोषणा रेडिओवर ऐकली होती. तशीच ती लोकांनीं पण ऐकली होती. प्रक्षुब्ध जनता स्वयंस्फूर्तीनें लिबर्टी स्क्वेअरमध्यें निदर्शन करण्यासाठीं गोळा झाली होती.

"मला वाटलें कीं, पार्लमेंटजवळ जाऊन हें निदर्शन बघावं. म्हणून मी गेलें." ती म्हणाली, "मी जेव्हां तेथें जाऊन पोहोचलें, तेव्हां सगळा चौक लोकांनीं भरून गेला होता. सभेचा उद्देश उघड होता. एव्हीएच पोलिसांनीं आणि रशियन सैनिकांनीं हंगेरिअन लोकांवर जे अमानुष अत्याचार केले होते त्यांचा निषेध करण्याची लोकांची इच्छा होती. निरपराध लोकांची कत्तल थांबवावी, अशी लोकांची मागणी होती.

"कांहीं लोक ब्रिटिश आणि युनायटेड स्टेटस् वकिलातींसमोर गोळा झाले होते. आणि आंतील लोकांना ओरडून विचारीत होते, अरे, तुम्ही आम्हांला मदत कां करीत नाहीं?...आम्हांला वांचवा.

"लाझलो! मला ती गोष्ट फार भयंकर वाटली. कल्पनेंतसुद्धां असं कांहीं घडेल, असं मला वाटलं नव्हतं." बोलत असतांना माझी बायको थरथर कांपत होती

"तेवढ्यांत कांहीं सोव्हिएट रणगाडे चौकाच्या एका कोपऱ्यांत येऊन थडकले. त्या रणगाड्यांतील तोफांवर लहानलहान मुलांनीं हंगेरिअन निशाणं लावलीं होतीं. रशियन सैनिकांनीं हात बाहेर काढले आणि भोवतालच्या लोकांकडे बघून हलवले. लोकांनीं पण हात वर करून त्यांना साथ दिली. त्यांचा जयजयकार केला. त्यांना वाटलें कीं हे रशियन सैनिक आपल्या बाजूचेच आहेत.

'तीन रणगाडे लोकांच्या गर्दींत घुसले. लोकांचा जमाव चौकाच्या दिशेनें पुढें लोटत होता. कांहीं बायकामुलं तर रणगाड्यांवर चढून मोठ-

मोठ्यानें ओरडत होतीं. हातवारे करीत होतीं. सर्व जण मिळून आठवतील तीं राष्ट्रीय गाणीं एकसाथ म्हणत होतीं. चौकाच्या मध्यभागीं आणखी कांहीं सोव्हिएट रणगाडे उभे होते.

" आणि मग एकाएकीं लोकांच्या गर्दीतून वाट काढणारे रणगाडे बाजूला वळले. आणि रोकोझीच्या पुतळ्याच्या रोखानें चालावयास लागले.

" लोक अजून मोठ्या उत्साहानें गाणीं म्हणतच होते. तेवढ्यांत एकाएकीं कांहीं एक पूर्वसूचना न देतां रणगाड्यांतील सैनिकांनीं बायका–मुलांवर गोळ्यांचा भडिमार करावयास सुरुवात केली. तो इशारा मिळतांच चौकांत सर्वत्र एकदम गोळ्यांचा जणूं वर्षाव झाला. 'एव्हीएच्' पोलिस, एकदम घरांच्या गच्च्यांवरून, खिडक्यांच्या आडून जमावावर गोळ्या झाडूं लागले.

"एक क्षणभर काय घडत आहे, त्याचा उमज कोणालाच पडेना. रणगाड्यांतील सैनिकांनीं तोफांचीं तोंडें एकदम घरांच्या गच्च्यांच्या रोखानें वळविलीं. आणि 'एव्हीएच्' पोलिसांनाच त्यांनीं झोडपून काढलें. तेथें सर्वत्र गुप्त पोलिस दडून बसले असतील, ह्याची कल्पना त्यांनासुद्धां नव्हती !

" लाझलो ! असं हत्याकांड मीं जन्मांत कधी पाहिलं नाहीं." अनावर अश्रूंच्या लोटांत माझी बायको सांगत होती, " गोळ्या लागून लोक टपाटप खालीं पडत होते. थोड्याच वेळांत तुटलेल्या हातांपायांनीं आणि मुंडक्यांनीं तो चौक भरून गेला.

" पंधरा मिनिटें हा गदारोळ चालू होता. पळणाऱ्या बायकापोरांना कोणत्या दिशेनें पळावं, तेंच समजेना. तो उघडा चौक होता. आणि दडावयाससुद्धां तिथें कुठें जागा नव्हती. प्रत्येक जण जागच्याजागीं खिळल्यागत उभा होता.

"शेवटीं जे लोक मेले नव्हते, त्यांनीं धांवतपळत बाजूच्या गल्लीबोळांचा आश्रय घेतला. एक तासाभरानें कम्युनिस्टांनीं चौकाचे सर्व रस्ते रोखून धरले. चौकाच्या बाहेर सर्वत्र लोकांची एकच गर्दी उसळली होती. ते बिचारे आपल्या मृत आप्तांचीं प्रेतें शोधून काढण्यासाठीं तेथें गोळा झाले होते. पण कम्युनिस्टांनीं नंतर कोणालाच चौकांत जाऊं दिलें नाहीं. त्यांनीं

भराभर ट्रक्स आणल्या, आणि गाड्यांतून काटक्यांचें सर्पण भरतात त्याप्रमाणें ट्रक्समधून प्रेतें खच्चून भरलीं." ( नंतर आम्हांला कळलें कीं कम्युनिस्टांनीं ट्रक्स भरभरून नेलेलीं प्रेतें डॅन्यूब नदीला मिळणाऱ्या ओढे-नाल्यांतून सोडून दिलीं.)

मीं ईव्हाला जवळ घेतलें. आणि तिचें सांत्वन करण्याचा यत्न केला. त्याच क्षणाला मी हें समजून चुकलों कीं अतःपर रेडिओ काय सांगतो, त्यांतील एका शब्दावर ह्यापुढें विश्वास म्हणून ठेवावयाचा नाहीं.

ईव्हाचें रडणें थांबावयास कांहीं वेळ मध्यें जाऊं देणें आवश्यक होतें. "हें बघ, आज तरी निदान इतर मुलींसारखी तुझी अवस्था नाहीं."—मीं तिला सांगितलें.—तुला आपल्या प्रकृतीची काळजी घ्यावयास हवी.—तुझ्या-साठीं, माझ्यासाठी, आपल्या तिघांसाठीं."

नंतर अर्ध्या तासानें किती तरी विद्यार्थी–मित्र होस्टेलमध्यें गोळा झाले. ते मला घेऊन जाण्यासाठीं आले होते. रोझाडोंब विभागाकडे त्यांचा मोर्चा वळणार होता. तेथील कांहीं श्रीमंतांच्या बंगल्यांतून 'एव्हीएच्' पोलिसांनीं आश्रय घेतल्याची खबर मिळाली होती. खरें म्हणजे माझ्या मनाला रेडिओ ट्रान्समिटरची चिंता लागून राहिली होती. पण तरीसुद्धां माझ्या दोस्तांबरोबर जाण्याचें मीं ठरविलें. ह्याच उपनगरांतील राजविलासी बंगल्यामध्यें गेरो आणि राकोसि राहत होते.

आम्ही तेथें पोहोंचलों, तेव्हां त्या भागास स्मशानाची अवकळा आलेली दिसली. खिडक्यांचे पडदे खालीं सोडलेले होते. दारें कुलूपबंद होतीं. ज्या तीन लढवय्यांच्या सोबतीनें मी तेथें गेलों होतों, त्यांनीं एका खाशाच्या बंगल्या-समोर आमची गाडी उभी केली. ते म्हणाले कीं, 'एव्हीएच्'चा प्रमुख कर्नल अर्विन रेव्हेझ त्या बंगल्यांत राहतो. माणसांचा वावर तेथें कोठेंच दिसेना. आम्ही बंगल्याच्या मागच्या बाजूला गेलों. मागचें दार बंदुकीच्या दस्त्यांनीं ठोकून मोडून काढलें. आणि जवळच्या गडीमाणसांच्या वस्तींत शिरलों. तेथें गड्यांच्या खोल्यांतूनसुद्धां मऊमऊ रुजामे अंथरलेले होते. तेथून आम्ही प्रचंड दिवाणखान्यांत आलों. ह्या दिवाणखान्याच्या खिडक्यांतून डॅन्यूब नदींतील मार्गारेट आयलंडचा सुंदर देखावा दिसत होता. तेथील फर्निचर प्राचीन धर्तीचें मौल्यवान् होतें. भिंतीवर दुर्मिळ चित्रें टांगलेलीं होतीं. अशा ह्या

राजशाही वैभवांत एक मध्यमवयीन स्त्री आपल्या ह्या भव्य प्रासादांतील शांततेचा भंग करणाऱ्या उद्धट जवानांकडे रोखून बघत होती. आमच्या दाढ्या वाढलेल्या होत्या. कपडे रक्तानें आणि धुळीनें माखलेले होते. त्या वैभवशाली वातावरणाशीं आमचें अस्तित्व अगदीं विसंगत दिसत होतें.

"आपण मिसेस् रेव्हेझ काय ?"– आमच्यापैकीं एकानें विचारलें.

"होय. तुम्हांला कोण हवं आहे ?"– तिनें चाचरत विचारलें.

"तुझा नवरा."– माझा मित्र म्हणाला,– "रेव्हेझनें आणि त्याच्या-बरोबरच्या इतर अधिकाऱ्यांनीं हंगेरी देशावर अनन्वित अत्याचार केले आहेत. त्याला आम्ही पकडून नेणार आहोंत. लोकांच्या कोर्टांत खेंचणार आहोंत. कुठें आहे तो बदमाष ?"

मनांतून ती भ्यायली असावी. पण वरवर मात्र निर्भयतेचा देखावा ती करीत होती.

"घरांत आणखी कोण आहे ?"– मीं दराडावून विचारलें.

"कोणी नाहीं. फक्त एक गडी आहे." ती म्हणाली, "तो पलीकडच्या खोलींत आहे." एका दाराकडे बोट दाखवून तिनें सांगितलें. आम्ही त्या दाराच्या रोखानें जाण्यासाठीं वळलों. पण तेवढ्यांत इलेक्ट्रिक मोटरसारखा कांहीं तरी आवाज आमच्या कानांवर पडला. आम्हीं मागें वळून पाहिलें, तर ती जेथें उभी होती, तो भाग एकदम वाटोळा फिरला.

आणि काय आश्चर्य ! एका क्षणार्धांत ती जेथें उभी होती, तो भागच दिवाणखान्यांतून अदृश्य झाला. ह्या विलक्षण यंत्राची कळ तेथेंच कोठें तरी दडलेली असेल, अशा समजुतीनें आम्ही प्रत्येक बटण आणि स्विच् तपासून पाहिलें. पण कळ कांहीं हातीं लागली नाहीं. तात्काळ आम्ही तळघराकडे धांव घेतली. पण तेथें विशेष असें कांहींच आढळलें नाहीं.

दोन दिवसानंतर कांहीं विद्यार्थीमित्रांनीं अशी बातमी आणली कीं, बरेचसे 'एव्हीएच्' ऑफिसर्स आपल्या घरांच्या तळघरांतील गुप्त वाटांनीं असेच अदृश्य झाले होते. स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या सैनिकांच्या हातून त्यांचा मृत्यु ओढवला असता, तो त्यांनीं अशा रीतीनें चुकवला. (नंतर ज्या कांहीं घटना घडल्या, त्यांजवरून एक गोष्ट उघडकीस आली. अनेक सरकारी

अधिकाऱ्यांच्या घरांतून गुप्त पळवाटांची योजना होती. संकटकाळीं पळून जाण्यासाठीं उपयोग व्हावा, अशा हेतूनें अनेक भुयारी रस्ते खोदण्यांत आले होते. आम्ही ज्या घरांत रेव्हेझचा शोध घेण्यासाठीं गेलों होतों, तें घर ज्या रस्त्यावर होतें, तेथून डॅन्यूब नदीच्या खालून गेलेला एक भुयारी रस्ता केरे-पेसि सीमेटरींत संपत होता, असें दिसतें. कारण तेथें अशा एका भुयारी रस्त्याचें दार आहे.)

आम्ही होस्टेलमध्यें परत आलों, तेव्हां सर्व रस्ते उजाड झालेले दिसले. रस्त्यांत सगळीकडे मोडतोडीचीं चिन्हें दिसत होतीं.

तेथें खाण्यासाठीं कांहीं नव्हतें. ईव्हा अजून झोपलेली होती.

ह्यानंतर 'एव्हीएच' गाडींतून पळविलेला रेडिओ ट्रान्समिटर कोठें बसवावा, त्याविषयीं आम्हीं चर्चा केली. झेना स्क्वेअरमधील सबवे स्टेशन त्यासाठीं अत्यंत उपयुक्त आहे, असें आम्हांला वाटलें. तेथें संरक्षणाची साधनसामग्री होती. आणि वेळप्रसंगीं आमच्या हातांनींच ट्रान्समिटर उध्वस्त करावयाची पाळी आली असती, तर तें कार्य पण तेथें लवकर उरकण्याची सोय होती. टेक्निकल युनिव्हर्सिटीचा एक विद्यार्थी आपल्या बापाला रेडिओच्या उद्योगांत सहाय्य करीत असे. म्हणून त्याला ट्रान्समिटर्सची चांगली माहिती होती. शॉर्ट–रेंज रिसीव्हिंग सेट्स आणि ट्रान्समिटर उभारावयाचा, तर त्यासाठीं आवश्यक तीं सर्व साधनें युनिव्हर्सिटींत उपलब्ध होऊं शकतील, असें त्यानें खात्रीपूर्वक सांगितलें. सर्व योजना पक्की झाल्यावर आमचा रेडिओ एंजिनिअर कामास लागला. दुपारभर त्याचें काम चालू होतें. त्या ठिकाणीं एक कामचलाऊ बॅरिकेड उभारून आम्ही पहाऱ्याचें काम पत्करलें.

थोडयाच वेळांत 'स्टूडंट्स रेव्होल्यूशनरी कौन्सिल' च्या बुडापेस्ट हेड-क्वॉर्टर्सशीं संबंध जोडण्यांत आमच्या रेडिओ एंजिनिअरनें यश मिळविलें. लगेच तेथून आम्हांला एक महत्त्वाचा संदेश मिळाला. तो संदेश जुन्या राज-वाडयांतील जनरल स्टाफ हेडक्वॉर्टर्सकडे रुजू करावयास सांगण्यांत आलें. होतें. तिकडे विद्यार्थ्यांच्या लढयांत मनुष्यहानि प्रमाणाबाहेर झाली होती आणि जनरल स्टाफनें ताबडतोब कुमक रवाना करावी, असा तो संदेश होता.

रेडिओ ट्रान्समिटर जेथें बसवीत होतों, त्या जागेच्या भोंवतीं उलथ-लेल्या मोटारींची आणि ट्रामगाडयांची तटबंदी आम्हीं उभी केली होती. ह्या तात्पुरत्या तटबंदीवर हंगेरीचा राष्ट्रध्वज फडकत होता.

पेस्ट विभागांतून ट्रान्समिटरवर आणखी एक बातमी पकडण्यांत आम्हीं यश मिळविलें होतें. शहराच्या नऊ नंबरच्या विभागांत गुप्त पोलिसांनीं पंधरा तरुण विद्यार्थ्यांस फांसावर लटकावलें होतें. फांशी दिलेल्या हुतात्म्यांचीं प्रेतें रस्त्यांवर तशींच फेंकून देण्यांत आलीं होतीं. कोणत्याहि परिस्थितींत स्वातंत्र्याच्या शूर सैनिकांनीं हातांतील शस्त्रें ख़ालीं ठेवूं नयेत, असा इशारा देशभक्तांस शेवटीं देण्यांत आला होता. दुसऱ्या एका स्टेशनवरून, मॉरिझ सिग्मंड सर्कलमध्यें लढवय्ये सैनिक मदतीसाटीं हवे होते, हा संदेश आम्हांला मिळाला. तेव्हां आमच्या अवतींभंवतीं ऐंशी विद्यार्थी होते. मॉरिझ सिग्मंड सर्कल आमच्या ठिकाणापासून तसें जवळ होतें. म्हणून आमच्यापैकीं कित्येक जण तिकडे धांवले. त्यांच्याबरोबर मी पण गेलों. तेथें साठ विद्यार्थी लढत होते. पंधरा सोव्हिएट रणगाड्यांना गराडून काबीज करण्याचा एक धाडसी बेत त्या शूर मर्दांनीं आंखला होता.

चौकांत मध्यभागीं ते रणगाडे उभे होते. चौकांत येऊन मिळणाऱ्या तीन रस्त्यांचीं तोंडें उलथलेल्या मोटरी आणि ट्रामगाड्यांची तटबंदी उभारून बुजविण्यांत आलीं होतीं. आमची कुमक वेळींच पोहोचली. उरलेल्या चौथ्या रस्त्याचें तोंड बुजविण्यास आम्हीं हातभार लावला. चारी बाजूंनीं नाकेबंदी पक्की झाल्यावर सोव्हिएट रणगाड्यांतील रक्षकांस एकूण परिस्थितीची जाणीव झाली. दीडशें विद्यार्थ्यांनीं आपणांस सांपळ्यांत पकडलें आहे, हें ध्यानांत आल्यावर त्यांनीं चौथ्या रस्त्यावरील तटबंदीवर तोफगोळ्यांचा वर्षाव केला. त्या भडिमारांत आमच्यापैकीं अनेक शूर विद्यार्थी ठार झाले.

मध्यंतरीं कांहीं लहान मुलें साबणाचा फेस व वंगण बादल्यांत भरून रस्त्यांत धांवलीं होतीं. रणगाड्यांच्या मागच्या बाजूस जे रस्ते होते, त्यांच्यावर ह्या बादल्या रिकाम्या करण्यांत आल्या. रस्ते निसरडे करून तीं मुलें परतलीं नाहींत, तोंच रणगाडे पाठच्या दिशेला वळले. रणगाड्यांच्या चेन्स फेंसाळ रस्त्यावर निसटून पडल्या. पुढचे रणगाडे थांबले नाहींत तोंच त्यांजवर मागचे रणगाडे येऊन आदळले; आणि उलथून पडले. त्यांचीं चाकें निकामी झालीं. आमच्या बाजूनें आम्हीं त्या अवजड वाहनांवर मोलोटाव्ह कॉकटेल्सचा वर्षाव केला. सर्वांत पुढें असलेल्या रणगाड्यांच्या रक्षकांनीं तोफांचा भडिमार करून आम्हीं उभारलेली तटबंदी उघळून लावली.

अनुक्रम २५४६८ वि:

क्रमांक ८८३ नों. दि. १२-२-

आम्ही आमच्या सबवे स्टेशनवर परतलों, तेव्हां तेथें आमच्या तटबंदीची धूळधाण उडालेली आम्हांला आढळली. आमच्या मागें जे थोडे विद्यार्थी ह्या तटबंदीचें रक्षण करण्यासाठीं थांबले होते, त्यांचीं प्रेतें रस्त्यावर इतस्ततः पसरलेलीं होतीं. तटबंदी अजून जळत होती. मध्यंतरींच्या तीन तासांत शहराच्या पश्चिम भागांतून कांहीं सोव्हिएट रणगाडे तेथें येऊन थडकले होते. आमच्या तटबंदीची वार्ता बहुतकरून शत्रूला कळली होती.

पहिलें प्रत मीं ओळखलें, तें फेरीचें मिलिटरी ॲकॅडमी ताब्यांत घेण्यासाठीं आम्ही गेलों होतों, तेव्हां हा नवा मित्र मला लाभला होता. त्यालाच खऱ्याखुऱ्या लढाईंत घेण्याची खुमखुमी होती. त्याची पहिली लढाई शेवटचीच ठरली होती. ट्रान्समिटरची मोडतोड झालेली दिसत होती. ट्रान्समिटर आम्हीं फिरून हस्तगत केला, तेव्हां त्याची दुरुस्ती करणें अशक्य नाहीं, असें आम्हांला दिसून आलें.

एकूण तीस प्रेतें आमच्या हातीं लागलीं. आणखी कित्येक विद्यार्थी जखमी होऊन रस्त्यांत विव्हळत पडले होते. त्यांची व्यवस्था कोठें लावावयाची, हा प्रश्नच होता. विद्यार्थ्यांच्या होस्टेलमध्यें तर मुळींच जागा नव्हती. तेथें अगोदरच पेशंटची एवढी गर्दी झाली होती कीं तळघरसुद्धां भरून गेलें होतें.

जवळच एम्. ए. व्ही. ( अ हंगेरिअन स्टेट रेल्वे) हॉस्पिटल होतें अल्कोटास स्ट्रीटवर. तेथें बंडखोरांसाठीं इशारेवजा फलक लावून ठेवण्यांत आला होता : 'जागा नाहीं. आंत येऊं नये.'

सेंट जॉन्स हॉस्पिटलमध्यें आम्ही निदान दारांतून आंत तरी जाऊं शकलों. तेथील प्रत्येक खोली भरलेली होती. व्हरांड्यांतून सर्वत्र चटया पसरण्यांत आलेल्या होत्या. तेथील क्लोरोफॉर्म इत्यादि गुंगीच्या औषधांचा सांठा केव्हांच खलास झाला होता. संध्याकाळचे सहा वाजून गेल्यावर तेथें वीज वापरण्यास मनाई होती. कारण विजेचा पुरवठा करणें दुष्कर होतें.

'आमच्याजवळ पुरेशा मेणबत्त्यासुद्धां नाहींत.'– पांढरा स्मॉक अंगांत चढवलेल्या एका तरुण माणसानें आम्हांला सांगितलें. आम्ही आमचे जखमी सैनिक तेथें घेऊन गेलों. तेव्हां तेथील नर्सनें नकारार्थी मान हलविली आणि सांगितलें कीं जेथें जखमी लोकांस ठेवतां येईल, अशी फक्त एकच जागा

आतां हॉस्पिटलमध्यें आहे.— 'माझ्या मागून या'—ती म्हणाली. हॉस्पिटलच्या मागच्या बाजूस प्रार्थनेची एक लहानशी खोली होती. तेथें तिच्या पाठोपाठ आम्ही गेलों. नंतर ती आम्हांला चॅप्लेनच्या ऑफिसमध्यें घेऊन गेली. तेथें फारफार तर दहाबारा माणसांस दाटीवाटीनें पुरेल, एवढीच जागा होती.— 'ही एवढी एक जागा आहे.'—खिन्नतेनें हंसून ती म्हणाली— 'इथें तुमच्या लोकांना ठेवण्याची तुमची इच्छा आहे काय?'— तिनें विचारलें.

आम्हीं लगेच 'होय' म्हटलें. आणि ज्यांची अवस्था केवळ अत्यवस्थ होती, अशा विद्यार्थ्यांस आम्ही तिच्या हवालीं केलें. ते विद्यार्थी बरे होतील, अशी अंधुक आशा आमच्या मनांत घर करून होती.

• • •

## ऑक्टोबर २६, १९५६

**देवानें** खैर केली. गांवाबाहेर शेती करून जे लोक राहत होते, त्यांनीं शहरांत लढून जे लोक स्वातंत्र्यासाठीं बलिदान करीत होते, त्यांची आठवण ठेवली.

आज पहाटे उठून बघतों, तर शहरांत किती तरी गाड्यांच्या रांगा चाललेल्या दिसल्या. गाड्यांना घोडे जोडलेले होते. आणि गाड्यांतून नागरिकांना आवश्यक त्या अन्नधान्यांचे सांठे होते. खेड्तांनीं आपल्याबरोबर दूध आणलें होतें, मध आणला होता, ब्रेड आणली होती. उपासमारीनें खंगलेले लोक कृतज्ञतापूर्वक घेतलेल्या अन्नाचे पैसे देऊं पाहत होते. आणि नवलाची गोष्ट म्हणजे शेतकरी दिल्या अन्नाचे पैसे घेण्यास तयार नव्हते.

पहाटे सहा वाजतां मी होस्टेलमधून बाहेर पडलों. बंडाचा उठाव झाल्या दिवसापासून आज पहिल्यांदाच ओळीनें पांच तास मी झोपलों होतों. पहिल्यांदा हॉस्पिटलमधील माझ्या मित्रांची गाठ घ्यावयाची होती. त्या दिशेनें मी चालावयास लागलों होतों. वाटेंत बुडाकेझीहून आलेला गाड्यांचा व ट्रक्सच एक तांडा दिसला. ट्रक चालविणाऱ्या एका म्हाताऱ्या शेतकऱ्यास मीं हटकलें; आणि—'कुठें चालला आहेस?'— म्हणून त्याला विचारलें; आधीं त्यानें मला ताजें ऊनऊन दूध पिण्यास दिलें. तें दूध पोटांत गेल्यावर माझ्या अंगांत जादा ताकद आल्यासारखें मला वाटलें. मग तो म्हणाला,—

"कुठें म्हणून काय विचारतोस? असाच भटकतों आहें, झालं बाजार ओस पडला आहे. मीं ट्रक भरून आणलेला माल तिथें कोणी विकत घेणार नाहीं, हें मला माहीत होतं. पण तरीसुद्धां मी ट्रक भरून माल घेऊन आलों. तिथें शहरांतील लोक हंगेरीच्या लोकांसाठीं रस्त्यारस्त्यांतून प्राणपणानें लढत आहेत, असं आम्हांला कळलं. म्हणून आम्ही आज मुद्दाम गांवांत आलों. गांवांतील कोणत्या भागाला अन्नाची अधिक गरज आहे, तें तूं मला सांगशील काय?"

मीं लगेच त्याला सांगितलें, – "हॉस्पिटलसमधून अन्न दिसेनासं झालं आहे." – आणि त्याला विचारलें, – "माझ्याबरोबर सेंट जॉन्स हॉस्पिटलमध्यें येतोस काय?" – तो लगेच कबूल झाला. आमच्या मागून येण्याविषयीं त्यानें मागच्या गाडीवानास खूण केली.

हॉस्पिटलमध्यें आम्हीं डॉक्टर्सना विचारलें, – "येथील मुलांना काय हवं आहे? दूध? पालेभाज्या? कीं ब्रेड?" – डॉक्टर्स म्हणाले,– "दूध."– लगेच त्या शेतकऱ्यांनीं दुधाच्या मोठमोठ्या चरव्या हॉस्पिटल वार्ड्समध्यें वाहून आणल्या. तेथें नर्सेसचा तुटवडा होता. नोकरलोक कामावर आले नव्हते, त्यामुळें आम्हांलाच दुधाचें वांटप करावें लागलें. प्राणांतिक यातनांनीं पांढऱ्याफटक पडलेल्या तेथील रोग्यांच्या निस्तेज चेहेऱ्यावर दूध जवळ नेतांक्षणींच कृतज्ञतेचे जे भाव उमटलेले मीं पाहिलें, तें मी जन्मांत कधीं विसरणार नाहीं.

नंतर आम्हीं व्हर्मेझो भागांत गेलों. तेथें पण शेतकऱ्यांच्या गाड्या अन्नाचें वांटप करण्यासाठीं थांबलेल्या दिसल्या. तेथून आम्ही पुढें निघालों. तो म्हातारा शेतकरी मला सांगूं लागला, – "आम्हीं तिकडे दूर शेतांतून राहतों. पण खरंच सांगतों, गेलीं कित्येक वर्षं आम्ही ह्या क्षणाची वाट बघत होतों. आतां स्वातंत्र्य जवळ आलेलं दिसलं आहे. देवानेंच आमच्यासाठीं हें अमृत पाठवलं म्हणायचं. देशाची दुर्दशा झाली होती. पण आतां असं वाटतं कीं आकाशांत भरारणाऱ्या गरुडांमध्यें आम्ही उजळ माथ्यानें झेप घेऊं. आम्ही स्वतंत्र माणसें आहोंत. मॉस्कोच्या बुटांखालील धूळ नव्हे."

हा साधा भोळा शेतकरी. पण क्रांतीचें सामर्थ्य पाहून तोसुद्धां थरारून गेला होता. क्रांतीचा अर्थ त्याला समजला होता.

**थो**डेंसें दूध आणि ब्रेड बरोबर घेऊन मी ईव्हाकडे गेलों. ती अजून झोंपलेलीच होती. आमच्या खोलींतील चिमुकल्या रेडिओवर स्टूडंट्स हेडक्वॉटर्सवरून दिलेले संदेश स्वच्छ ऐकू येत होते. 'फ्री स्टूडंट्स रेडिओ. अटेन्शन! . . . अटेन्शन! . . . सोव्हिएट सैन्यानें ह्या देशांतून तावडतोब निघून जावें, अशी आमची मागणी आहे. आम्हांला लोकांचें नवें हंगेरिअन सरकार हवें आहे. बंडांत ज्यांनीं भाग घेतला, त्यांना अभय देण्यांत यावें, अशी आमची मागणी आहे. ह्या मूलभूत मागण्या मान्य होईपर्यंत आम्ही अखंड लढत राहूं. स्वातंत्र्यासाठीं चाललेला हा लढा विजयी होईपर्यंत आम्ही हंगेरींतील जनतेला उठाव करण्यासाठीं आवाहन करीत राहूं. स्वतंत्र हंगेरी—झिंदाबाद!'

आमच्या रेडिओवरील ब्रॉडकास्टमध्यें आणखी एक घोषणा वारंवार घुमत होती.

'स्वतंत्र जगांतील कोणी लोक आमचा हा संदेश ऐकत असतील, तर त्यांनीं आमचें एक मागणें जगाच्या कानांवर घालावें, अशी प्रार्थना आहे. पश्चिमेकडून आम्हांला मदत हवी आहे. आशेचा हा एकुलता एक क्षण आहे. हंगेरींतील लक्षावधि लोक पश्चिमेकडील राष्ट्रांकडे मदतीसाठीं आशेनें बघत आहेत.'

ईव्हा जागी झाली, पण ती केलेल्या श्रमांनीं निस्तेज झालेली दिसत होती. तिची काया मनस्वी शिणलेली होती. तिच्या डोळ्यांभोवतीं निळीं-काळीं वर्तुळें उमटलेलीं दिसत होतीं. गर्भातील जीवाबरोबर ती प्रतिक्षणाला क्षीण होत होती. मीं तिला दूध दिलें. तिला तो देवाचा प्रसाद वाटला. जखमी रुग्णांची सेवा करण्यासाठीं ती पुन्हा तयारी करीत होती. मीं तिचा निरोप घेतला, तेव्हां तिनें मला स्वतःच्या प्रकृतीस जपण्यास सांगितलें. गेले कांहीं दिवस हें असेंच चाललें होतें. क्षणाची भेट आणि दीर्घकाळचा विरह.

**मी** साऊथ रेल्वे स्टेशनच्या रोखानें निघालों. एका इमारतीच्या दारांत तीन चिलखती गाड्या उभ्या असलेल्या मला दिसल्या. इमारतीवर बोर्ड होता. – 'नेपबफे' – लोकांचें उपाहारगृह. मीं जवळ जाऊन पाहिलें, तर हॉटेल बंद होतें. पण हॉटेलचा दरवाजा फोडलेला दिसला. आंतून विकट हास्याचा आवाज कानांवर पडला. सोव्हिएट सोल्जर्स. जणूं लग्नाच्या

मेजवानीसाठींच ते जमले होते.

आतां पुढें काय करावें, ह्याचा मी विचार करीत होतों. तेवढ्यांत मोडलेल्या दाराची फळी बाजूला करून एक दारुडा रशियन बाहेर बघूं लागला.

" काय ? येथील दारू कशी आहे ?" – मोडक्यातोडक्या रशियन भाषेंत मीं त्याला विचारलें. त्या तशा अवस्थेंत त्याला दुसरें काय विचारणार ?

" जर्मन दारू ना ? . . . झकास आहे. " – तो म्हणाला.

जर्मन दारू ? – मला कांहींच समजेना, हा अडाणी माणूस असें काय बोलत होता ?

मग मीं त्याला मोठ्यानें विचारलें, – " गड्या, तूं आतां कुठें आहेस ? "

" बर्लिन. " – त्याचें उत्तर मोठें चमत्कारिक होतें. – " नेमेट्झकी – हिटलर–कापुट ! "

म्हणजे काय ? मला कांहींच समजेना. बहुतकरून सोव्हिएट फौजेंतील हे साधेभोळे शिपाईगडी रुमानियांतून आलेले असावेत. निघण्यापूर्वी त्यांना सांगितलें असावें कीं तुम्ही बर्लिनला जात आहांत – फॅशिस्टांशीं लढण्यासाठीं.

तो सैनिक धडपडत एका चिलखती गाडीजवळ गेला. गाडींत चढून बसला. आणि दोन सेकंदांत त्याला गाढ झोंप लागली. लोकशाहीचे मुक्तिदाते ते हेच असावेत, असें मला वाटलें. हे दारुडे नरपशु हॉटेलमध्यें खातपीत बसले आहेत, तोंपर्यंत ठीक आहे. पण दारूच्या पिपाचा तळ गांठला कीं हेच लोक रस्त्यावर येतील आणि मग काय करतील, तें कांहीं सांगतां येणार नाहीं. निरपराध लोकांना ते गोळ्या घालतील, लूटमार करतील, घरेंदारें उध्वस्त करतील. बारा वर्षांच्या कोंवळ्या मुलीपासून तो बारा गुणिले सहा वर्षांच्या वृद्ध बायकांपर्यंत त्यांचे हात पोहोंचतील. त्या बायकांना जवळपासच्या गल्लींत ते धरून नेतील; आणि त्यांच्यावर बलात्कार करतील.

आतां वेळ दवडून भागण्यासारखें नव्हतें. धांवतपळत मी होस्टेलमध्यें परत गेलों. आणि तेथून जवळच्याच ग्योरि स्ट्रीटवरील कॉलेज ऑफ फिझिकल एज्युकेशनला फोन केला. होस्टेलमधील तीन लहान मुलींनीं टेलिफोनवरील माझें संभाषण ऐकलें होतें. – " आम्ही बंदुका घेऊन आलों, तर तुझ्याबरोबर आम्हांला नेशील काय ?" – म्हणून त्यांनीं मला विचारलें.

"तुम्हांला बंदुका कोण देणार आहे ?" – मीं त्यांना उलट विचारलें.

"कां बरं ! जखमी शिपायांचीं शस्त्रं आहेत की. त्यांच्या बंदुका आम्ही तळघरांत सांठवून ठेवल्या आहेत."

मग आम्ही तसेच हॉटेलजवळ गेलों. तेथून पुढें सावधगिरीनें चालावयास लागलों. पण थोड्याच वेळांत आम्हांला कळून चुकलें कीं थोडा उशीर झाला होता.

कारण आम्ही तेथें पोहोंचलों, तेव्हांच हॉटेलमधून आठ सोल्जर्स बाहेर पडले. त्यांचे पाय लटपटत होते. पण तरीसुद्धां धडपडत कशाबशा त्यांनीं आपल्या गाड्या गांठल्या. ते गाड्यांवर चढले मात्र; गाड्या चालू झाल्या. आणि त्यांनीं एकदम चौफेर गोळीबार करावयास सुरुवात केली.

ते पुढें निघून गेले. पाठीमागें त्यांनीं उध्वस्त केलेल्या वस्तूंच्या निशाण्या तेवढ्या राहिल्या. कोपऱ्यावर ते पोहोंचले नाहींत, तोंच दुसऱ्या एका रस्त्यानें कांहीं तरुण मुलें चालत आलीं. तीं बिचारीं गोळीबाराच्या भडिमारांत अचानक सांपडलीं. एका गाडींतून प्रथम गोळीबार सुरू झाला. मागच्यांनीं पुढच्यांची री ओढली. बघतांबघतां पांच मुडदे रस्त्यावर कोसळले. पाठी-मागून आम्हीं पण गोळ्यांची फैर झाडली. पण आम्ही त्यांना थांबवूं शकलों नाहीं.

पांच हंगेरिअन तरुण मुलें ठार मारलीं गेलीं. आणि कारण काय ? तर कांहीं रशियन सोल्जर्स नको इतकी 'जर्मन' दारू ढोसून हॉटेलमधून बाहेर पडले आणि वेड्यासारखे गोळीबार करूं लागले. माझ्याबरोबर ज्या लहानलहान मुली होत्या, त्यांनीं मृतांना पुरण्यासाठीं माझ्याबरोबर येण्याची इच्छा दर्शविली. जे मेले, ते होते अठराएकोणीस वर्षांचे. आणि ह्या मुली त्यांच्याहून वयानें लहान. मीं नाहीं म्हटलें, तर अगदीं गयावया करून त्यांनीं माझी करुणा भाकली. मृतांचे अंत्यविधि आम्ही करूं शकलों नाहीं. स्मशानांत पाद्री नव्हते. कोणीं भाषणें केलीं नाहींत. डोळ्यांतील अश्रु अनावर झाले होते. अवघ्या हंगेरिअन राष्ट्राचे ते अश्रु होते.

नंतर ती दुपार आम्ही मृतांच्या अंत्यसंस्कारांत खर्ची घातली. हे जे कोणी तरुण अकारण गोळीबाराचे बळी झाले होते, त्यांच्या आईबापांस वा आप्तांस आपल्या लाडक्यांच्या मरणाची वार्तासुद्धां त्या वेळीं कळणार नव्हती.

आम्हांला कांहीं काळ विजय मिळणार होता. पण तो साजरा करण्याचें सद्भाग्य त्या हुतात्म्यांच्या लेखीं लिहिलेलें नव्हतें. ह्या मुलांना वीरोचित मरणाचें भाग्य लाभलें होतें. पण त्यांच्या आप्तांना त्याची खबर नव्हती. कदाचित् आणखी कित्येक दिवसपर्यंत त्यांचे आप्त त्यांची वाट बघत बसतील. ज्या ठिकाणीं हीं मृलें मरुन पडलीं होतीं, त्या जागेपासून जवळच एक छोटासा पार्क होता. तेथपर्यंत आम्हीं तीं प्रेतें उचलून नेलीं. घाईघाईनें खणलेल्या खड्ग्यांत त्यांना मूठमाती दिली.

मी घरीं पोहोंचलों, तेव्हां संध्याकाळ झाली होती. उशीरा कां होईना, पण आज थोडेंसें अन्न घरांत शिजलें होतें. नाहीं तर रोज बहुतकरून थंड्या फराळाचाच बेत असे. आज मात्र डिशमध्यें बेकन होतें. बरोबर उकडलेले बटाटे. हें पक्वान्न माझ्या भारी आवडीचें होतें, आणि आज तें मला शेत-कऱ्यांच्या औदार्यामुळें लाभलें होतें.

रात्रीं नऊ वाजतां रेडिओवरून घोषणा करण्यांत आली कीं, लोकांस दिलेलें अभयाचें आश्वासन ह्या क्षणाला संपुष्टांत आलें आहे. प्रत्येक सैनिकानें आपल्या हातांतील शस्त्रें तात्काळ खालीं ठेवावींत. आणि शांततेचीं पांढरीं निशाणें घराघरांवर लावावींत.

पण शहरांत सर्वत्र लढाई चालूच होती !

● ● ●

## ऑक्टोबर २७, १९५६

**आज** ह्या राजधानीनें सुतक पाळावयाचें ठरविलेलें दिसतें.

रस्त्यारस्त्यांतुन फडकणारीं तिरंगी निशाणें आज एकदम नाहींशीं झालीं होतीं आणि त्यांच्याऐवजीं शोकनिदर्शक काळीं निशाणें सर्वत्र दिसत होतीं.

आज सकाळींच आमच्या कौन्सिलची एक तांतडीची सभा आम्हीं घेतली. ज्या कोणाला आपली नेमून दिलेली जागा सोडून येतां येणें शक्य होतें 'तो प्रत्येक जण सभेला आला होता.

कौन्सिलनें एक नवा ठराव करून प्रीमिअर नाजकडे पाठविला. ह्या ठरावाची सुरुवात एका गंभीर प्रतिज्ञेनें करण्यांत आली होती. ती प्रतिज्ञा अशी : 'आमच्या हुतात्म्यांच्या रक्ताची शपथ घेऊन आम्ही सांगतों कीं, आमचा हा देश स्वतंत्र केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाहीं.'

आमच्या 'फ्री स्टूडंट्स रेडिओ' वरून मूलभूत हक्कांच्या आमच्या मागण्या आम्हीं बारापंधरा वेळां ध्वनिक्षेपित केल्या.

रेडिओ बुडापेस्टनें आमच्या मागण्यांस जें उत्तर दिलें, तें हें – 'तीन माणसांपेक्षां अधिक लोक एका ठिकाणीं जमले, तर लष्करी सैनिक त्यांना अटक करतील. दंगेखोर जमावाविरुद्ध लष्करास आवश्यक तीं शस्त्रें वापरण्याचा हुकूम देण्यांत आला आहे.'

पण सरकारच्या ह्या हुकुमास आम्हीं भीक घातली नाहीं. कारण सरकारनें कोणतेहि हुकूम सोडले, तरी त्यांची अंमलबजावणी करण्यासाठीं सरकारला फारसे सैनिक मिळणार नाहींत, हें आम्हांला माहीत होतें. आमच्यापैकीं कांहीं मुलें सबवे स्टेशनच्या आसपास गोळा झालीं होतीं. काल जेथें आमचा ट्रान्समिटर होता, त्याच ठिकाणीं जनरल कोव्हॅक्सचा एक सहकारी मेजर वॉर्बेली ह्या ठिकाणीं एक दूत पाठविणार होता. त्याची वाट ते बघत होते.

हा दूत अपेक्षेप्रमाणें आला. बुडापेस्टपासून पंचेचाळीस मैलांवर टाटाबान्या नांवाचें खाणकामगारांचें एक छोटें शहर होतें. तेथील ३३० कामगार 'एव्हीएच्' शीं मुकाबला करावयास उत्सुक होते. जेथें कोठें युद्ध ऐनभरांत होतें, तेथें त्यांना घेऊन जाण्याची कामगिरी आमच्यावर सोंपविण्यांत आली होती. किलियन बरॅक्सपाशीं घनचक्कर लढाई जुंपलेली होती. तेथें कर्नल मालेटर सोव्हिएट लष्कराशी निर्णायक सामना लढत होता.

वाटेंत आम्ही सेंट जॉन्स हॉस्पिटलपाशीं थोडा वेळ थांबलों. तेथें आमचे जखमी सहकारी होते. त्यांची खबर घ्यावयाची होती. ह्या वेळपर्यंत बँडेजेस, औषधें आणि अन्नसामुग्री संपुष्टांत आली होती. आमच्या कांहीं सैनिकांना रक्त हवें होतें. पण रक्ताचे उपलब्ध सांठे कम्युनिस्ट किंवा रशियन लष्करासाठींच राखून ठेवण्यांत आले होते.

खाणकामगार येऊन पोहोचण्याची वेळ झाली आहे, अशी खबर घेऊन आर्मी स्टाफ हेडक्वॉर्टर्समधील एक माणूस आला होता. मध्यंतरीं जेवढे म्हणून विद्यार्थी व तरुण गोळा करणें शक्य होतें, तेवढे एकत्र जमविण्यासाठीं आमची धडपड चालली होती. जे जमले होते, त्यांना बरोबर घेऊन आम्ही निघालों.

बुडापेस्टच्या सरहद्दीवर झेपिलोना भाग आहे, तेथें आम्ही जाऊन पोहोंचलों. तेव्हां शहराच्या रोखानें येत असलेल्या कित्येक ट्रक्स आम्हांला दिसल्या. खरें म्हणजे त्यांच्या स्वागतासाठींच आम्ही तेथें गेलों होतों. पण ट्रक्समधील लोकांनीं उलट आमच्यावरच बंदुका रोखल्या. तोंपर्यंत पाठीमागून एकूण सात ट्रक्स तेथें येऊन पोहोचल्या होत्या. ट्रक्समध्यें चाळीस जखमी माणसें दिसलीं.

" तुम्ही कोण आहांत ?" – त्यांच्यापैकीं एकानें आम्हाला ओरडून विचारलें.

" स्टूडंट्स कौन्सिलचे आम्ही प्रतिनिधि आहोंत." – आम्ही ओरडून उत्तर दिलें – " तुम्ही कोण आहांत ? टाटाबान्याहून तुम्ही आलां आहांत काय ? "

" होय. "

" मग बाकीचे लोक कुठें आहेत ? तीनशें लोक येणार, म्हणून आम्हांला कळलं होतं. " – आम्ही ओरडून सांगितलें.

" थांवा जरा. " – त्यांच्यापैकीं एक जण म्हणाला. ट्रकमधून उडी मारून तो आमच्याजवळ आला. त्यानें सांगितलेली गोष्ट फार भयंकर होती.

शहरापासून दूर कांहीं मैल अंतरावर ह्या लोकांना कांहीं नागरिकांनीं हटकलें होतें. त्यांच्या दंडांवर तिरंगी फिती होत्या. – " तुम्ही लोक बुडापेस्टला जात आहांत काय ?" – म्हणून त्यांनीं विचारलें. त्यांच्या दंडांवरील तिरंगी फिती पाहून हे लोक स्वातंत्र्यासाठीं लढणारे सैनिक असावेत, अशी त्यांची समजूत झाली. – " आम्ही टाटाबान्याहून आलों आहोंत. एव्हीएच व सोव्हिएट सैन्याशीं लढण्यासाठीं आम्ही राजधानींत जात आहोंत." – असें त्यांनीं सांगितलें.

तेव्हां ट्रकमधील लोकांना त्यांनीं जाऊं दिलें. पण जाण्यापूर्वीं त्यांना सांगितलें कीं, ह्यापुढें वाटेंत आणखी अशाच चौक्या लागतील. म्हणून तुमच्या

ट्रक्स ह्यापुढें सावकाश जाऊं द्या. येथून तुम्ही पुढें गेलांत कीं तुम्हांला वाटेंत कोणी आडवणार नाहीं.

'आरंभीं तरी त्यांनीं दिलेली माहिती बरोबर दिसली. आणखी एक मैल पुढें आल्यावर कांहीं सैनिक आम्हांला दिसले. त्यांच्या दंडांवरसुद्धां तिरंगी फिती होत्या. त्यांच्या हातांत राष्ट्रध्वज होते. स्वातंत्र्याचा जयजयकार करून त्यांनीं आमचें स्वागत केलें. आम्हीं पण त्यांच्या जयजयकारास साथ दिली. हंगेरिअन रणगीतें गाऊन आम्हीं आमच्या मनांतील आनंद मुक्तकंठानें व्यक्त केला. रस्त्यांत चारपांच ठिकाणीं मशीनगन्स आडोश्याच्या जागीं उभ्या करून ठेवलेल्या दिसल्या. पण आम्ही तिकडे लक्षच दिलें नाहीं. कारण त्यांनींच शहरांत शिरण्यापूर्वीं आमचें स्वागत केलें होतें,' – तो खाण-कामगार म्हणाला. आपल्या सहकाऱ्यांच्या जखमा बांधण्यासाठीं त्यानें आपल्या अंगांतील शर्ट फाडून त्याचीं बँडेजेस् केलीं होतीं.

'आणि मग एकाएकीं मशीनगन्समधून गोळीबार सुरू झाला. गोळीबाराचा आवाज ऐकतांच वज्राघात झाल्यासारखें आम्हांला वाटलें. हा गोळीबार इतका अनपेक्षित होता कीं, आमच्या बंदुका हातांत उचलून घेण्याचीसुद्धां आम्हांला संधि मिळाली नाहीं.'

'आमच्यांतील दोनशेंऐंशी लोक आम्ही तेथेंच टाकून आलों. त्यांच्यापैकीं कित्येक तात्काळ जागच्याजागीं ठार झाले होते आणि कांहीं जणांना प्राणांतिक जखमा झाल्या होत्या.'

ती वार्ता ऐकून आम्ही थक्कच झालों. जे खाणकामगार मृत्यूच्या पाशांतून सुटले होते, त्यांना बरोबर घेऊन आम्ही युनिव्हर्सिटी हेडक्वॉर्टर्स-मध्यें आलों. तेथें ते आमच्यांत राहिले. आणि आमच्या खांद्यांना खांदे भिडवून बुडापेस्टच्या लढाईत ते शौर्यानें लढले.

ह्या कामगिरीवरून परत येत असतांना वाटेंत कॅसल हिलवरील जनरल स्टाफ हेडक्वॉर्टर्समध्यें ही खबर देण्याची माझी इच्छा होती. पण तेथपर्यंत आम्ही जाऊं शकलों नाहीं. कारण वाटेंत प्रत्येक रस्त्यावर लढाई चाललेली होती.

ऑस्ट्रोम स्ट्रीटच्या नाक्यावर शत्रूंनीं आम्हांला एकदम वेढलें. त्यांच्यावर आम्हीं आमच्या जवळचे शेवटचे हँडग्रेनेडस् टाकले. त्यामुळें कित्येक

कम्युनिस्ट सैनिक जायबंदी झाले. ह्या चकमकींत कार्सि नांवाचा एक विद्यार्थी जखमी झाला. त्याच्या दंडावर गोळी लागली होती; म्हणून जवळच्या एका घराच्या दारांत मीं त्याला फरफटत ओढून नेलें. गोळी दंडांत रुतली होती. लगेच मीं त्याची होस्टेलमध्यें रवानगी केली. नंतर ईव्हा मला भेटली, तेव्हां तिनें मला सांगितलें कीं, लग्नासाठीं केलेले नवे कपडे फाडून तिनें कार्सीच्या आणि इतर मित्रांच्या जखमा बांधण्यासाठीं बँडेजेस् केलीं होतीं.

ही कामगिरी हातावेगळी केल्यावर मीं पुन्हा आमच्या रेडिओ ट्रान्स-मिटरची खबर घेतली. तेथें मुलांनीं मला सांगितलें कीं, एका नव्या राष्ट्रीय सरकारची स्थापना करण्यांत आल्याचें वृत्त आहे. धोरण जुनेंच, पण तें धोरण अंमलांत आणणारें सरकार मात्र नवें. ह्या नव्या सरकारांत आमचा म्हणण्या-सारखा असा एकच माणूस होता— बेला कोव्हॅक्स. 'स्मॉलहोल्डर्स पार्टीचा' तो एक जुना पुढारी होता. रशियांतील तुरुंगांत आठ वर्षांची सजा भोगून तो नुकताच परत आला होता. हा एक खराखुरा प्रामाणिक देशभक्त होता

ह्या नव्या सरकारांत अनेक वैगुण्यें होतीं. आणि कम्युनिस्टांशीं हात-मिळवणी करण्यास हें नवें सरकारसुद्धां उत्सुक होतें. पण आमचें सर्वांचें असें मत होतें कीं १९४८ सालापासून जें सरकार आमच्यावर लादण्यांत आलें होतें, त्यापेक्षां हें नवें सरकार कांहींसें बरें होतें.

आम्ही आमचा ट्रान्समिटर पुन्हा एकदां सज्ज केला. ह्या ट्रान्समिटर-' वरून आणि 'फ्री स्टूडंट्स रेडिओ 'वरून आम्हीं खालील घोषणा ध्वनिक्षेपित केली:

'नवें सरकार स्थापन झालें आहे, ह्या वार्तेचें आम्ही स्वागत करतों. विद्यार्थ्यांनो आणि कामगारांनो ! आमचा लढा अजून संपलेला नाहीं. आमच्या सर्व मागण्या मिळेपर्यंत आमचा हा लढा चालू राहणार आहे. सोव्हिएट लष्कर ह्या देशांतून कायमचें बाहेर गेल्याशिवाय आम्ही आमच्या हातांतील शस्त्रें खालीं ठेवणार नाहीं. देशांत सर्वत्र जो सर्वव्यापी हरताळ चालू आहे, तो तसाच उद्दिष्टप्राप्तीपर्यंत चालू ठेवावा, असें आमचें सर्व लोकांस सांगणें आहे. विजय दृष्टीच्या टप्प्यांत आहे. अखेरपर्यंत ताणून धरण्याची हिंमत आमच्यांत असली पाहिजे. प्रीमिअर इम्रे नाजचें नवें सरकार चिरायु होवो !

टेक्निकल युनिव्हर्सिटींत ताबडतोब परत जावयास हवें होतें, कारण हाच संदेश छापलेलीं असंख्य हस्तपत्रकें काढून वांटावयास हवीं होतीं.

पण आमचा हा बेत पार पडू शकला नाहीं. स्टूडंट्स कौन्सिलकडून हुकूम मिळाले, ते वेगळेच होते. बुडापेस्ट शहरांतील आणि शहराबाहेरील तुरुंगांतून जे राजबंदी खितपत पडलेले होते, त्यांची सुटका त्वरित घडवून आणण्याचा निर्णय कौन्सिलनें घेतला होता. आणि त्यासाठीं तुकड्या करून आम्हीं तयार राहावें, असा कौन्सिलचा आदेश होता. बनावट खटल्यांतून गोवलेले हजारों निरपराध लोक विनाकारण तुरुंगांत डांबण्यांत आले होते. लोकांच्या विजयामुळें प्राप्त झालेल्या स्वतंत्र वातावरणाचें सुख त्यांनीं भोगावें, अशी आमची सर्वांचीच इच्छा होती.

अर्थातच बंधमुक्ततेचें हें अवाढव्य काम अत्यंत काळजीपूर्वक करावयास हवें होतें. कारण हे राजबंदी इतर सामान्य गुन्हेगारांच्या सहवासांत ठेवण्यांत आले होते. बाकीचे गुन्हेगार असे होते कीं त्यांच्यापैकीं कित्येकांनीं मानवास माहीत असलेला प्रत्येक अमानुष गुन्हा केलेला होता. अशा स्थितींत आमचे राजबंदी तेवढ सोडवून आणण्याचें काम अत्यंत बिकट होतें.

तुरुंगांतील कैद्यांची योग्य ती प्रतवारी करण्यासाठीं सरकारनें एक चौकशी-समिति नेमली होती. ह्या समितीवर काम करण्यासाठी सरकारनें कौन्सिलला किमान दोन प्रतिनिधि पाठविण्यास सांगितलें होतें. ह्या कामासाठीं झोल्टन क्सापो आणि झोल्ट वेर्झे ह्या दोघांची आम्हीं निवड केली. त्यांपैकीं पहिला शास्त्राचा आणि दुसरा कायद्याचा विद्यार्थी होता.

ह्यानंतर थोड्याच वेळांत आमच्या कानांवर वार्ता येऊन थडकली कीं, लष्करांतील अधीर सैनिकांनीं मार्को स्ट्रीट आणि फो स्ट्रीटवरील तुरुंग फोडून तेथील कैद्यांची सर्रास मुक्तता केली आहे. शहराबाहेर तीस मैल अंतरावर व्हाक येथें राजबंद्यांसाठीं बांधलेला एक खास तुरुंग होता. तेथील सर्व राजबंदी लष्करांतून इतर शिपायांनीं सोडवून आणले होते.

आज जवळपास पंधरा हजार हंगेरिअन राजबंदी परत माणसांत आले होते. बुडापेस्टमधील लढाईंत जवळपास इतकींच शूर माणसें कामीं आलीं होतीं. परराष्ट्रांतील कित्येक कैदी कैदखान्यांतून मुक्त करण्यांत आले होते.

आज धुकें असें कांहीं घनदाट पडलें होतें कीं, रस्त्यांतील लढाया जवळ-जवळ बंदच पडल्या होत्या. दुरून कोठून तरी तोफखान्याची धडधड तेवढी ऐकू येत होती. किलियन बरॅक्सच्या परिसरांत जीवनमरणाची तुंबळ लढाई

चालू होती. त्या भागांत जाऊन आलेल्या एका विद्यार्थ्यानें आम्हांला सांगितलें कीं: युलोइ स्ट्रीट आणि जोसेफ बोलव्हार्डवर सर्वत्र विध्वंस मातला होता. तेथे सगळीकडे पडझड झालेली दिसत होती. बंडखोर लष्कर नेस्तनाबूत करण्यासाठीं तासातासाला सोव्हिएट फौजांच्या नव्यानव्या तुकड्या तेथें येऊन थडकत होत्या. सोव्हिएट रणगाडे बंडखोर लष्करानें उभारलेल्या तटबंदीवर धडका घेत होते. आणि त्यांच्या राक्षसी ओझ्यांखालीं त्यांचेच जखमी लोक धुळीत चिरडून मरत होते. तेथें असंख्य सोव्हिएट सोल्जर्स जखमी होऊन रस्त्यांत लोळत पडलेले होते. ते मोठमोठ्यानें आक्रोश करून करुणा भाकीत होते. पण त्यांच्याच रणगाड्यांतील निष्ठुर रक्षकांना त्यांची मुळींच दया आली नाहीं. बंडखोर फौजी सैनिकांपैकीं ४५ तरुण सैनिक बराकीच्या एका दूरच्या भागांत एकाकी कोंडले गेले होते. त्यांनीं मरणाऐवजीं शरणागति पत्करली. आणि पांढरें निशाण वर चढवलें. रशियनांनीं त्यांची शरणागति मान्य करून त्यांना अभय दिलें. नंतर त्यांचीं शस्त्रें काढून घेतलीं. शेवटीं त्यांना भिंतीला लागून एका ओळींत उभें केलें आणि मग त्यांच्यापैकीं प्रत्येकास गोळ्या घालून ठार केलें.

ह्याच वेळीं सगळीकडे अशी एक अफवा पसरली कीं, पोस्टमेन लोकांनीं फिरून काम करावयास सुरुवात केली आहे. नंतर कम्युनिस्टांचा कावा लोकांच्या ध्यानांत आला. पत्रांचा बटवडा करणाऱ्या पोस्टमेनना हाताशीं धरून त्यांच्याकडून हरएक प्रकारची माहिती गोळा करण्याचा डाव कम्युनिस्टांनीं घातला होता. तो ध्यानांत आल्यावर पोस्टमन रस्त्यांत दिसला कीं, अगोदरच लोक आपल्या घरांचीं दारें त्याच्या तोंडावर बंद करून घेत.

**आ**ज स्टालिन स्क्वेअर, स्टालिन ब्रिज आणि स्टालिन बोलव्हार्ड हीं नांवें विधिपूर्वक बदलण्यांत आलीं. ह्या संबंधांत एक गोष्ट तर आम्हीं कधींपासून मनाशी योजून ठेवली होती. कम्युनिस्टांची कोणती एक नांव-निशाणी आम्हांला आमच्या देशांत मुळींसुद्धां नको होती.

मी परत घरीं जात होतों, त्या वेळीं एक लहान मुलगी एका इमारतीच्या दाराला टेकून बसलेली मला दिसली. हातांतील मशीनगन तिनें घट्ट धरून ठेविलेली होती. मी तिच्याजवळ गेलों आणि तिला उठवण्याचा यत्न केला. तेव्हां माझ्या ध्यानांत आलें कीं ती मेली आहे. अकराबारा वर्षांपेक्षां तिचें

वय अधिक नसावें. तिच्या खिशांत नीट घडी करून ठेवलेली एक चिट्ठी होती. ती चिट्ठी आपल्या आईबापांना देण्यासाठीं एखाद्या ओळखीच्या माणसास सांगण्याचा तिचा विचार असावा. पोरकट अक्षरांत तिनें लिहिलें होतें :

'प्रिय आई, भाऊ मेला. त्यानें आपली बंदूक माझ्या स्वाधीन केली आहे. मी खुशाल आहें. मी माझ्या मित्रांबरोबर जातें आहें. मी तुझा मुका घेतें. — काटि .'

त्या चिट्ठीची नीट घडी करून मीं पुन्हा तिच्या खिशांत ठेवून दिली. रस्त्यावरून उचलून तिला दाराच्या आंत नेऊन ठेवलें.

उद्यां रविवार आहे, तेव्हां आजची रात्र विश्रांति घ्यावी, असा माझा विचार होता. थोडया वेळानें मीं ईव्हाला सांगितलें कीं; बुडापेस्टमध्यें 'एव्हीएच'चीं माणसें आतां जवळपास निकालांत निघालीं आहेत. त्यांचीं बहुतेक सर्व ठाणीं आमच्या लोकांनीं उध्वस्त करून टाकलीं आहेत. आणि त्यांचे उरलेसुरले लोक गटारांतून किंवा जळलेल्या घरांच्या आश्रयानें लपून-छपून कसेबसे दिवस काढीत आहेत. गेल्या कित्येक वर्षांत जिला निर्भय म्हणतां येईल अशी ही पहिलीच रात्र होती. त्या रात्रीची मोठ्या उत्सुकतेनें ती वाट बघत होती.

पण त्या रात्रीं एकमेकांशीं अधिक कांहीं बोलण्याची संधीच आम्हांला मिळाली नाहीं. कारण त्याच रात्रीं आणखी दोन म्हाताऱ्या बायका आमच्या खोलींत आश्रयासाठीं आल्या. पलीकडच्या रस्त्यावरील त्यांचें घर जळून खाक झालें होतें. आणि म्हणून त्यांनीं आमच्या होस्टेलमध्यें आसरा घेतला होता. त्या झोपल्या त्या आमच्याच खोलींत ! कारण होस्टेलमध्यें तरी दुसरीकडे जागा कोठें होती ?

• • •

## ऑक्टोबर २८, १९५६

**आज** रविवार. आज रस्त्यांतून सगळीकडे सामसूम होती. रस्त्यांतील लढाई आतां जवळपास थांबली होती. दारू पिऊन झिंगलेल्या रशियन सोल्जर्संचा धुमाकूळ रस्त्यांत सर्वत्र चालू होता. ते

उगीचच गोळ्या झाडीत होते. नागी सरकारनें लष्करांतील सनिकांस शिस्त लावण्याचा यत्न केला होता. कोणीं हल्ला केल्याशिवाय गोळी झाडावयाची नाहीं, अशी सक्त ताकीद सैनिकांस देण्यांत आली होती. आतां उभयपक्षीं शांततेची आवश्यकता होती. म्हणून आम्ही आमच्या कमजोर ट्रान्समिटरवर नाज सरकारचें आवाहन पुनःपुन्हा ध्वनिक्षेपित करीत होतों.

हंगेरिअन लष्कर आमच्यावर गोळ्या झाडणार नाहीं, अशी आमची खात्री होती. कांहीं झालें, तरी ते आमचेच लोक होते. पण मग रशियन लष्कराचें काय ?

किलियन बरॅक्सच्या टापूंत अजून रणधुमाळी चालूच होती. तेथील युद्धाचें भवितव्य काय होतें ? समजा, तेथें कोंडलेल्या सैनिकांनीं शस्त्रें खालीं ठेवलीं, तर त्यांची गत काय होणार होती ? काल ४५ सैनिकांची जी गत झाली, तीच इतरांची पण खात्रीनें होणार; हें आम्हांस अनुभवानें कळलें होतें.

आणि आतां जरी लष्करी गाड्या शांततेचा संदेश देत, बुडा भागांतील रस्त्यारस्त्यांतून हिंडत होत्या व बंडखोरांस शस्त्रें खालीं ठेवण्यास परोपरीनें विनवून सांगत होत्या, तरी आम्ही मात्र आमच्या हातांतील शस्त्रें मुळींच खालीं ठेवणार नव्हतों.

मी सकाळीं उठलों, तर कळलें कीं एक विद्यार्थी केव्हांपासून माझी वाट बघत बसला आहे. लगेच मीं त्याला बोलावून घेतलें. स्टूडंट्स कौन्सिलचे जे कोणी सभासद अजूनपर्यंत जीवंत होते, त्यांच्या शोधांत तो फिरत होता. नाज सरकारचा एक निरोप त्यानें माझ्यासाटीं आणला होता.

'जेवढे म्हणून कौन्सिलचे सभासद असतील, त्या सर्वांना भेटण्याची इम्रे नाजची इच्छा आहे.' तो म्हणाला, 'तेव्हां तूं स्वतः आणि इतर जे कोणी मिळतील त्या सर्वांनीं पार्लमेंटमध्यें जमावयाचं आहे. दुपारीं एक वाजतां. काम फार महत्त्वाचं आहे. सर्व सभासदांनीं पार्लमेंटबाहेर आधीं जमावं, असं ठरलं आहे.'

खरेंच. आमच्यापैकीं आतां किती जण जीवंत होते बरें ? कोणास ठाऊक ! विद्यापीठें अनेक होतीं. पण त्यांच्यांतील दळणवळण मध्यंतरीं जवळपास तुटल्यासारखेंच झालें होतें. सर्व कॉलेजांतून रेडिओच्या द्वारां संदेश पाठवावयाचा म्हटलें, तर कित्येक कॉलेजांत रेडिओच नव्हते. होस्टेलमध्येंच व्हास आणि कोस दोघे जण होते. त्यांनाच फक्त मी हा निरोप देऊं शकलों.

सकाळीं अकरा वाजतां आम्ही आमच्या रेडिओस्टेशनवर जमलों. हें ठिकाण अर्थातच दुसऱ्या कोणास माहीत नव्हतें. अर्थातच आम्ही सर्व जण तेथें एकत्र जमूं शकलों नाहीं. कारण गेल्या कांहीं दिवसांत कोणाची खबर कोणास नव्हती. ज्या कोणास निरोप मिळूं शकला, ते सर्व हजर होते.

नंतर आम्ही ज्या कामासाठीं जमलों होतों, त्या कामास सुरुवात केली. एका बाबतींत सर्वांचेंच एकमत होतें. नाजनें कम्युनिस्टांशीं संबंध तोडले नव्हते, हें उघड दिसत होतें. पण तरीसुद्धां हंगेरिअन लोकांच्या इच्छेविरुद्ध तो आतां कांहीं करूं शकत नव्हता. म्हणून निदान हंगेरिअन जनतेशीं संबंध जोडावेत, असें त्याला वाटत असावें. पण त्याच वेळीं कम्युनिस्टांना झिडकारून टाकावयास तो तयार नव्हता.

तें कांही असो. त्याचें धोरण हंगेरीला फिरून कम्युनिस्टांच्या दावणींत नेऊन बांधण्याचें होतें. आम्हांला कम्युनिझमचा संपर्कदेखील नको होता. गेल्या पांच दिवसांत हंगेरीच्या देशभक्तांनीं अपार रक्त सांडलें होतें, तें काय म्हणून ? कम्युनिझमसाठीं ? संपूर्णपणें स्वतंत्र असें हंगेरीचें राज्य आतां आपण स्थापन करूं शकलों नाहीं, तर हुतात्म्यांचें बलिदान व्यर्थ झालें, असें होईल. ह्याच एका कारणामुळें बुडापेस्टमधील जनता नव्यानें स्थापन झालेल्या सरकारला पाठिंबा देत नव्हती. खरें म्हटलें, तर हा एक क्षण असा होता कीं ह्या एका क्षणाला अवघ्या देशाचें भवितव्य निश्चित होणार होतें. पण इम्रे नाजच्या धोरणाविषयीं जनता मनांतून साशंक होती. — आमच्या स्वातंत्र्याचा लढा चिरडून टाकण्यासाठीं त्यानें रशियन फौजेला खुशाल घरांत घेतलें होतें. अशा माणसाला आम्ही काय म्हणून पाठिंबा देऊं ? — असा प्रश्न जो तो विचारीत होता. कालांतरानें एका ध्वनिक्षेपित भाषणांत त्यानें लोकांची क्षमा मागितली होती. तेव्हां तो म्हणाला होता कीं, आपण कांहीं रशियन फौजांना बोलावण्याचा हुकूम दिला नव्हता. हुकूम दिला होता तो गेरो व हेगेडस ह्यांनीं. पण त्या दोघांनीं नाजच्या नांवाचा उपयोग केला होता, ही गोष्ट त्यानें कबूल केली होती.

आम्ही आमच्या मशीनगन्स रेडिओच्या गुप्त जागेंत ठेवून दिल्या आणि तेथून डॅन्यूब नदीच्या रोखानें पायींच निघालों. पण चेन ब्रिजवर रशियन्सचा कडक पहारा होता. आम्ही त्यांच्याजवळ गेलों आणि आमच्या

कामाचें महत्त्व त्यांना पटवून देण्याचा यत्न केला. आम्हांला प्रीमिअर नाजला भेटावयाचें आहे, म्हणून सांगून पाहिलें. पण कांहीं केल्या त्यांची समजूत पटेना. ते नुसते आमच्याकडे बघून हंसत होते.

'जा.' त्यांच्यापैकीं एक जण हंगेरिअन भाषेंत ओरडून उठला आणि त्यानें मागच्या रस्त्याकडे बोट दाखविलें. आम्ही तेथेंच उभे होतों, ते मागें सरलों नाहीं. मग त्यांचें हंसणें थांबलें आणि त्यांनीं हातांतील मशीन-गन्सचीं तोंडें आमच्या दिशेनें वळविलीं.

"हे लोक आतां आपल्याला मारतील सुद्धां!" – पिस्टा व्हास म्हणाला, "आपण आपल्या बंदुका घरींच ठेवून आलों, ही चूक केली. . . . चला. आतां दुसऱ्या पुलाकडे जाऊं या."

मग तेथून आम्ही सेंट मार्गरिट ब्रिजवर गेलों. तेथें फक्त दोन रशियन पहारेकरी होते: त्या दोघांची वृत्ति जरा मवाळ दिसली. कदाचित् आपल्या मातृभूमीच्या आठवणींनीं ते बेचैन झाले असतील. कदाचित् क्रेम्लिनच्या अमानुष हुकुमांची तामिली करण्याचा त्यांना मनांतून कंटाळा आला असेल. त्यांच्यापैकीं एकाला मोडकेंतोडकें जर्मन बोलतां येत होतें. त्याच्याशीं व्हास बोलला. आम्हांला बड्या सरकारी अधिकाऱ्यांची भेट घ्यावयाची आहे, असें त्यानें सांगितलें. त्यांनीं आम्हांला जाऊं दिलें.

पार्लमेंटसमोर कोणीच नव्हतें. आम्हांला पण थोडासा उशीरच झाला होता. पार्लमेंटच्या इमारतींत जाण्यासाठीं बाजूनें एक रस्ता होता. तिकडे पहिल्यांदा गेलों. तेथें दारांत हंगेरिअन नॅशनल आर्मीच्या युनिफॉर्ममधील एक पहारेकरी उभा होता. त्याच्या दंडावर तिरंगी फीत लावलेली दिसली. 'प्रीमिअर नाजची भेट घेण्यासाठीं आम्हांला आंत जायचं आहे.' म्हणून त्याला आम्हीं सांगितलें. आमचें काम ऐकतांच त्यानें आम्हांला मिलिटरी सॅल्यूट ठोकला.

पार्लमेंटच्या भव्य कॉरिडॉर्समधून लोकांचे घोळके इकडून तिकडे हिंडत होते. तेथें अक्षरशः शेकडों लोक होते. कांहीं ठिकाणीं वाट अडवून टोळक्याटोळक्यांनीं एकमेकांशीं बोलत ते उभे होते. कित्येकांचीं बोलणीं रंगांत आलेलीं दिसलीं. पण त्या असंख्य माणसांमध्यें आमच्या कौन्सिलचा विद्यार्थी कोठें एकसुद्धां दिसेना.

आतां दोन वाजून गेले होते. तेथें आमचें खरोखरीचें काम होतें. पण आम्हांला उशीर झाला होता. प्रीमिअर नाजच्या ऑफिसमध्यें आम्हांला प्रवेश मिळेना. कारण तेथें अगोदरच शेकडों लोक घुसलेले होते. त्यांच्यांत परदेशी वार्ताहरांचा भरणा अधिक होता. शेवटीं त्यांना आमच्या देशांत प्रवेश करण्याची परवानगी देण्यांत आली होती.

दोन फ्रेंच वार्ताहरांनीं आम्हांला गांठून एका कोपऱ्यांत नेलें. तेथें त्यांनीं आम्हांला कित्येक प्रश्न विचारले. आम्हीं दिलेल्या उत्तरांतील शब्द नि शब्द त्यांनीं अधीरतेनें टिपून घेतला. आमच्या वतीनें व्हास जर्मन भाषेंत हळुहळू विचारपूर्वक बोलत होता. नंतर त्यांनीं 'फोटोसाठीं क्षणभर उभे राहतां काय ?' म्हणून आम्हांला विचारलें. आम्ही एका खिडकीजवळ जाऊन उभे राहिलों. त्यांनीं आपले कॅमेरे सरसावले. स्टूडंट्स कौन्सिलचे आणखी कोणी सभासद दिसतात कीं काय, म्हणून आम्ही वाट बघत तेथेंच उभे राहिलों.

ते आमचे फोटो घेत होते, तेवढयांत कॉस झुलि उडी मारून ओरडला, "अरे लाझलो, ते बघ. ते तिकडे आहेत." एका विशिष्ट दिशेला बोट दाखवून हातवारे करीत तो ओरडत होता.

आम्हीं तिकडे पाहिलें, तर तेथें आमच्या ओळखीचे पुष्कळसे चेहेरे आम्हांला दिसले. इंजिनिअरिंग युनिव्हर्सिटी आणि ड्रामा कॉलेजमधील किती तरी विद्यार्थी तेथें उभे होते. कित्येकांस मी ओळखूं शकलों नाहीं. त्या प्रचंड हॉलच्या बाजूलाच एक लहानशी खोली होती. मध्येंच एकदम त्या खोलीचें दार उघडलें, तेव्हां कॉसच्या नजरेस हे आमचे मित्र पडले होते.

प्रीमिअर नाजशीच ते बोलत होते.

नाज त्यांच्याशीं हस्तांदोलन करीत उभा होता. जेव्हां आम्ही त्या खोलीच्या दारांत जाऊन पोहोचलों तेव्हां नाज त्या विद्यार्थ्यांना निरोप देत होता. त्याचे अखेरचे शब्द आमच्या, कानांवर पडले: "मग माझ्या मित्रांनो, आपण कामाला लागूं या. तुम्ही माझ्या बाजूचे आहांत, असं मी धरून चालतों."

लगेच आम्ही बर्टालानला घेरलें. हा इंजिनिअरिंग युनिव्हर्सिटीचा विद्यार्थी. विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींचें नेतृत्व त्यानें केलें होतें. आमच्या कौन्सिलचे एकूण त्रेचाळीस सभासद होते. त्यांपैकीं तेवीस सभासद तेथें हजर होते. "काय झालं ?" म्हणून आम्हीं त्याला मोठया उत्सुकतेनें विचारलें.

"हंगेरीच्या भावी विकासकार्यात विद्यार्थ्यांनीं आपला वांटा उचलावा, अशी नाजची इच्छा आहे. ह्या कामासाठीं आज सकाळींच तांतडीनें त्यानें एक कमिटी नेमली आहे. ह्या कमिटीवर काम करण्यासाठीं विद्यार्थ्यांचा एक प्रतिनिधि त्याला हवा आहे." बर्टालान म्हणाला, "आम्ही आमच्या मूळ मागण्या त्याच्या समोर ठेवल्या. हंगेरींतून सोव्हिएट लष्कर ताबडतोब काढून घ्यावं, स्वतंत्र वातावरणांत खुल्या निवडणुकी घ्याव्यात, लोकांचें मूलभूत नागरिक हक्क त्यांना मिळावेत, ह्या आमच्या मागण्या आम्हीं ठांसून मांडल्या. त्यावर तो म्हणाला कीं तुमच्या प्रत्येक न्याय्य मागणीचा मी विचार करीन. ह्या सर्व मागण्या मंजूर होतील. सोव्हिएट लष्कर काढून लावण्याबाबत सोव्हिएट नेत्यांशीं मी लवकरच बोलणीं करणार आहें, असं तो म्हणाला. बघूं या, आपलं आश्वासन तो कितपत पाळतो तें."

ह्या भागांत आम्हीं पाहिलें, तर सर्वत्र भयंकर नासधूस झालेली दिसली. तेथील दृश्य बघवत नव्हतें. सोव्हिएट सोल्जर्स सगळीकडे हिंडत होते त्यांचे चेहेरे भयानक दिसत होते. विकट हास्याच्या विकृतीनें ते काळवंडले होते. गांवाबाहेरच्या शेतांतून अन्नधान्याच्या गाड्या सकाळीं आल्या असाव्यात शहरांतील रस्त्यारस्त्यांतून लोकांनीं जे मोर्चे बांधले होते, त्यामुळें अन्न-धान्यांच्या गाड्या गांवांत येऊं शकत नव्हत्या. गांवाबाहेरच गाड्या रोखून ठेवीत. आज जे लोक रांगेंत उभे होते, त्यांना रिकाम्या हातांनींच परत जावें लागलें. त्यांच्या चेहेऱ्यांवर निराशा होती.

पण तरीसुद्धां लोक शांत होते. शहरांत लूटमार नव्हती. वाटेंत आम्हांला घड्याळांचें एक दुकान लागलें. दुकानाची खिडकी फोडलेली दिसली; म्हणून आम्हीं आंत डोकावून पाहिलें. तेथें पेन्सिलीनें लिहिलेला एक बोर्ड होता: 'तुमच्या दुकानाची खिडकी फुटलेली दिसली. म्हणून आम्हीं तुमच्या दुकानांतील माल घरीं नेऊन ठेवला आहे. कोव्हॅक्स ७८, राकोझि स्ट्रीट ह्या पत्त्यावर केव्हांहि यावें आणि आपला माल घेऊन जावा.'

कित्येक हॉटेल्स उघडीं दिसलीं. तेथें परदेशी वार्ताहरांची गर्दी होती. गेलीं कित्येक वर्षें पश्चिम राष्ट्रांतील वृत्तपत्रांच्या वार्ताहरांना आमच्या देशांत मज्जाव होता. आज प्रथमच ते ह्या भूमीवर मोकळेपणानें फिरत होते. त्यांच्याशीं बोलावें, असें मला वाटलें.

तेवढ्यांत कांहीं अमेरिकन रिपोर्टर्स हॉटेलमधून बाहेर पडले. त्यासरशीं एक लहान मुलगी घोळक्यांतून पुढें घुसली. " चाकोलेट. " तिनें ओरडून विचारलें, " तुमच्याजवळ चाकोलेट आहे काय ? "

रस्त्यांतून किती तरी नव्यानव्या गाड्या हिंडतांना दिसत होत्या. अशा सुंदर मोटरी आम्हीं जन्मांत कधीं पाहिल्या नव्हत्या. त्यांच्या मेकचीं नांवें आम्हांला ऐकून माहीत होतीं. पण आज डोळ्यांनीं त्या प्रथमच बघत होतों. मोटारींचें जणूं हें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन मांडलें होतें. आजवर आमच्या देशांतील रस्त्यांवरून फक्त सोव्हिएट गाड्या फिरत होत्या. त्या गाड्यांच्या मानानें ह्या गाड्या सर्वच दृष्टींनीं किती तरी अधिक सुंदर आणि कार्यक्षम दिसत होत्या.

शहराच्या ज्या भागांत आम्ही राहत होतों. त्या दिशेनें चालत जात असतांना एका पुलाजवळ पंधरावीस बायकामुलांचा घोळका दिसला. जवळ जाऊन पाहिलें, तर एक सोव्हिएट गार्ड तेथें उभा होता. त्याच्या भोवतालीं हा घोळका शांत उभा होता. त्याच्या टोपीवर लाल ताऱ्याचें चिन्ह होतें.. त्याच्याकडे बघून बायकामुलांच्या डोळ्यांत तिरस्कार दाटला होता. त्याच्याकडे वळून एक म्हातारी बाई थुंकली. तो अस्वस्थ झालेला दिसला.

कदाचित् मनांत त्याला वाटत असेल कीं लोकांचें हें असें वर्तन बरोबरच आहे. ह्या देशांत जे अत्याचार झाले, तसेच आपल्या मायदेशांत घडलेले त्याला आवडले नसते. अखेरीस शांतपणानें त्यानें आपल्या डोक्यावरची टोपी काढून हातांत घेतली आणि पुलाच्या खालीं भिरकावून दिली. मग लोकांकडे बघून तो हंसला. त्याच्या वर्तनानें चकित झालेले लोकहि त्याच्याकडे बघून हंसले.

रविवारीं संध्याकाळीं प्रत्येक जण आपआपल्या घरी रेडिओला कान देऊन बसला होता. प्रीमिअर नाज लोकांना उद्देशून बोलत होता ·

' इतिहासकाळांतील गेल्या एक हजार वर्षांत ह्या देशांतील लोकांनीं अनन्वित अत्याचार सहन केले आहेत. नियतीनें ह्या देशाला क्रूरपणानें छळलं आहे. पण तरीसुद्धां आजवरच्या इतिहासांत असा भयंकर प्रसंग कधीं गुदरलेला नव्हता. लोकांचं लोकशाही सरकार उलथून टाकण्यासाठीं गुन्हेगार, प्रतिगामी, बंडखोर शक्ति आज एकवटलेल्या दिसत आहेत. त्यांचा हेतु एकच

आहे. ह्या देशांत अराजक निर्माण करावयाचं. अशा स्थितींत माझं सरकार लोकांच्या कल्याणासाठीं पराकाष्ठेचे यत्न करील, असं मी आश्वासन देतों.

'माझ्या सरकारनें सोव्हिएट सरकारशीं वाटाघाटी केल्या आहेत, आणि आमचं अनेक मुद्यांवर एकमत झालं आहे. परिणामीं सोव्हिएट फौजा बुडास्पेस्टमधून ताबडतोब काढून घेण्याचें सोव्हिएट सरकारनें मान्य केलें आहे' . . .

आपल्या भाषणांत त्यानें विद्यार्थ्यांचा चुकूनसुद्धां उल्लेख केला नाहीं आणि थोडचा वेळापूर्वींच त्यानें आम्हांला सांगितलें होतें कीं त्याच्या सरकारला आमचा पाठिंबा हवा आहे म्हणून. पण आतांचें त्याचें हें भाषण पाहिलें, तर तें मात्र सोव्हिएट–हंगेरिअन मैत्रीचा पुरस्कार करणारें होतें. त्याच्या भाषणांत आम्हांला आवडण्यासारखी फक्त एकच गोष्ट होती; आणि ती म्हणजे सोव्हिएट फौजा निघून जाणार असल्याची घोषणा. त्या घोषणेंतसुद्धां कांहीं भाग चिंताजनक होता. फौजा जाणार होत्या, त्या बुडास्पेस्टमधून; हंगेरींतून नव्हे. त्या भाषणावरून एक गोष्ट मात्र आम्हांला स्पष्ट कळून चुकली. नाज हा कांहीं सरळ माणूस नव्हता.

लगेच संध्याकाळीं आम्हीं इंजिनिअरिंग युनिव्हर्सिटींत सभा बोलावली आणि नाजच्या भाषणांतील प्रत्येक मुद्याची आम्हीं काळजीपूर्वक चिकित्सा केली. एक निष्कर्ष आमच्या मनांत पक्का ठसला होता. तो कांहींहि म्हणत असला, तरी हंगेरीच्या लोकांवर त्याचा तसा विश्वास नाहीं. आणि विद्यार्थ्यांवर तर त्याचा रोष आहे. कारण काय ? कारण आम्हीं बंडांत प्रत्यक्ष भाग घेतला होता. त्याची परिणति शेवटीं युद्धांत झाली होती. अशीं निदर्शनें आम्हीं आमच्या बळावर घडवून आणलीं होतीं.

परिस्थिति अशी होती. अशा स्थितींत केवळ एकच गोष्ट आम्हांला करतां येण्यासारखी होती. ती म्हणजे, आमची संघटना अधिक बलिष्ट, मजबूत करावयाची.

● ● ●

## ऑक्टोबर २९, १९५६

सर्व पूल आतां रहदारीसाठीं मोकळे झाले होते. सोव्हिएट फौजा आणि त्यांचे रणगाडे राजधानींतून निघून जाण्यापूर्वी त्यांचें संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारनें बुडापेस्टच्या जनतेवरच टाकली होती. निदान कांहीं काळ तरी बुडापेस्ट शहर स्वतंत्र झाल्यासारखें दिसत होतें. पुष्कळ लोक दंडावर तिरंगी फिती लावून मोकळेपणानें शहरांत हिंडत होते, तर कित्येक लोक कोसूथ चिन्हें अभिमानानें आपल्या अंगावर मिरवत होते. १८४८ सालांतील क्रांतीचा कोसूथ हा एक धैर्यशाली नेता होता.

पूर्वी ज्या रस्त्यास स्टालिन स्ट्रीट असें नांव होतें, त्या रस्त्याला क्रांतिकारकांनीं हंगेरियन युवकांच्या स्मरणार्थ नवें नांव दिलें होतें. ह्या युवकमार्गावर उभे राहून लोक सोव्हिएट फौजा परत जात असल्याचीं दृश्यें बघत होते.

मी मात्र होस्टेलमध्येंच माझें काम करीत होतों. तेथें मदतीच्या अभावीं पुष्कळ कामें तुंबून पडलीं होतीं. जखमी लोकांची शुश्रूषा, हें तर नित्याचेंच काम होतें. त्याशिवाय दोन मुलें रात्रीं मरण पावलीं होतीं. त्यांचें दफन करावयाचें होतें.

आतां प्रेतवाहक गाडी कोठून आणावयाची? तीं प्रेतें आम्हीं जीपमध्यें ठेविलीं. जीप हळुहळू पार्कच्या दिशेनें जात होती. आम्ही सर्व जण खिन्नपणानें जीपच्या मागून चालत होतों. रस्त्यांतील लोक रहदारी थांबवून जीपला वाट करून देत होते. जाणारेयेणारे लोक मृतांना मूक अभिवादन करीत होते.

आम्हीं थडगीं खणलीं आणि त्या थडग्यांत प्रेतें ठेवून वर माती लोटली. दफनविधि संपवून आम्ही परत येत होतों, तेव्हां शहरांतील रस्त्यांवर आम्हांला कांहीं चमत्कारिक दृश्यें दिसलीं. रशियन सैनिक परत जाण्यासाठीं फारसे उत्सुक दिसत नव्हते. परत जातेवेळीं सुद्धां घोळ घालण्याचा त्यांचा विचार दिसत होता.

कशाची वाट बघत होते ते? कांहीं तासांपूर्वींच शहराच्या बाहेर जाण्याच्या घाईत असलेल्या सोव्हिएट फौजा आता कां मागें रेंगाळत होत्या ?

नंतर थोड्या वेळानें कौन्सिलनें एका शाळेंत सभा घेतली. ही शाळा पेस्ट भागांत एलिझाबेथ ब्रिजजवळ होती. प्रीमिअर नाजचा एक दूत येऊन सांगून गेला होता कीं, रशियन फौजांनीं राजधानी सोडण्यास एकाएकीं नकार

दिला आहे. स्वातंत्र्यासाठीं लढणारा प्रत्येक सैनिक शरण आल्याशिवाय सोव्हिएट फौजा शहर खाली करण्यास तयार नव्हते. तेव्हां आणखी कांहीं काळपर्यंत सोव्हिएट फौजांना शहरांत राहूं द्यावें, अशी आतां त्यानें मागणी केली होती.

त्या दूताजवळ कौन्सिलच्या एका सभासदानें नाजसाठीं उलट निरोप दिला होता, " हें बघ, तुझ्या त्या प्रीमिअरला सांग कीं तुझ्या भाषणांत. विद्यार्थ्यांचा उल्लेख करावयास तूं विसरलास. आणि त्याला विचार कीं रशियन्स आमच्यावर विश्वास ठेवीत नाहींत, मग आम्हीं काय म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवावा ? "

नाजनें जनतेची घोर फसवणूक केली आहे, असें आम्हांला वाटतें.

सभेंत आम्ही एकमतानें ठरविलें कीं रशियन फौजा जर रात्रींत शहर सोडून गेल्या नाहींत, तर सकाळपासून पुन्हा नव्यानें युद्धास सुरुवात करायची.

सभेचा हा ठराव आम्ही नाजकडे तावडतोब रवाना केला. ' आणखी बारा तासांपेक्षां अधिक वेळ जर सोव्हिएट फौजा बुडापेस्टमध्यें राहणार असतील, तर आम्ही लगेच युद्धाचा पुकारा करणार आहोंत. केवळ एवढेंच करून आम्ही थांबणार नाहीं; तर लष्करांतील सैनिकांना आणि कारखान्यांतील कामगारांना स्वातंत्र्ययुद्धांत सहभागी होण्यास आम्ही सांगणार आहोंत. '

हा आमचा निश्चय म्हणजे मृत्यूस आमंत्रणच होतें. ह्या ठरावावर आम्हीं सह्या केल्या , त्याच वेळीं आम्हीं आमच्या मृत्युपत्रांवर सह्या केल्या.

आम्ही फार थकलों होतों. पण आतां विश्रांतीचा विचारसुद्धां कोणाच्या मनांत नव्हता. आम्ही घरीं गेलों, ते आमची युद्धसामग्री सज्ज करण्यासाठीं. होस्टेलमध्यें युद्धसामग्री अशी फारशी शिल्लक नव्हतीच. तेव्हां सेपेलची एखादी ट्रिप करावी किंवा काय, ह्याचा आम्ही विचार करीत होतों. पण तो विचार मनांतून काढून टाकावा लागला.

राजधानींतील स्वतंत्र रेडिओस्टेशन्सवरून रातोरात सर्वत्र युद्धाचे संदेश पाठविण्यांत आले. राष्ट्रव्यापी संपाचा आदेश सर्व कामगारांस देण्यांत आला. डोरोग, टाटा आणि पेक्स येथील खाणकामगारांनीं तर आधींच प्रतिज्ञा केली होती कीं, जोंपर्यंत रशियन फौजा हा देश सोडून जात नाहींत, तोंपर्यंत आम्ही खाणींतून कोळसा काढणार नाहीं.

तिकडे राज्यकर्त्यांनीं 'नॅशनल गार्ड' संघटित करण्याचा निर्णय घेतला होता. पण ह्या तथाकथित राष्ट्रदलाचें काम काय, तें समजेपर्यंत विद्यार्थ्यांनीं संघशः त्या संघटनेशीं संबंध ठेवूं नये, असें आम्हीं ठरविलें होतें. व्यक्तिशः कोणास हवें असल्यास त्यानें खुशाल 'नॅशनल गार्ड' मध्यें भरती होण्यास आमची हरकत नव्हती. 'एव्हीएच' चा तर आम्हींच निकाल लावला होता. पण आतां नाजच्या मंत्रिमंडळांत गृहखातें फेरेंक ननिचकडे सोपविण्यांत आलें होतें. ननिच फार जुना कम्युनिस्ट होता. १९३६ सालीं स्पेनमध्यें कम्युनिस्टांच्या बाजूनें तो लढला होता. तेव्हां ह्या संकल्पित पोलिसदलांतून अधिकाऱ्यांच्या अंगावर नवे गणवेश दिसले, तरी त्यांचें वर्तन जुनेंच असणार ह्याविषयीं आमची खात्री होती.

• • •

## ऑक्टोबर ३०, १९५६

**आज** हंगेरियन वैमानिक दलानें बुडापेस्टवर हजारों हस्तपत्रकांचा वर्षाव केला. रशियन रणगाडे जर तावडतोब शहर सोडणार नसतील, तर त्यांच्यावर विमानांतून बॉंबफेक करण्यांत येईल, अशा आशयाचीं तीं हस्तपत्रकें वाचून आम्हांला फार बरें वाटलें. आम्हीं दिलेली बारा तासांची मुदत लवकरच संपणार होती. तेव्हां लढाईसाठीं युद्धाची सर्व तयारी करणें भागच होतें. अवधि फारच थोडा होता. ह्या वेळीं आम्हांला सर्वांत अधिक जरुरी गॅसोलिनची होती. गॅस भरलेल्या बाटल्या रणगाड्यावर फेंकून मारल्या, तर काय होतें, तें आम्हांला अनुभवानें चांगलें कळून चुकलें होतें. गॅस गोळा करण्याच्या मोहिमेवर आम्ही निघालों. गांवांत गॅसस्टेशन्स पुष्कळ होतीं.

शेवटीं युद्धाची वेळ झाली. आणि शत्रूवर पहिला हल्ला चढविण्यासाठीं आम्ही सज्ज झालों.

आता रस्त्यावर पाऊल टाकण्याचा अवकाश कीं मृत्यु आमची वाट बघत होता. पण तरीसुद्धां कोणी मागें म्हटलें नाहींत.

पण काय आश्चर्य ? सोव्हिएट फौजा पुन्हा हळुहळू हलूं लागलेल्या

दिसल्या. अवजड रणगाड्यांची चाल सुरू होण्यापूर्वी त्यांच्या अजस्र चाकांचे दांते हळुहळू फिरावयास लागले. नाक्यानाक्यांवर मोक्याच्या ठिकाणीं सज्ज ठेवलेले रणगाडे एकाच दिशेनें चालावयास लागले. रणगाड्यांचा कर्णकटु आवाज आणि लष्करी शिस्तीत चालणाऱ्या फौजी शिपायांच्या पदाघातांचा आवाज एकमेकांत मिसळून गेले. परमेश्वराच्या कृपाप्रसादानें हें विलक्षण संगीत आम्हांला ऐकावयास मिळालें, असें त्या वेळीं आम्हांला वाटलें. अखेरचे रणगाडे शहराच्या सरहद्दीबाहेर जाण्यासाठीं घरंगळत निघाले, त्या वेळीं बुडापेस्टच्या चर्चेसमधून घंटा वाजावयास लागल्या. त्या घंटा केवळ रशियन फौजांस निरोप देत नव्हत्या, तर आणखी एका शुभवार्तेचें स्वागत करीत होत्या.

ही शुभवार्ता म्हणजे हंगेरीचा प्रायमेट जोसेफ कार्डिनल मिडझेंटीच्या मुक्ततेची. आतां प्रश्न असा होता कीं, तो बुडापेस्टमध्यें केव्हां प्रवेश करणार? त्याचें स्वागत करण्यासाठीं प्रत्येक जण उत्सुक होता.

**ना**जच्या कॅबिनेटमधील एक मंत्री झोल्टन टिल्डी ह्यानें स्टूडंट्स कौन्सिलकडे एक निरोप पाठविला होता. त्यानें विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींना प्रीमिअर नाजच्या ऑफिसमध्यें भेटीसाठीं बोलावलें होतें. 'नॅशनल गार्ड'च्या एका पलटणींत केवळ विद्यार्थी आणि युवक ह्यांची भरती करावी आणि सध्यांच्या असाधारण परिस्थितींत कांहीं खास कामगिरीसाठीं ह्या पलटणीचा उपयोग करावा, अशी एक टिल्डीची योजना होती. ह्या योजनेबाबत त्याला विद्यार्थ्यांशीं चर्चा करावयाची होती. टिल्डीचा निरोप आमच्या हातीं आल्यानंतर तासाभरानेंच रेडिओवरून त्यानें भाषण केलें. तें आम्हीं ऐकलें. सर्व देशांत शांतता प्रस्थापित करण्यासाठीं विद्यार्थ्यांनीं झटावें, असा त्याच्या भाषणाचा सूर होता.

आतां राजधानींतून रशियन फौजा निघून गेल्या होत्या. आणि आमच्याजवळ आमचीं शस्त्रास्त्रें अजूनपर्यंत सिद्ध होतीं. तेव्हां आज राजकीय वातावरण कसेंहि असलें तरी आमच्या देशाचें भवितव्य सुरक्षित करण्याची जबाबदारी आमचीच आहे, असें आम्ही समजत होतों.

मध्यंतरीं थंडीनें काकडलेले आणि उपासमारीनें खंगलेले बुडापेस्टचे लोक रस्त्यांरस्त्यांतून हिंडावयास लागले होते. निरुपयोगी होऊन पडलेल्या

सोव्हिएट युद्धसाहित्याचें निरीक्षण करीत फिरत होते. ठिकठिकाणीं सोव्हिएट रणगाड्यांचे भग्न अवशेष दिसत होते. त्यांतील कांहीं उपयुक्त भाग मिळाले तर ते शोधीत होते. लहानलहान मुलें मोडतोड होऊन पडलेल्या रणगाड्यांतून कांहीं एका विशिष्ट जातीच्या गोळ्यांचा शोध घेत होतीं. ह्या गोळ्यांच्या मोबदल्यांत अमेरिकन चॉकलेट किंवा सिगारेट पैदा करण्याची उमेद मनांत बाळगून त्यांनीं हा उद्योग चालविला होता.

टिल्डी-नाजची भेट घेण्यासाठीं स्टूडंट्स कौन्सिलनें चार प्रतिनिधींची निवड केली होती. हे चार प्रतिनिधि म्हणजे इंजिनिअरिंग युनिव्हर्सिटीचे बर्टालान आणि लेंग्येल, लॉ कॉलेजचा झाबो आणि व्हेटेरिनरी कॉलेजचा डोम.ते जो कोणता निर्णय घेतील त्याला पाठिंबा देण्याचें अभिवचन आम्हीं त्यांना दिलें होतें. मुलाखत संपवून परत आल्यावर हे सर्व जण आम्हांला भेटले आणि नाज–टिल्डीशीं झालेल्या मुलाखतीचा वृत्तान्त त्यांनीं सादर केला. सरकारचें मुख्य कर्तव्य म्हणजे स्वतंत्र निवडणुकीसाठीं योग्य तें वातावरण निर्माण करण्याचें आहे. त्यासाठीं एक तात्पुरती कमिटी तांतडीनें नेमून तिच्या हातीं देशांत शांतता प्रस्थापन करण्यासाठीं जरूर ते अधिकार सुपूर्द करण्याची त्यांची इच्छा दिसली.

पण देशांत शांतताप्रस्थापन करण्याच्या हेतूनें सरकार ज्या कांहीं योजना कार्यान्वित करणार होतें, त्या योजनांस क्रांतिकारक विद्यार्थ्यांचा पाठिंबा सरकारला हवा असेल, तर तसा प्रयत्न करण्यापूर्वीं हंगेरीच्या भूमीवरून सोव्हिएट फौजांचें आधीं उच्चाटन करावयास हवें, अशी आमची पहिली अट होती. तसें आमच्या प्रतिनिधींनीं टिल्डीला निक्षून बजावलें होतें.

कार्डिनल मिडझेंटीची सुटका झाली होती. तदनंतर कांहीं थोड्या तासांच्या अवधींत कार्डिनलच्या आध्यात्मिक नेतृत्वाखालीं हंगेरींतील ख्रिश्चन युवकांची पहिली संघटना निर्माण करण्यांत आली होती. नव्यानें स्थापन झालेल्या ह्या युवकसंघटनेचीं सूत्रें एगन डी. डालोंकी–पॅप ह्याच्या हातीं सोपविण्यांत आलीं होतीं. हा युवकनेता ह्या वेळपर्यंत दहा वर्षांची शिक्षा भोगीत तुरुंगांत खितपत पडलेलेला होता.दोन दिवसांपूर्वीच त्याची तुरुंगांतून सुटका करण्यांत आली होती. कार्डिनलचा तो विश्वासू सहकारी आणि मित्र होता. 'असोसिएशन ऑफ ख्रिश्चन यूथ' संस्थेचा नेता म्हणून त्याचेंच नांव

लगेच जाहीर करण्यांत आलें होतें. सरकारी रेडिओवरून ही नवी संस्था बुडा-पेस्टच्या जनतेस उद्देशून संदेश देत होती. आणि सर्व हंगेरिअन ख्रिश्चन्सनीं ह्या संघटनेचे सभासद व्हावें, म्हणून आवाहन करीत होती.

परंतु सोव्हिएट फौजा देशांतून अजूनपर्यंत निघून गेल्या नव्हत्या. देशाच्या सरहद्दीवर सोव्हिएट रणगाडे अजून ठाण मांडून होते. आणि नव्या सोव्हिएट फौजा हंगेरीच्या रोखानें वाटचाल करीत आहेत, अशा अफवा देशांत सर्वत्र पसरलेल्या होत्या.

ह्या सोव्हिएट फौजा रुमानिया आणि झेकोस्लोव्हाकिया ह्या देशांतून मार्गक्रमण करीत होत्या, असें लोक बोलत होते. बुडापेस्टपासून पूर्व सरहद्दी-पर्यंत जे रेल्वेकामगार काम करीत होते, त्यांनीं साटोराजौझेली येथें सोव्हिएट रणगाड्यांच्या रांगा हंगेरींत प्रवेश करतांना पाहिल्या होत्या.

शहरांत सर्वत्र एकच गोंधळ माजला होता. कारण लोकांना कांहींच निश्चित समजत नव्हतें. वातावरण संशयाचें आणि भयाचें होतें. हंगेरिअन सैन्याच्या तुकड्या शहरभर सर्वत्र गस्त घालीत फिरत होत्या.

कॅसल हिलवर जनरल कोव्हॅक्सकडे जाऊन त्याला आमच्या सर्व हालचालींची माहिती करून देणें आवश्यक होतें. त्या कामगिरीवर माझी नेमणूक करण्यांत आली होती. राष्ट्रीय सैन्याच्या कामांत सहकार्य देण्यासाठीं विद्यार्थ्यांची एक पलटण तयार करण्याचा सरकारनें जो निर्णय घेतला होता, त्या निर्णयाच्या कामीं कौन्सिलचे श्रम किती व कसे कारणीभूत होते, त्याची इत्थंभूत माहिती त्याला करून देणें जरुरीचें होतें.

मी कॅसल हिलवर गेलों. तेथें महाद्वारांतच पहारेकऱ्यांनीं मला रोखलें
" कुणाला भेटायचं आहे ? "

" जनरल कोव्हॅक्सला. "

" तो इथें नाहीं. कांहीं थोड्याच तासांपूर्वी नव्या सरकारनें त्याला लष्करांत एक मोठी मानाची जागा दिली आहे, हें तुला माहीत नाहीं काय ? त्याचं ऑफिस आतां पार्लमेंटच्या इमारतींत आहे. " – ही वार्ता ऐकून मी थक्कच झालों. परत गेल्यावर मला कळलें कीं, रेडिओवरून जनरल कोव्हॅक्सच्या नव्या नेमणुकीची वार्ता नुकतीच सांगण्यांत आली होती. लोकसत्ताक हंगेरीच्या संरक्षणसमितीचा जनरल कोव्हॅक्स आतां एक सभासद झाला होता !

पण ज्या वेळीं मॉस्को रेडिओवरून सोव्हिएट फौजा हंगेरींतून काढून घेण्यासंबंधीं सोव्हिएट सरकार विचार करीत आहे, असें वृत्त ध्वनिक्षेपित करण्यांत येत होतें, त्याच वेळीं सोव्हिएट रणगाडे राजधानीच्या परिसरांत गोळा झालेले आम्ही बघत होतों.

शेवटीं त्या भयंकर सत्याच्या जाणिवेनें आमचा थरकांप झाला. म्हणजे रशियन फौजा जात नव्हत्या तर !

ह्याच वेळीं सोव्हिएट जेट विमानें शहरावर घिरट्या घालीत असलेलीं आम्हीं पाहिलीं. आणि हळुहळू पडद्यामागें कसलें भयंकर राजकारण शिजत होतें, त्याचा एकदम बोध झाला.

आमच्या रेडिओजवळ आम्ही रात्रभर बसून होतों. स्वतंत्र रेडिओट्रान्समिटर्स व रेडिओ बुडापेस्ट ज्या नव्यानव्या वार्ता देत होते, त्या आम्ही कान देऊन ऐकत होतों. उत्तरेंत मिस्कोल्क म्हणून एक लष्करी ठाणें आहे. तेथून वार्ता मिळाली कीं, ७५० सोव्हिएट रणगाड्यांची पलटण डिओसुग्यॉर भागांत संचार करीत होती. ह्या पलटणींत सर्वात अवजड असे रणगाडे होते. जोसेफ स्टालिनच्या नांवानें ते प्रसिद्ध होते. मी जें कांहीं लष्करी ज्ञान पैदा केलें होतें, त्याच्या बळावर ह्या वार्तेचा अर्थ मीं बरोबर लावला. हल्ला करण्यासाठीं ही सर्व तयारी चालली होती. हे राक्षसी रणगाडे केवळ युद्धप्रसंगींच रणांगणावर उपयोगांत आणीत असत. किरकोळ दंडाळी मोडून जुजबी शांतता प्रस्थापित करावयाची असेल, तर त्यासाठीं छोटे रणगाडे पुरे पडत.

जोसेफ स्टालिन रणगाडे ! — तोच एक विचार माझ्या मनांत एकसारखा घोळत होता. — कांहीं तरी भयंकर घडणार आहे.

घरीं गेलों तर ईव्हा माझी समजूत काढावयास लागली.— "रेडिओवर ज्या वातम्या सांगतात, त्या सर्व खऱ्या थोड्याच असतात ?" ती म्हणाली, "तुझं आपलं सदा असंच. सदांची निराशा, म्हणजे काय ?" — ती हें मला सांगत होती. पण तिच्याच आवाजांत कातरता होती !

● ● ●

## ऑक्टोबर ३१, १९५६

**पहाटेचे** पांच वाजेपर्यंत कसेंबसें मी अंथरुण धरून होतों. तसें पडून राहणें केवळ असह्य होतें. सबंध रात्रींत एक क्षणभरसुद्धां माझा डोळा लागला नव्हता. पांच वाजतां मी उठलों आणि सरळ चालावयास लागलों. रेडिओ ट्रान्समिटर गांठण्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

बाहेर चंद्राकडे माझी नजर वळली. तो निस्तेज आणि फिकट चंद्र हंगेरीच्या भवितव्यासारखाच उदासवाणा दिसत होता.पहाटेच्या त्या शांत प्रहरीं मी एका बाकावर बसलों आणि दोन्ही हातांत डोकें घट्ट दाबून धरलें. मोझक्वा स्क्वेअरमध्यें सगळीकडे उजाड स्तब्धता होती. मध्येंच कोठून तरी मला पायरव ऐकू आला. मशीनगन मीं घरींच ठेवली होती. ती बरोबर घ्यावयास हवी होती, असें आतां वाटलें. मी दचकून बघूं लागलों. तेवढ्यांत माझ्या पायांना कसला तरी गरम स्पर्श झाला. मी खालीं वाकून पाहिलें, तर एक छोटा, भुकेला कुत्रा माझ्या पायांवर आपलें केसाळ अंग घाशीत होता मान वर करून पाहिलें, तर त्या कुत्र्याचा मालक समोर उभा असलेला दिसला. माणूस म्हातारा होता. त्याची दाढी पांढरीशुभ्र होती. त्याच्याकडे बघतांक्षणीं तो शिकलापढलेला असावा, हें माझ्या ध्यानांत आलें.

" प्रभूचें स्वागत असो." तो म्हणाला. ह्या वेळीं मी तेथें काय करीत आहें, म्हणून त्यानें मला विचारलें. मीं माझ्या मनांतील शंका व भीति त्याला बोलून दाखविली. गेल्या कित्येक दिवसांत कोणाशीं मोकळेपणानें बोलण्याची मला चोरी झाली होती. कोणावर विश्वास टाकण्याचे ते दिवस नव्हते. आणि परक्या माणसाशीं बोलणें म्हणजे मरणाला निमंत्रण देण्यासारखेंच होतें. आणि तरीसुद्धां जन्मांत कधीं न पाहिलेल्या ह्या माणसाशीं मी खुशाल बोलत होतों. त्याला आपलें दु:ख समजेल, असें मला वाटलें. माझी गोष्ट सांगून झाल्यावर तो स्वत:विषयीं थोडेंसें बोलला.

तो कॅथॉलिक प्रीस्ट होता.तीस वर्षे एका लहानशा चर्चची सेवा करण्यांत त्यानें काढलीं होतीं. नंतर कम्युनिस्टांनीं त्याचें तें चिमुकलें वतन हिसकावून घेतलें होतें.

१९४९ सालीं त्याचें वतन गेलें. त्या चर्चच्या एका सभासदानें वेळींच

त्याला पूर्वसूचना देऊन सावध केलें होतें, म्हणून त्याचा तुरुंगवास टळला होता. पूर्वायुष्यांत कुत्रीं पाळण्याचा त्याला छंद होता. त्या छंदाचेंच धंद्यांत रूपांतर झालें होतें.

" पण आज मात्र मी खराखुरा प्रीस्ट आहें असें मला वाटत आहे. गेले कांहीं दिवस मी रस्त्यांतून फिरतों आहें. शक्य तेथें हुतात्म्यांचे अंत्यसंस्कार करतों आहें. आतां तरी निदान ह्या स्वतंत्र देशांत पुन्हा एकदां मी प्रीस्ट होऊं शकेन अशी आशा मी मनांत बाळगून आहें. "

कार्डिनल मिंडझेंटी आजच गांवांत येणार असल्याची वार्ता त्यानें मला दिली. " कार्डिनलचें स्वागत करण्यासाठीं जातों आहे मी. माझ्याबरोबर येतोस काय ? " त्यानें मला विचारलें,

मी प्रॉटेस्टंट आहें. पण तरीसुद्धां कार्डिनलसारखा महात्मा घरीं परत येतो आहे, तर त्याचें स्वागत करण्यासाठीं आपण जावें, असें मला मनापासून वाटलें.

**मी** घरीं परत आलों, तर एक महत्त्वाचा निरोप माझी वाट बघत होता. हंगेरींत अनेक युवकसंघटना होत्या. त्या सर्वांची मिळून ' हंगेरिअन रेव्होल्युशनरी यूथ कमिटी ' नव्यानेंच स्थापन करण्यांत आली होती. ह्या कमिटीवर काम करण्यासाठीं आपला प्रतिनिधि म्हणून कौन्सिलनें माझी निवड केली होती.

मी फोनवर बर्टालानशीं बोलत होतों. " अरे, कसल्या सभा घेऊन बसलास ? मला आतां सभांचा अगदीं कंटाळा आला बघ. आतां ही कमिटी आणखी काय करणार आहे ?"

" पण प्रीमिअर नाजला एक अखेरचा इशारा आम्ही देणार आहोंत " — बर्टालान म्हणाला, " डिसेंबरच्या ३१ तारखेपर्यंत सोव्हिएट फौजा हंगेरींतून कायमच्या निघून गेल्या नाहींत, तर हंगेरीचे तरुण पुन्हा हातांत शस्त्र घेतील आणि स्वातंत्र्य मिळेपर्यंत उचललेलं शस्त्र खालीं ठेवणार नाहींत. आमचा हा निर्वाणीचा इशारा नाजच्या कानांवर घालावयाचा आहे. तुला दुसरं कांहीं काम असेल, तर तुझ्याऐवजीं दुसऱ्या कोणाला मी पाठवीन. "

खरोखरच मला दुसरें कांहीं काम होतें, म्हणून बर्टालानला तसें सांगून ह्या एका सभेपुरती मीं माझी सुटका करून घेतली.

आमच्या होस्टेलमधील विद्यार्थ्यांना मीं एकत्र गोळा केलें. – " चला रे, आज कार्डिनल येणार आहे. त्याचं स्वागत करण्यासाठीं आपण जाऊं या. मी जातों आहें. तुमच्यापैकीं कोणी येणार काय ? ' –मीं त्यांना विचारलें.

मुलांचीं मनें वळविण्यास मला मुळींच त्रास पडला नाहीं. कारण कार्डिनल मिंडझेंटी हा हंगेरीच्या महान् नेत्यांपैकीं एक होता. किंबहुना हा एकच एक माणूस असा होता कीं संशयाच्या आणि शोकाच्या ह्या निराश वातावरणांत त्याच्याविषयीं सर्व लोकांच्या मनांत आदरभाव होता.

कार्डिनलच्या घराचा रस्ता लोकांनीं फुलून गेला होता. आमच्या-सारखींच असंख्य माणसें तेथें भक्तिभावानें गोळा झालीं होतीं. दीर्घकाळाच्या तुरुंगवासांतून लोकांच्या ह्या थोर आध्यात्मिक नेत्याची मुक्तता झालेली होती आणि लोक त्याचें स्वागत करण्यास उत्सुक होते. युरि स्ट्रीटवरील चार नंबरच्या घराजवळ उभा राहून मीं भोंवतालीं उसळणाऱ्या लोकांच्या गर्दीकडे नजर टाकली.

ठीक सात वाजतां माथिआस चर्चमधील घंटा वाजावयास लागल्या. माथिआस चर्चची वास्तु सात शतकांची जुनी पुराणी आहे. येथेंच पिढ्यान्-पिढ्या हंगेरिअन राजास राज्याभिषेक करण्यांत आलेला होता. देशाच्या खऱ्या नेत्याचें आगमन त्या घंटानादानें जाहीर केलें. तेथें जमलेल्या लोकांनीं टाळ्या वाजवून जयजयकार केला. कांहीं क्षणांनंतर मोटरींचा आवाज आमच्या कानांवर आला. राखी रंगाच्या एका आर्मी कारवर लोक फुलें उधळीत होते. गाडी जवळ आली, तेव्हां गाडींतील ड्रायव्हरला मीं लगेच ओळखलें. लष्करी शाळेंत माझ्याबरोबर तीन वर्षें त्यानें काढली होतीं. लेफ्टनंट व्हाज्डे माझा चांगला ओळखीचा होता. कारमध्यें मागच्या बाजूला एक निस्तेज, कृश माणूस बसलेला होता. त्याच्या डोळ्यांत मात्र अंगार फुललेला दिसत होता. हाच कार्डिनल मिंडझेंटी.

कार्डिनल गाडींतून खालीं उतरला, तेव्हां लोकांनीं त्याच्याभोवतीं एकच गर्दी करून सोडली. शेवटीं सोल्जर्सना मध्यें पडून लोकांना आवरून मागें हटवावें लागलें. कार्डिनलच्या अंगठीचें चुंबन घेण्यासाठीं जे लोक पुढें धांवले, त्यांच्यांत माझा वृद्ध मित्र होता.

थोड्या वेळानें कार्डिनल घराच्या सज्जांत येऊन उभा राहिला. त्यानें

लोकांकडे पाहून क्षीण स्मित केलें, हात उंचावले आणि लोकांना शुभाशीर्वाद दिले.

गर्दीतून वाट काढीत मी अंगणांत घुसलों, तेथें माझा जुना दोस्त लेफ्टनंट व्हाज्डे मला दिसला. कार्डिनल मिडझेंटीची सुटका करण्यासाठी फेल्सोपेटानीला जे आठ सैनिक पाठविण्यांत आले होते, त्यांच्यापैकीं तो एक होता. त्यानें एक आश्चर्यकारक वार्ता सांगितली. त्यांच्या पाठोपाठ रशियन सैनिक तेथें गेले होते. – कार्डिनलला 'सुरक्षित' स्थळीं घेऊन जाण्यासाठीं.

त्याच्या हातांत कार्डिनलनें लिहून दिलेलें एक शिफारसपत्र होतें. तें त्यानें मला मोठ्या अभिमानानें दाखविलें. एका कागदाच्या कपट्यावर त्या महान् धर्मनेत्याने चार ओळी घाईत लिहून दिल्या होत्या. त्या थोर राजवंद्यानें कृतज्ञतापूर्वक जें लिहून दिलें, तें अभिमानपूर्वक सैनिकांनीं जतन करून ठेवावें, अशाच योग्यतेचें होतें.

माझ्याबरोबर माझे मित्र पण ह्या वेळपर्यंत अंगणांत गोळा झाले होते. आम्हीं सर्वांनीं व्हाज्डेला गराडा घातला होता. त्याच्याकडून आम्हांला पुष्कळ महत्त्वाची बातमी मिळाली. त्यानें सांगितलें कीं रशियन फौजांनीं आपले सर्व रणगाडे शहराच्या सरहद्दीवरच रोखून ठेवले आहेत. फौजा तेथेंच आहेत. आणि रणगाडे तेथून हलविण्याचा त्यांचा विचार दिसत नाहीं.

तेथें जमलेलीं बायकामुलें रणगाड्यांवर सडका भाजीपाला आणि नासकीं अंडीं फेंकून मारीत होतीं, आणि ओरडत होतीं:– "अरे डुकरांनो! येथून जातां कीं नाहीं?" – पण तरीसुद्धां सोव्हिएट सैनिक स्वस्थ बसून होते. लोकांवर हात उगारीत नव्हते. तेथें जमलेल्या लोकांच्या शक्तीची त्यांना भीति वाटत होती.

ह्या वेळपर्यंत कार्डिनल मिडझेंटी खालीं आला होता. आणि लोकांनीं भरलेल्या अंगणांत मधोमध उभा राहून बुडापेस्टमधील 'स्वतंत्र' वृत्तपत्रांच्या वातमीदारांना आपली पहिली मुलाखत देत होता.

घरीं परत जात असतांना वाटेत आम्ही नव्यानें प्राप्त झालेल्या परिस्थितीसंबंधीं बोलत होतों. होस्टेलमधील माझे मित्र माझ्याप्रमाणेंच चिताक्रान्त झाले होते. आतां एक गोष्ट आम्हांला सर्वांना पुरेपूर कळून चुकली होती. पश्चिमेंतील राष्ट्रांकडून ह्या आणीबाणीच्या वेळीं जर मदत मिळू

शकली नाहीं, तर आमचें पुढील भवितव्य आम्हांला स्पष्ट दिसत होतें. मरण किंवा सैबेरियांत जन्मठेप–हद्दपारी खरें म्हणजे, बंडाच्या पहिल्या दिवसापासून आम्हांला पश्चिमेकडून मदत मिळेल, अशी आमच्या मनांत फार मोठी आशा होती. पण आतां सारें चित्र स्पष्ट झालें होतें. सर्वच विद्यार्थी आणि त्यांतल्यात्यांत कौन्सिलचे एकूणएक सर्व सभासद 'एव्हीएच्' अधिकाऱ्यांच्या काळ्या यादींत नोंदलेले होते.

ज्या शहरांतून लोकशाही दहा वर्षांपासून हद्दपार झालेली होती, त्याच शहरांतील लोकशाहीच्या खुल्या वातावरणांत स्वैर फिरण्यांत एक विशेष आनंद होता. त्या अद्भुत आनंदाचे चार दिवस आम्हीं भोगले, म्हणून आम्हांला धन्य वाटत होतें. आतांसुद्धां शहरांत लोकशाहीचेंच राज्य होतें. पण बुडाच्या पलीकडील टेकड्यांकडे आमची नजर वळली कीं मन अस्वस्थ होत होतें. येथें क्षणकाल उल्हास होता. पण तेथें ? – तो विचार मनांत येतांक्षणीं गुदमरल्यासारखें वाटत होतें.

युनिव्हर्सिटी प्रेसजवळ आम्ही आलों, तेव्हां आमच्यापैकीं एका विद्यार्थ्याला आमच्या वृत्तपत्राचा ताजा अंक बघण्याची लहर आली. आमच्या पत्राचें नांव होतें : 'एग्येटेमि इफजुसाग' ( विद्यापीठांतील तरुण ). खरें म्हणजे आमच्या कौन्सिलचें हें मुखपत्र. पण आजवर आम्ही आमच्या कामांत इतकें गढून गेलों होतों कीं, मधल्या काळांत कांहीं वाचण्याची कल्पनासुद्धां आमच्यापैकीं कोणाच्या मनाला शिवली नव्हती.

तें पत्र आम्ही आमच्या हातीं घेतलें. आणि क्रांतीविषयीं विद्यार्थ्यांच्या भावना काय आहेत, तें समजून घेण्याचा यत्न केला. विद्यार्थ्यांनीं जें कांहीं लिहिलें होतें, तें वाचून आम्हांला एकदम हंगेरिअन भाषेच्या सौंदर्याची व सामर्थ्याची जाणीव झाली. टारोगेट नांवाचें एक प्राचीन हंगेरिअन वाद्य आहे. ह्या वाद्याच्या साथीवर प्रतिभाशाली शाहीर महान् पराक्रमाची, अनावर दुःखशोकाचीं, उदात्त भावनेचीं गाणीं म्हणत असत. विद्यार्थ्यांचे ते लेख वाचीत असतांना टारोगेट वाद्याच्या साथीवर टिपेच्या स्वरांत कोणी शाहीर उन्मत्त गाणीं म्हणत आहे, असा आम्हांला भास झाला.

एका लेखांत लिहिलें होतें :

'आतां आमचा हंगेरी देश स्वायत्त आहे, स्वतंत्र आहे. आतां आमचें परराष्ट्रीय धोरण सर्वस्वी स्वतंत्र असावयास हवें. आजवर आमच्या मानेवर असंख्य जोखडें होतीं. आतां आमचे आम्ही स्वतंत्र आहोंत. लोक आतां आपल्याला हवें तसें सरकार निवडून घेतील. पण ह्यापुढें आमच्या स्वातंत्र्याचा सौदा होऊं शकणार नाहीं. हुतात्म्यांच्या रक्तानें रंगलेलें आमचें हें स्वातंत्र्य आम्ही कोणाला विकणार नाहीं. पश्चिमेकडील बड्या राष्ट्रांच्या मैत्रीची व मदतीची आम्हांला अत्यंत जरूर आहे. ह्या राष्ट्रांनीं एक आंतरराष्ट्रीय परिषद् बोलवावी व ह्या परिषदेंत हंगेरीच्या तटस्थपणाची ग्वाही व हमी द्यावी. स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रिया ह्या देशांच्या धर्तीवर हंगेरींत स्वतंत्र लोकशाही सरकारची स्थापना व्हावी, अशी आमची मागणी आहे. ' . . .

हा लेख आम्हीं वाचला, तेव्हां त्यांतील समंजस शहाणपणाचीं विधानें वाचून आम्हांला असें वाटलें कीं आमचें मनोगतच त्या लेखांत व्यक्त झालें आहे. खरोखर, असेंच घडावयास हवें होतें, अशी आमची मनोमन अपेक्षा होती. पण दुर्दैवानें तसें घडत नव्हतें.

घरीं गेलों तर पाणावलेल्या डोळ्यांनीं माझी वायको माझी वाट बघत होती. तिला आपल्या आईबापांची काळजी लागून राहिली होती. त्यामुळें ती अस्वस्थ झाली होती. — " रशियन्स परत येणार असतील, तर माझे आईबाप फिरून कधीं माझ्या दृष्टीस पडण्याची आशाच नाहीं. लोक म्हणतात कीं, रशियन रणगाड्यांनीं सर्व बाजूंनीं शहराला वेढा दिला आहे. ते हल्ला करणार आहेत. लाझलो, प्रत्येकाचें तेंच म्हणणें आहे. शत्रु हल्ला करणार."

बंडाच्या पहिल्या दिवसांत मीं माझ्या बायकोचा कधीं फारसा विचारच केला नव्हता. तिच्याकडे पुरेसें लक्ष देण्याची — इच्छा असूनसुद्धां मला कधीं सवडच झाली नाहीं. आतां मात्र तिनें जें कांहीं सांगितलें, त्यांत बरेंच तथ्य आहे, असें मला वाटलें. आतां एक तासापूर्वी ' नॅशनल गार्ड ' मध्यें सामील होण्याचा विचार माझ्या मनांत आला होता. शहरांत सगळीकडे नव्यानव्या युवकसंघटना कावळ्याच्या छत्र्यांसारख्या अचानक उपटल्या होत्या. त्या सर्वांना एका सूत्रांत बांधण्याची जरुरी होती. आणि तें काम आधीं हातांत घेण्याचा मीं निश्चय केला होता. आणि आतां माझी बायको मला सांगत होती कीं माझ्या आईबापांकडे मला घेऊन जा म्हणून.

अनुक्र. २५४६८ वि: ...
क्रमांक ८६३ नों: दिं: १२-२-५९


दुपारीं कांहीं पाहुणे मला भेटण्यासाठीं आले. बंडाच्या पहिल्या दिवसांत आम्ही दोन विद्यार्थ्यांना ग्यॉर विभागांत पाठविलें होतें. पश्चिमेकडील स्वतंत्र ट्रान्स-डॅन्यूब प्रांतांतील विद्यार्थ्यांशीं संबंध जोडण्यासाठीं आम्हीं त्यांची रवानगी केली होती. ते आज परत येऊन थडकले होते.

त्यांनीं आम्हांला ताबडतोब बुडापेस्ट सोडून जाण्याचा सल्ला दिला. ते नुकतेच सरहद्दीच्या प्रदेशांत जाऊन आले होते. त्यांनीं सांगितलें कीं, दररोज हजारों माणसें सरहद्द ओलांडून ऑस्ट्रियाच्या आश्रयास पळून जात आहेत.

तिकडे सरहद्दीवर त्यांना जी बातमी मिळाली होती, ती अत्यंत निराशा-जनक होती. 'नाटो' संघटनेंतील राष्ट्रें आमच्या मदतीस धांवून येतील, हा आमचा भ्रम होता. ते देश आमच्यासाठीं कांहींच करूं शकत नव्हते. पण हें असें कां व्हावें, हें कोडें मात्र कोणासच उलगडत नव्हतें.

होस्टेलमधील आमच्या लहानशा खोलींत बसून किती तरी वेळ ते आमच्याशीं बातचीत करीत होते. आम्हांला तर वाटलें कीं, कित्येक तास ते आमच्याशीं बोलत बसले होते. त्यांनी दिलेली एक बातमी मात्र विचार करण्यासारखी होती. स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या सैनिकांनीं सरहद्द मात्र बऱ्याच ठिकाणीं ताब्यांत घेतली होती. आणि त्यामुळें पश्चिमेकडील वाटा सुरक्षित आणि मोकळ्या झाल्या होत्या. ते जें कांहीं बोलत होते, तें सर्व ईव्हा मन लावून ऐकत होती. आणि क्षणाक्षणाला तिच्या मनांतील निराशा वाढत होती.

त्यानंतर मीं माझ्या सर्व सहकाऱ्यांना निरोप पाठविले. कोणाला तोंडीं कळविलें, कोणाकडे चिठ्ठ्या रवाना केल्या, कोणाला फोनवर गांठलें. त्या सर्वांना संध्याकाळीं सहा वाजतां तांतडीच्या सभेसाठीं मीं बोलावणें पाठविलें.

एका मागून एक सर्व मुलें सभेच्या ठिकाणीं गोळा झालीं. पूर्वी आम्ही एकूण ८० होतों. त्यांजपैकीं ४७ ह्या सभेला उपस्थित होते. सर्व जण थकल्या-सारखे दिसत होते. सर्वांचे चेहेरे उदासवाणे, निराशेनें काळवंडलेले, मलूल दिसत होते. त्यांच्यापैकीं प्रत्येकाच्या मनांत जो संघर्ष होता, तोच माझ्याहि मनांत होता. मला भेटण्यासाठीं जे दोन विद्यार्थी दुपारीं आले होते, त्यांच्या मनांतदेखील तोच संघर्ष होता.

तेथें जे विद्यार्थी जमले होते, त्यांच्यापैकीं एक जण नुकताच कौन्सिलची बैठक सोडून आला होता. कौन्सिलनें पुन्हा एकदां लढ्याचा निर्णय घेतला होता. प्रत्येक विद्यार्थ्यानें पुन्हा हातीं शस्त्र घ्यावें आणि उद्यां दुपारीं आप-आपल्या युद्धाच्या ठिकाणीं तयारीनें न चुकतां हजर व्हावें, असा सर्व विद्यार्थ्यांस कौन्सिलनें आदेश दिला होता. कौन्सिलनें मंजूर केलेला एक ठराव असा होता : 'देशाचें आजचें नेतृत्व केवळ तात्पुरतें आहे, असें आम्ही मानतों. ज्या प्रमाणांत नाजचें सरकार आमच्या मागण्यांना पाठिंबा देईल, त्याच प्रमाणांत आम्ही नाज सरकारला पाठिंबा देऊं.'

नंतर ग्यॉरहून आलेल्या विद्यार्थ्यांनीं आपली कहाणी सांगितली. दुपारीं माझ्या खोलींत त्यांनीं जें कांहीं सांगितलें होतें, तेंच पुन्हा एकदां त्यांनीं ह्या बैठकींत थोडक्यांत सांगितलें. त्यांना कोणीं कांहीं प्रश्न विचारले, त्यांचीं उत्तरें त्यांनीं मोकळेपणानें दिलीं. ह्या वेळपर्यंत एकूण परिस्थितीचें चित्र प्रत्येकाच्या डोळ्यांसमोर स्पष्ट झालें होतें.

स्टूडंट्स कौन्सिलमधील माझ्या एका मित्रानें प्रथम आणि मागाहून विद्यार्थीमित्रांना एक महत्त्वाचा प्रश्न स्वतःस विचारून बघण्यास सांगितलें : "माझ्या देशाची सेवा मीं कोणत्या रीतीनें केली असतां अधिक परिणामकारक ठरेल ? डोळ्यांसमोर दोन मार्ग आहेत. एक म्हणजे घरीच राहून लढा आणखी प्रखर करावयाचा; किंवा तात्पुरतं देशांतर करून हंगेरीच्या सरहद्दी-बाहेर काम करावयाचं आणि परदेशांत मायदेशासाठी मदत संघटित करावयाची."

नंतर आम्हीं हा प्रश्न मतास टाकला : 'आम्ही राहणार कीं जाणार ?'

एकूण ४७ सभासद हजर होते. त्यांजपैकीं ३० जणांनीं बुडापेस्टमध्यें राहण्याचा निर्णय घेतला. अकरा जण म्हणाले कीं संधि उपलब्ध आहे तोंपर्यंत आपण देश सोडून बाहेर जाणार. सहा जणांचा निर्णय अजून ठरावयाचा होता. ईव्हाचा प्रश्न नसता, तर मीसुद्धां एका क्षणाचा विलंब न लावतां तात्काळ सांगितलें असतें, 'होय. मी राहणार आणि लढणार.'

• • •

## *नोव्हेंबर १, १९५६*

**पण** असा कोणताहि निर्णय एकाएकीं ठरविणें सोपें नव्हतें. रात्रीच्या शांत वेळीं घेतलेला निर्णय पक्का करण्यास अवधि मिळतो. किंवा एकदां घेतलेला निर्णय मोडून काढण्याची तयारी मन करतें, तें सुद्धां रात्रींतच. रात्रीं माझ्या मनांत असेंच तुंबळ युद्ध माजलें होतें. माझ्या अंतःकरणाला विचारलें असतें, तर त्यानें अविलंब येथेंच राहण्याचा निर्णय जाहीर करून टाकला असता. तें मला माहीत होतें. पण त्याच वेळीं मी माझ्या मनाला शांतपणें कौल लावीत होतों.

आमचें भवितव्य काय, तें डोळ्यांसमोर स्वच्छ दिसत होतें. संरक्षणास असमर्थ अशा ह्या राजधानीचा कबजा एकदां घेतला कीं, लगेच कम्युनिस्ट, युनिव्हर्सिटीचे पुढारी वेंचून, ठेंचून, काढावयाच्या उद्योगास लागले असते. आधीं शहराचा विध्वंस पुरतेपणीं केल्यानंतर देशभक्तांकडे त्यांची नजर वळण्यास कितीसा वेळ लागणार होता ? माझ्या मनःश्चक्षूंसमोर योद्ध्यांच्या रांगा कूच करीत मरणाच्या वाटेनें चाललेल्या मला दिसत होत्या.

पण मग ईव्हाचें काय ? आमच्या मुलाचें काय ? गुलामांच्या छावणींत प्रसववेदनांनीं विव्हळ झालेली ईव्हा माझ्या डोळ्यांसमोरून कांहीं केल्या हलत नव्हती. गरोदर स्त्रियांच्या संबंधांत सोव्हिएट सैनिकांच्या मनांत करुणेचा लवलेशदेखील नव्हता. बायका म्हणजे बायका. कैद्यांच्या छावणींत त्यांच्यापैकीं कांहीं गरोदर असल्या काय किंवा नसल्या काय, त्या सैतानांच्या लेखीं सर्व स्त्रिया सारख्याच होत्या.

'स्टूडंट्स रेव्होल्युशनरी कौन्सिल'च्या एका सभासदाची बायको असण्याचें पाप तिनें केल्यामुळें दीर्घ कालावधीच्या तुरुंगवासाची शिक्षा तिला भोगावी लागणार, हें भवितव्य केवळ अटळ होतें.

परस्पर विरोधी विचारांनीं माझ्या मनांत एकच गर्दी केली होती. विचारांचा गुंता सोडविण्याच्या कामीं माझें मन हैराण झालें होतें. बिछान्यावर पडल्यापडल्या विचारांच्या रणधुमाळींत गढलेलें माझें मन मनस्वी अस्वस्थ झालें होतें. माझें अंग काल्याग्रमाखें थंडगार पडलें होतें. पण विचारांच्या

झटापटींत मला घाम फुटला होता. अशा स्थितींत माझ्या संत्रस्त मनांत आशेचा एक चमकदार किरण घुसला.

हंगेरीला जीवंत असलेल्या माणसांची अधिक गरज होती. – जीवंत माणसांची !

माझ्या मनांत हे असले विचार मी घोळवीत होतों, त्या वेळीं ईव्हा माझ्याजवळ स्वस्थ झोंपली होती. माझा निर्णय ठरल्यावर मीं तिच्या अंगाला हात लावून तिला जागें केलें.

"ऊठ, लाडके, जागी हो." मी म्हणालों, "आपल्याला इथून जाणं भाग आहे ! बुडापेस्ट सोडून आपण जाणार आहोंत ! तुझ्या आई-बापांची भेट घेणार आहोंत ! चल ऊठ. तयारी कर."

माझा हात अंगाला लागतांच ती एकदम दचकून जागी झाली. सभा संपवून मी केव्हां परत आलों, त्याचासुद्धां तिला पत्ता नव्हता. आम्ही सर्व जण कोणत्या गोष्टींचा विचार करीत होतों, ह्याचीदेखील त्या बिचारीला कल्पना नव्हती. मीं तिला झोंपेंतून उठविलें, त्याचेंच तिला भय वाटलें होतें. – "काय झालं, लाझलो ?" तिनें विचारलें, "अरे, तूं असा ओरडतो आहेस, तो काय म्हणून ?"

मी मोठ्यानें बोलत होतों, त्याचीसुद्धां मला कल्पना नव्हती. तिनें एकदा छेडल्यावर मी तिच्याशीं गोडीनें हळुहळू बोलावयास लागलों. घर सोडून गेल्यावर मध्यंतरीं जें काय घडलें होतें, त्याची इत्थंभूत वार्ता मीं तिच्या कानांवर घातली. प्रश्न काय होता, मतें कशीं पडलीं, माझ्या मनांतील सर्व संशय, शंका, भय, सारें कांहीं तिला सांगून टाकलें.

नंतर एकमेकांच्या मिठींत आम्ही गुंतलों आणि लहान मुलांसारखे रडावयास लागलों.

**ज्या** बुडापेस्टवर आम्हीं प्राणांतिक प्रेम केलें होतें, तें हें सुंदर शहर सोडून जाण्याचा प्रसंग येऊन ठेपला होता. ह्याच राजधानीच्या शहरांत लहानपणीं अत्यंत सुखाचे दिवस आम्हीं काढले होते. येथेंच आम्ही लिहिण्या-वाचण्यास शिकलों होतों. येथेंच एका चर्चमध्यें देवाची प्रार्थना कशी करावी, त्याचे धडे घेतले होते. विद्यार्थीदशेंत सुखदुःखाचे अनेक प्रसंग येथेंच भोगले होते. ह्याच शहरासाठीं आम्हीं खस्ता काढल्या होत्या. पण तरीसुद्धां अधिक

सुखाच्या काळांत जेथें आमचे वाडवडील राहिले होते, तेथेंच ह्या सुंदर शहरांत आम्हीं आमचीं मुलेंबाळें वाढविण्याचे मनसुबे रचले होते. कदाचित् आमच्या मुलाबाळांच्या नशिबांत आमचीं दुःखें भोगण्याचें भागधेय लिहिलें असण्याचा संभव आहे, असें आम्हांला वाटत होतें.

**बा**हेर फटफटलें होतें. दिशा उजळल्या होत्या. पहाटे सहाचा सुमार होता. आज ऑल सोल्स डे. मोझार्टच्या ' रिक्वीम 'चे शांत,मधुर स्वर वातावरणांत निनादत होते. स्वातंत्र्ययुद्धांत ज्यांना सद्गति लाभली होती, त्यांच्या स्मरणार्थ चर्चमधून म्हटल्या गेलेल्या प्रार्थनांचे सुगंधित सूर हवेंत सर्वत्र दरवळत होते.

वेळ मोठी प्रसन्न होती. ह्याच वेळीं होस्टेलमधील मित्रांनीं बातमी आणली कीं, सोव्हिएट फौजा सर्व दिशांनीं बुडापेस्टच्या रोखानें चाल करून येत होत्या. पोलादाच्या मगरमिठींत राजधानी चिरडून टाकण्यासाठीं. आतां प्रत्येक क्षण मोलाचा होता. किती तरी महत्त्वाचीं कामें भराभर उरकून टाकावयास हवीं होतीं. साक्षात् काळाच्या विरुद्ध आमची शर्यत लागली होती. आमचा चिमुकला रेडिओ आमच्या खोलींतील रुपेरी केसांच्या वृद्ध स्त्रियांना आम्हीं देऊन टाकला. अनेक मित्रांकडून गोळा करून आणलेल्या कांहीं थोड्या वस्तु मीं आणि ईव्हानें भराभर एकत्र गोळा केल्या आणि नंतर ह्या इमारतींत राहणाऱ्या निकटवर्ती मित्रांचा निरोप घेण्याच्या कामास लागलों. होस्टेलमध्यें कित्येक जखमी विद्यार्थी होते. गेल्या कांहीं दिवसांच्या अल्पावधींत त्यांनीं आम्हांला आपलेंसें केलें होतें. एकदम अशा रीतीनें त्यांचा लळा तोडून जाण्याचें आमच्या जीवावर आलें होतें.

" संभव आहे कीं योग्य तेंच तुम्ही करीत आहांत." बर्टोलान म्हणाला, " पण लाझलो, तूं तिकडे कुठें गेलास, तरी तिथूनसुद्धां ही लढाई तुला चालवावीच लागेल. – जाशील तिथें हंगेरीसाठीं मित्र गोळा करून."

त्याच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. रुद्ध कंठानें तो म्हणाला, " लढाई संपल्यावर तूं परत ये, लाझलो. आणि हें बघ, तिकडे अमेरिकन सिगारेट्स ओढशील, तेव्हां आमची आठवण ठेव. देव तुझें रक्षण करो ! "

बिचारा लालि बर्टोलान. संभव आहे कीं योग्य तेंच त्यानें केलें. ह्यापुढें त्याची माझी कधींच गांठभेट होणार नाहीं, हें मला माहीत आहे.

मोझ्क्वा स्क्वेअरमध्यें इतर सर्व जण भेटले. तेथून आम्ही पार्कमध्यें जाण्यासाठीं निघालों. आणखी कांहीं क्षण एकमेकांच्या संगतींत काढण्याची इच्छा होती. इच्छा पुष्कळ होती, पण वेळ नव्हता. ज्या आमच्या शूर मित्रांना आम्ही मूठमाती दिली होती, त्यांच्या थडग्यांजवळ उभे राहून आम्हीं सर्वांनीं मूक प्रार्थना केली.

जेव्हां आम्ही पार्कच्या दिशेनें निघालों, तेव्हां रस्त्याच्या दोन्ही बाजूंना फूटपाथवर शेंकडों मेणबत्त्या लावलेल्या आम्हांला दिसल्या. पहाटेच्या धूसर धुक्यांत त्यांचा मंद प्रकाश डोळ्यांना सुखकारक वाटत होता. पण त्या मेणबत्त्या दुःखाच्या आठवणी जागवीत होत्या. त्या रस्त्यावर जीं शेकडों माणसें मृत्युमुखीं पडलीं होतीं, त्यांच्या स्मरणार्थ मोठ्या भक्तिभावानें लोकांनीं ह्या मेणबत्त्या पेटविलेल्या होत्या.

माझ्यावरोबर अनेक विद्यार्थीमित्र तेथपर्यंत आले होते. त्यांच्यापैकीं अनेकांच्या बायका पण आमच्याबरोबर आलेल्या होत्या. आम्हीं आमचीं मनें दगडासारखीं घट्ट केलीं होतीं. पण बायका मात्र मुक्तकंठानें रडत होत्या. पार्कमधील श्राद्धविधि आटोपल्यावर आम्हीं तेथेंच एकमेकांचा तात्पुरता निरोप घेतला.

बुडाकेझि स्ट्रीटच्या टोकाला आम्ही आलों, तर रशियन सैनिकांनीं तेथून पुढचे सर्व रस्ते रोखलेले दिसले. जाणाऱ्यायेणाऱ्या नागरिकांना हटकून ते सतावीत होते. लोकांजवळ आयडेंटिफिकेशन कार्डांची मागणी करीत होते. – 'कोठें चाललांत ?' – म्हणून दरडावून विचारीत होते. तें दृश्य दिसल्यावर आडवाटांचा आश्रय करून आम्ही जंगलांत शिरलों. बुडाकेझि खेड्यांत मात्र आमचेच योद्धे तळ ठोकून होते. तेसुद्धां आपल्या परींनीं वाहेर जाणाऱ्यांची तपासणी करीत होते. आमची पण त्यांनीं चौकशी केली. 'एव्हीएच्'चीं माणसें ऑस्ट्रियामध्यें चोरून आश्रयासाठीं जात होतीं त्यांच्यासाठीं हा सारा बंदोबस्त होता.

"आमची एक गाडी पाटीला जाणार आहे. तुम्ही पण आमच्याबरोबर चला. दाटी होईल पण त्याला कांहीं इलाज नाहीं." आमच्या सैनिकांपैकीं एक जण म्हणाला.

"देव तुमचं भलं करो !"– ईव्हा आणि मी एकदम म्हणालों.

वाटेंत वाहनाची सोय झाल्यामुळें आम्ही ठरलेल्या वेळापूर्वीच पाटीला जाऊन पोहोचलों. एक तासाभरानें बारा वाजले. आणखी थोड्या-वेळानें चार्ल्स इम्रे आला. त्याच्या मागून दहा मिनिटांनीं पिस्टा येऊन पोहोचला. आणखी एक तासभर आम्हीं वाट पाहिली. मग पिस्टा म्हणाला, "आतां आणखी थांबू या नको. ईव्हाला त्याचा त्रास होईल. चल लाझलो, आपण निघूं या."

आम्ही रस्त्याला लागलों. समोरच्या बाजूला रस्त्यांत धुळीचा लोट उठलेला दिसला कीं लगेच रस्ता सोडून बाजूच्या झाडींत आम्ही लपत होतों.

झोमोर येथें पुन्हा एकदां आमचेच लोक आम्हांला भेटले. हा तळ अजून आमच्या लोकांच्या हातांत होता. तेथें जे सैनिक होते, त्यांच्यापैकीं एकानें मला ओळखलें. मला मात्र त्याची ओळख पटली नाहीं. अर्थातच येथें आमच्याजवळ कोणी कागदपत्रांची मागणीसुद्धां केली नाहीं. ज्या सैनिकानें मला ओळखलें होतें, त्यानें डोरोगपर्यंत आम्हांला कारमधून नेऊन सोडलें.

वाटेनें कित्येक परदेशी गाड्या आम्हांला दिसल्या. पश्चिमी राष्ट्राच्या लायसेन्स प्लेट्स त्या आपल्या पृष्ठभागावर मोठ्या दिमाखांत मिरवीत होत्या. त्या डौलदार सुंदर गाड्या बघूनच आमची तहानभूक हरपली. अशा एखाद्या गाडींतून थोडा वेळ प्रवास करावयास मिळाला, तर काय बहार होईल, असें आम्हांला वाटलें. विचार मनांत येण्याचा अवकाश, ईव्हानें डावा पाय दुखावल्याचें सोंग केलें. आणि ती लंगडत चालूं लागली. पण तिची लबाडी कामास आली नाहीं. एकसुद्धां गाडी वाटेंत आमच्यासाठीं थांबली नाहीं. आमच्या अंगावरून त्या गाड्या भरधांव गेलेल्या बघून आमच्या मनांत राग उसळला. पण आमच्या रागाला तरी कोण विचारणार होतें ?

आमचीं स्टूडंट्स कार्डस् आम्हांला ठिकठिकाणीं, वेळोवेळीं दाखवावीं लागलीं. त्या वेळीं एक महत्त्वाची गोष्ट आमच्या निदर्शनास आली. नॅशनल आर्मीचे आणि स्वातंत्र्यासाठीं लढणारे जे सैनिक होते, त्या उभयतांच्या लेखीं बुडापेस्टमधील विद्यार्थी-योद्ध्यांस मोठाच मान होता.

डनाल्मास येथें आणखी दोन सैनिक भेटले. त्यांनीं आम्हांला हटकलें. –

"थांब जरा, चार्ल्स." मी म्हणालों, "अरे, बहुतकरून हीं 'एव्हीएच्'चीं माणसे आहेत."

माझा अंदाज बरोबर होता. पण एकदां त्यांच्यासमोर उभे ठाकल्यावर परत मागें फिरण्याची सोय नव्हती. शेवटीं तसेंच आम्ही त्यांच्याजवळ जाऊन थडकलों. जातांजातां ईव्हाला मीं सांगितलें, "आजारपणाचं सोंग कर. थोडीशी रड." तिच्या कमरेभोंवतीं हात वेढून मी तिला त्यांच्याजवळ घेऊन गेलों.

हे जे सरहद्दीवरचे सैनिक होते, त्यांना 'हिरवे' 'एव्हीएच्' म्हणून म्हणत. 'निळे' 'एव्हीएच्' म्हणजे नेहमीं दिसणारे, आमच्या ओळखीचे गुप्त पोलिस.' हिरवे' म्हणजे 'निळचां'चीच शाखा होती.

आम्ही विद्यार्थी आहोंत. त्यांच्या हांकेच्या टप्प्यांत जातांक्षणीं चार्ल्स ओरडून म्हणाला. त्यांच्या हातांतील मशीन गन्स आमच्यावर रोखलेल्या होत्या. त्यांचीं तोंडें किंचित् खालीं वळवून त्यांनीं आम्हांला पुढें येण्यास फर्माविलें.

"माझी बायको गरोदर आहे." मी म्हणालों, "ग्यॉरच्या हॉस्पिटल-मध्यें तिला घेऊन चाललों आहोंत."

आमच्या जवळचीं कार्डे आम्हीं त्यांना दाखविलीं. तीं बघून त्यांनीं स्वतःची खात्री पटवून घेतली. नंतर एक मिनिटभर त्यांनीं आपआपसांत कांहीं बातचीत केली.

मग आमच्याकडे वळून ते म्हणाले, "बाईला जाऊं द्या. पण तुम्हांला मात्र इथेंच थांबावं लागेल. गार्डहाऊसपर्यंत तुम्हांला यावं लागेल."

मी आणि चार्ल्सनें एकमेकांकडे बघितलें. आणि आम्ही आमच्या नजरा खालीं वळविल्या. आमच्या सर्व परिश्रमांचा शेवट शेवटीं असाच का होणार होता ? कोणास ठाऊक !

एक गोष्ट मात्र आम्हांला चांगली ठाऊक होती. ती म्हणजे मशीन गन्सशीं बातचीत करणें धोक्याचें होतें.

"मी ह्या बाईवर नजर ठेवतों. तोंपर्यंत तुम्ही जाऊन या." त्यांच्यापैकीं एक जण म्हणाला. दुसऱ्यानें आम्हांला पुढें चलण्याची खूण केली. त्या ठिकाणा-पासून गार्डहाऊस हजारबाराशें कदमांवर होतें. रस्ता जसा अरुंद, निमूळता

झाला; तसा चार्ल्सनें मला डोळा घातला. त्या खुणेचा अर्थ माझ्या ध्यानांत आला. मी जरा मागें रेंगाळलों, तसा तो गार्ड आमच्या दोघांच्याजवळ मधोमध आला. लगेच आम्हीं दोघांनीं एकमेकांशीं धक्काबुक्की सुरू केली. त्या गडबडींत गार्डाचा तोल सुटला आणि त्याच्या हातांतील बंदूक खालीं पडली. आम्ही लगेच चपळाई करून त्याच्यावर हल्ला चढवला. मी त्याचा समाचार घेत होतों, तेवढ्यांत चार्ल्सनें आपल्या बॅगेंतून एक शर्ट काढला. आणि आम्हीं त्याच्या मुसक्या आवळल्या. शर्टचे तुकडे फाडून आम्हीं त्याचे हातपाय करकचून बांधले. त्याच्या तोंडांत हिरव्यागार गवताचा बोळा कोंबला आणि त्याला तेथेंच रस्त्याच्या कडेला ओढीत आणून टाकून दिलें.

मग भोवतालच्या जंगलांतून माग काढीत आम्ही रस्ता गांठला आणि झाडीत लपून बसलों. दुसरा गार्ड ईव्हाशीं कांहीं तरी बोलत होता. पण बोलतांना त्याचें सर्व लक्ष आमच्या वाटेकडे लागून राहिलें होतें. दरएक क्षणाला तो गार्डहाऊसच्या दिशेला वळून बघत होता. बराच वेळ झाला तरी आम्ही परत येत नाहीं असें बघून त्यानें ईव्हाला कांहीं तरी ओरडून सांगितलें. आणि मग गार्डहाऊसच्या रोखानें तो पळत सुटला. त्याची पाठ फिरतांक्षणीं आम्हीं ईव्हाचे हात धरले. आणि रस्त्यानें धूम ठोकली.

एक मैलभर आम्ही तसेच भरधांव पळत होतों. नंतर दोन मैलपर्यंत आम्ही वेगानें चालत राहिलों. नंतर वाटेंत आम्हांला आणखी तिघे जण आमच्य सारखेच भेटले. कालच मारियानोस्ट्रा तुरुंगांतून त्यांची सुटका झाली होती ते राजबंदी होते. त्यांनीं आम्हांला किती तरी प्रश्न वाटेंत विचारले.

नंतर आम्ही गोन्यू येथें सुखरूप येऊन पोहोचलों. ह्या गांवांत ' एव्हीएच् ' पोलिसांनीं गांवकऱ्यांची भयंकर कत्तल केली होती. आणि आपल्या भावाबहिणींवर केलेल्या अत्याचाराचा शेतकऱ्यांनीं सूडबुद्धीनें बदला घेतला होता.

टाऊन हॉलजवळ एक मोटरसायकल खडी केलेली आम्हांला दिसली. तिचें मशीन चालूच होतें. चार्ल्सनें माझ्याकडे आणि मीं त्याच्याकडे कांहीं एका अभिप्रायानें पाहिलें. आमची समजूत बरोबर पटली. ही वेळ हातघाईची होती. आम्हीं ती मोटरसायकल थोडा वेळ उसनी घेतली. आम्हीं खूण करतांच ईव्हा पटकन् उडी मारून साइडकारमध्यें बसली. आणि क्षणार्धांत

आम्हीं तें अवजड वाहन चालू केलें. रबर आणि पोलादाचा तो चक्रव्यूह आम्हीं दोघांनीं आळीपाळीनें कसाबसा रेटीत पुढें नेला. ती वस्तु फार जुनी होती. अनेक वर्षांत तिची दुरुस्ती केलेली नसावी. दमेकरी माणसासारखी ती एकसारखी खोकत होती आणि मधूनच एकदम अचानक बंद पडत होती.

आमचा हा साहसी प्रवास ईव्हाला चांगलाच भोवला होता.

गेल्या कांहीं तासांत आम्हीं जें कांहीं भोगलें होतें, तें भयंकर होतें- त्या अनुभवानंतर ईव्हाच्या आईबापांना भेटण्याची कल्पना नाइलाजानें आम्हांला डोक्यांतून काढून टाकावी लागली. ह्या गांवठाणापासून तिच्या आईबापांचें घर निदान चाळीस मैल तरी दूर होतें आणि तेंसुद्धां अगदीं आडवाटेनें. म्हणजे येथपर्यंत पुन्हा आणखी चाळीस मैल आम्हांला तांगडत यावें लागलें असतें. ईव्हाला जर आम्ही तिच्या घरीं ठेवून गेलों असतों, तर तेथून आमच्याबरोबर परत फिरण्याइतकी ताकद तिच्या शिणलेल्या देहांत राहिली नसती. म्हणून आम्हीं तो विचारच सोडून दिला.

ह्यामासोझ्झाबाडी, डुनाझेंटपाल, हीं गांवें ओलांडून रात्रीं दहाच्या सुमारास आम्ही मेक्सर येथें पोहोंचलों. वाटेंत सांगण्यासारखें विशेष कांहीं घडलें नाहीं.

मेक्सरच्या गांवकऱ्यांनीं आम्हांला पोटभर जेऊंखाऊं घातलें. पाहुण-चाराच्या मोबदल्यांत त्यांना बातम्या हव्या होत्या. – 'आज राजधानींत काय चाललें आहे ? . . . नव्या सरकारचें काय होणार आहे ? . . . सध्यां रशियन्स कोठें आहेत ? ' . . . एकीकडे आम्ही खात होतों आणि एकीकडे सुचतील तशीं त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें देत होतों.

हेडेरव्हार, मारियाकालोंक, हालाझि हीं गांवें वाटेंत लागलीं. हालाझीस पोहोचेपर्यंत आमच्या वाहनाचा पार निकाल लागला होता. युद्धकाळांत आणखी एक वाहन निरुपयोगी होऊन पडलें होतें.

हेगेशालोम येथें आम्हांला कांहीं हंगेरिअन सैनिक भेटले. त्यांनीं आम्हांला आमच्या सुटकेचा रस्ता बिनचूक दाखविला. रस्ता अर्थातच आड-बाजूचा होता, आम्हांला हवा होता तसाच. रस्त्यांत काळोख होता, सगळीकडे भयाण शांतता होती. दूर अंतरावर कोठें तरी कुत्रें भुंकत होतें. आमच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २८४८६८
क्रमांक ८९३
नों. दि.



कानांना मशीन गन्सच्या गोळीबाराचा सराव झालेला होता. तेव्हां कुत्र्यांचें भुंकणेंसुद्धां तशा स्थितींत आम्हांला गोड वाटलें.

रस्त्यांत मध्येंच एक काळीभोर सांवली उडी मारून आमच्यासमोर आली. ती सावली एका तरुण स्त्रीची होती. तिच्या पाठीवर एका जड पोत्याचें ओझें होतें. आम्ही कोण, कोठून आलों, कोठें चाललों, वगैरे सर्व माहिती आम्हीं तिला मोकळेपणानें सांगितली. तीसुद्धां बिचारी आमच्यासारखीच बुडापेस्टहून आलेली होती.

"लढाईंत माझा नवरा गमावला." रडतरडत तिनें सांगितलें.

तिचा बेत कॅनडाला जाण्याचा होता. तेथें नव्या आयुष्यास सुरुवात करण्याची उमेद ती मनांत बाळगून होती. गेले कांहीं महिने कॅनडा हा शब्द जादूनें भारल्यासारखा आमच्या लेखीं झाला होता. 'ब्रिटिश लीगेशन' मध्यें आम्ही जात असूं, तेव्हांपासून किती तरी वेळां आम्हीं कॅनडाविषयींच वारंवार ऐकलेलें होतें.

त्या बाईच्या पाठीवरील जड ओझें आतां आम्ही आळीपाळीनें आमच्या पाठीवर वाहून नेत होतों. पायांखालीं स्वातंत्र्याकडे वाहून नेणारा रस्ता होता. माझी बायको ह्या वेळपर्यंत भयंकर थकली होती. खरें म्हणजे एक पाऊल-सुद्धां उचलून टाकण्याचें त्राण तिच्या गात्रांत नव्हतें. ती बिचारी जिकिरीस आली होती. वाटेंतच 'थांबतें' म्हणून म्हणत होती. – "स्वातंत्र्य आतां फार दूर नाहीं. कांहीं थोडचा पावलांवर आहे. जरा नेट धर, ईव्हा. आणखी थोडीशी चाल. मग आम्ही तुला उचलून नेऊंच." –असें कांहीं तरी गोडगोड बोलून आम्ही तिची चक्क फसवणूक करीत होतों. तें तिला समजत नव्हतें, असें नाहीं. पण आमचे धीराचे शब्द तिला उत्साह देत होते.

आणखी कांहीं मिनिटें आम्हीं तशीच वाटचाल केली आणि मग थोडचा अंतरावर आम्हांला उजेड दिसला. एक माणूस हातांत कंदील घेऊन आमच्याच दिशेनें चालत येत होता. आणि काय आश्चर्य ? ऑस्ट्रियन भाषेंत तो आम्हांला ओरडून सांगत होता.

"हे असे या . . . ह्या बाजूनें . . . सरळ या."

आणि मग एकदम अचानक जणूं आमच्या डोक्यांत प्रकाश पडला. ऑस्ट्रियाची सरहद्द तेथून फक्त कांहीं पावलांवर लागत होती. ईव्हाला

एकदम रडें कोसळलें. आम्ही जेथें दचकून थांबलों होतों, तेथेंच ती मटकन खालीं बसली. आणि एक मूठभर माती हातांत घेऊन पुन्हा उठली आणि चालावयास लागली. जातांजातां मातीचीं ढेकळें तिनें हातांत कुस्करलीं. आणि मग आम्ही सर्व जण उजेडाच्या रोखानें धांवत सुटलों. पलीकडे एक वयस्कर, बुटका, डोक्यावर किंचित् टक्कल पडलेला, असा एक माणूस शांत उभा होता. त्याच्याच हातांत तो कंदील होता. आणि कंदिलाच्या प्रकाशा-सारखेंच सौम्य, प्रसन्न स्मित त्याच्या मुद्रेवर उजळलेलें दिसत होतें.

ईव्हाच्या हातांत ती मूठभर माती अजून तशीच होती. ती माती तिनें तशीच हातांत घट्ट धरून ठेवली होती. – "तुझा हातरुमाल जरा मला दे, लाझलो." ती म्हणाली, "ही माती आपण आपल्याबरोबर घेऊन जाणार आहोंत."– हंगेरीची ती मौल्यवान् मूठभर माती तिनें हातरुमालांत मोठ्या प्रेमानें ठेवली, आणि मग रुमालाची पुरचुंडी तिनें कमरेला खोंवली.

"या. असे माझ्या मागून या." कंदिलाचा उजेड दाखवीत तो म्हातारा म्हणाला.

इतकें सोपें होतें हें सारें.

"माझ्या मागून या." – आणि एका क्षणार्धांत आम्ही स्वतंत्र झालों होतों.

• • •

# उपसंहार

ऑस्ट्रिया. ऑस्ट्रियाची भूमि स्वतंत्र होती. तेथील लोक मोठे उमदे, मनाचे मवाळ आहेत. मैत्रीसाठीं त्यांचे हात नेहेमीं पुढें असतात. हा देश तसा अगदीं छोटासाच आहे. पण त्याचें अंतःकरण केवढें विशाल आहे, उदार आहे. पूर्वेकडील शेजाऱ्यांना मदत करण्यासाठीं येथील लोक सदा तत्पर असतात. हंगेरिअन निर्वासितांची सर्व कहाणी जगाला सांगितली जाईल, तेव्हां ह्या देशांतील कनवाळू लोकांनीं आमच्यासाठीं ज कांहीं केलें, त्याची नोंद इतिहासांत सोन्याच्या अक्षरांनीं लिहिली जाईल.

झावडसागॉट ! स्वातंत्र्य ! परवशतेंतील आणि अत्याचारांतील कहाणी आजवर आमच्या चांगली परिचयाची होती. आतां स्वातंत्र्याची आणि प्रेमाची मधुर कहाणी आमच्या परिचयाची होणार होती.

जेव्हां आम्ही आस्ट्रिया सोडून कॅनडाला जाण्यासाठीं निघालों, तेव्हां रेडिओवर सूर घुमत होते, 'स्टिल नाख्त ! हैलिज नाख्त !'

आणखी कांहीं दिवस लोटले. आणि आम्ही आज कॅनडाच्या भूमीवर सुखरूप आहोंत. जेवणाच्या टेबलावर नाताळच्या मेणबत्त्या आम्हीं लावल्या आहेत. कॅनडाच्या समृद्ध भूमीनें, उदारपणानें दिलेलीं फळें टेबलावर रचून मांडलेलीं आहेत. फ्रान्झ ग्रूबरच्या नाताळाच्या गाण्याचा इंग्रजी अनुवाद घराघरांतील रेडिओवर घुमत आहे. ऑल इज काम, ऑल इज ब्राइट. तें सारें दृश्य बघून माझ्या अंतःकरणांत उल्हास दाटला आहे. पलीकडे माझी बायको बसली आहे—ईव्हा. तिच्याकडे मी बघतों.

मला आठवण होते. बुडापेस्टमधील पार्कमध्यें कांहीं थडगीं आहेत. त्यांच्याभोवतालीं अशाच मेणबत्त्या जळत आहेत. धुक्यांतून त्यांच्या ज्योतींचा मंद प्रकाश अंधुक दिसतो आहे. ईव्हाच्या मनांत पण हीच एक आठवण जागी होते आहे.

जे जीवंत आहेत, त्यांच्यासाठीं मेणबत्त्या. – आणि जे आज आमच्यांत नाहींत, त्यांच्यासाठीं मेणबत्त्या . . .

ह्या क्षणाला बर्टालानशीं जर मला बोलतां आलें असतें, तर किती बरें झालें असतें. मीं त्याला सांगितलें असतें, 'मित्रा, तुला दिलेलं वचन मीं खरं केलं आहे.'

उदात्त माग्यारांची ही कहाणी मी पश्चिमेला सांगत आहें. – त्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाची ही अजरामर कहाणी . . .

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. [illegible]
अनुक्रम २८५८८८ वि. [illegible]
क्रमांक ८६३ नोंः दिः १२-२-५८

REFBK-0009878

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ८८७८
शाखा (स्थळ ग्रंथ)